म. ग्रं. सं. ठाणे
विषय नाटक
सं. नं. ९
७८८३

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
लेखक
सन
संग्रहालय क्रमांक
पुस्तकाचें नांव सौंदर्यवल्ली
८८६

३८
नाटक

गद्यपद्यात्मक

# सौंदर्यवल्ली नाटक.

हें पुस्तक लोकमनरंजनार्थ पुस्तककर्त्यानें
तयार केलें आहे.

आवृत्ति पहिली.

हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या कायद्या
अन्वयें नोंदलें आहे.)

मुंबई

सुबोधप्रकाश छापखान्यांत छापलें.

[या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क मालकानें ठेवले आहेत.]

किंमत एक रुपया.

# प्रस्तावना.

आलीकडे आमच्या लोकांस एत्तद्देशीय भाषेची विशेष गोडी लागत चालली आहे हें, सांप्रतकाळीं मराठी भाषेंत निघणारीं पुस्तकें व वर्तमानपत्रें यांची संख्या उत्तरोत्तर वाढत चालली आहे यावरून, स्पष्टच होतें. स्वदेश व त्यांतील भाषा यांची सुधारणा होऊन त्यांचा उत्कर्ष व्हावा व ज्ञानभांडार वाढावें एतदर्थ जे सद्गृहस्थ मनःपूर्वक हल्लीं प्रयत्न करीत आहेत, त्यांस तें खरोखर भूषणार्ह असून त्यांचा कित्ता इतरांनीं वळविणें ह अत्यंत अगत्याचें आहे. स्वदेशाभिमान बाळगणें हें प्रत्येक राष्ट्राचें मुख्य कर्त्तव्य होय; परंतु त्याचा आमचे लोकांत अभाव असल्यामुळें आह्मीं या आमच्या सांप्रतच्या दैन्यावस्थेंत येऊन पोंहचलों आहोंत हें सांगणें नको. परदेशीय वस्तंविषयीं प्रीति व स्वदेशीय वस्तुंचा तिटकारा, ऐक्यभाव नसणें, एकमेकांत मत्सरभाव असणें, स्वदेशभाषा व त्यांतील उपयुक्त ग्रंथ, तसेंच धंदे व कलाकौशल्यें यांचा ऱ्हास होऊं देणें, ह्या व दुसऱ्या अशाच प्रकारच्या अनेक गोष्टी राष्ट्रास दारिद्र्य दशेप्रत आणण्यास साधनीभूत होत. ह्या सर्व गोष्टी पक्क्या लक्षांत वागवून त्याप्रमाणें प्रत्येकानें योग्यरीतीचें वर्तन करणें हें अगदीं अवश्य आहे. आतां सर्व गोष्टींकडे प्रत्येकाचें

ारखें लक्ष लागणें अवघड आहे खरें; तथापि प्रत्येकानें थामती व यथाशक्ति स्वदेश सुधारण्याचे कामीं दत करणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे असें समजून याप्रमाणें नेहमीं वागण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हाच हेतु मनांत आणून स्वदेश सुधारणा होण्यास त्यांतील भाषेची गोडी लागून अनेक उपयुक्त ग्रंथांकडे आमच्या लोकांचें लक्ष लावणें हें जें एक साधन आहे, तें मीं हातीं घेतलें आहे. आतां स्वदेश भाषेची गोडी लागण्यास कांहीं मनोरंजक पुस्तकें करणें हा पहिला मार्ग असें समजून हें एक मीं स्वकल्पित नाटक रचलें आहें. यांत सन्मार्गानें वर्तन केल्यापासून चांगलें फळ कसें प्राप्त होतें, व दुर्वर्तनापासून कसे हाल होतात याचें दिग्दर्शन यथामती केलें आहे व तें कितपत वठलें आहे हें पहाण्याचें काम वाचकांचें आहे. एक सारखे वाचनामुळें कंटाळा येऊं नये ह्मणून यांत क्वचित् श्लोक, साक्या, आर्या, पदें वगैरेंचाही समावेश केला आहे. हा माझा पहिलाच प्रयत्न असल्यामुळें यांत बऱ्याच चुका राहिल्या असतील; तरी सर्व गुणग्राही स्वदेशभाषाहितेच्छु रसिकजनांस विनयपूर्वक सूचवितों कीं, त्यांनीं यांतील गुण घेऊन दोष टाकून द्यावे व यथाशक्ति मदत करावी.

पुस्तककर्ता.

मुंबई तारीख २१ दिजेंबर सन १८८३.

श्रीगजाननप्रसन्न.

# सौंदर्यवल्ली नाटक.

## अंक पहिला.

### पात्रें.

सूत्रधार.... .......नाटककर्त्ता.
नटी...............त्याची स्त्री.
शौर्यसागर........कनकनगरीचा राजा.
मदनिका राणी....त्याची स्त्री.
सौंदर्यवल्ली.. .....कनकनगरीच्या राजाची कन्या
अनुराधा व रेवती } ... सौंदर्यवल्लीच्या सख्या.
सारजा...........सौंदर्यवल्लीची दासी.
गिरजा...........मदनिकेची दासी.
पुण्यशील........माजि प्रधानपुत्र.
सयाजीराव.... ..राणीचा भाचा.
अनंत व सत्यशील }......दोन खुपमस्करे वगैरे.
चाफाजी.......सयाजीचा हुजऱ्या.

## प्रवेश पहिला.

" ( सूत्रधार मंगलाचरणाचीं पदें ह्मणत प्रवेश करतो.)

### श्लोक.

॥ श्रीमन्मंगलमूर्तिमंडितचहूंहस्तांगुलीमुद्रिका ॥
॥ रत्नाचेमुगुटींप्रकाशदिसतीजैशाशरच्चंद्रिका ॥
॥ भालींचंद्रकलार्धसोंडसरळीसिंदूरहामर्दिला ॥
॥ उंदीरासनमोदकाशनमुखींस्फूर्तीपदींस्थापिला ॥

### पद.

( जयश्रीरमणा भवभय हरणा या चालीवर )

हे विघ्नेशा मंगलधामा येइ पार्वती तनया ॥
कर्मारंभीं स्तवन तुझें हें करितो विघ्न हराया ॥ धृ. ॥
सौंदर्यवल्ली नाटक हें नूतन आरंभितों मी गुरुराया ॥
सकल पंडितां प्रिय हें होईल येई ऐसा वर द्याया ॥
तुझ्यावराचा लेश मिळे जरी मूढ यत्न सफलही व्हाया ॥
शंका नसे मज हेंचि जाणूनि लीन मी होतों प्रभुराया ॥
काम क्रोध मत्सरादि षड्रिपु गांजिती तैसा ही माया ॥
तोडून हा भवसिंधु उतरुनि अंतीं दाखवी तव पाया ॥
॥ हे विघ्ने० ॥

### पद.

गाऊं चला सतत नाम त्या प्रभुरायाचें ॥ धृ० ॥
ज्यातें ह्मणति विश्वंभर । तोचि अखिल भवभय हर ॥
भक्त मुनि सुरेश्वर । वंदिती ज्यातें ॥ गाऊं० ॥
ज्यापासुनि हीं असती । उत्पत्ति लय आणि स्थिति ॥
वर्णू किती मूढ मति । त्या प्रभुरायातें ॥ गाऊं० ।

**जो सकल विघ्नें हरी। दुष्ट भंजन हें करी॥**
**भक्तजना पोटीं धरी। शरण लक्ष्मण रे॥ गाउं०॥**

**सू०**—( मंगलाचरणानंतर ) काय माझ्या प्रियेस येण्यास इतका विलंब कां बरें लागला. मी आलों तेव्हांच शृंगार आटोपून तुमचे मागोमाग येते ह्मणून सांगितलें, असें असून माझें मंगलाचरण आटोपलें तरी अद्यापि कां बरें आली नाहीं. प्रिये! लवकर ये. अद्याप तुझा शृंगार आटोपला नाहीं कां. पहा हे सभाजन आज मी या रंगभूमीवर कोणचें नाटक करून दाखविणार हें ऐकण्याविषयीं व पहाण्याविषयीं किती उत्सुक झालेले दिसत आहेत. तेव्हां त्यांस विनाकारण तिष्ठत बसविणें इष्ट नव्हे. आलीस कां. ( नटी प्रवेश करिते. )

**न०**—(नमस्कार करून) प्राणनाथ! मला येण्यास थोडा विलंब लागला याबद्दल क्षमा असावी. पण अगबाई!—

**पद.**

**प्राणनाथ हो सांगा मजसी॥**
**कां मिळविले सभा जनासी॥ धृ०॥**
**तवपदीं नित्य तत्पर असतां॥**
**काय असे हो तुह्मांस चिंता॥**
**ऐकाया बहु इच्छा मानसी॥ प्राण०॥**

महाराज मला इतक्या लवकर येथें आज बोलावण्याचें

कारण काय, तसेंच हे सभाजन येथें कां जमले आहेत व आपलं चित्त इतकं चिंताग्रस्त कां हें ऐकण्याविषयीं या दासीस महदुत्कंठा प्राप्त झाली आहे.

सू०—एकूण तूला कांहींच माहित नाहीं तर. प्रिये! आज मी या रंगभूमीवर शृंगार, वीर, करुणा आदीकरून नवरसांनीं युक्त असें नाटक करून दाखवून प्रेक्षकजनांचें मन संतोषित करावें या हेतूनें हे सभाजन येथें जमविले आहेत व या कामीं तुझेंही सहाय पाहिजे ह्मणून तूलाही पाचारण केलें आहे. तेव्हां सहाय तर करशीलना.

न०—प्राणनाथ! आज आपण येथें नवरसयुक्त नाटकना करून दाखविणार मग सहाय करशीलना ह्मणून बाई काय विचारयचं. आपली ही दासी आपल्या आज्ञेच्या बाहेर कां आहे. बरं पण प्राणनाथ असं कोणचं नाटक आपण करणार व या दासीनं आपलं कोणचं सहाय करावं हें एकवार सांगणं व्हावं.

सू०—प्रिये! आज मी येथें नवीन रचलेलें सौंदर्यवल्ली नांवाचें नाटक करून दाखविणार व तुझें सहाय ह्मणून मला इतकेंच पाहिजे कीं, तूं गायनकलेंत निपूण आहेस तेव्हां त्या योगानें सभाजनांचें मन त्वां संतोषित करावें त्याचप्रमाणें नाटक पात्रें आपापलीं कामें फार हुपारीनें चांगलीं करतील याविषयीं खबरदारी ठेवावी.

न०—फार उत्तम आहे. प्राणनाथ मी आतां थोडं गायन करिते तें सर्वांनीं सावधान चित्त करून ऐकावं. (गाते).

### पद.

हे जगदंबे भुवन सुंदरी पात्र तूं मजला ॥
या दिनाचें पालन करूनि द्यावें योग्य वराला ॥ धृ० ॥
मम बालावरी कृपा करावी देउनिया ज्ञानाला ॥
ब्रहस्पतिसम भाषण करुनि तोषवितील जनाला ॥
॥ हे जग० ॥

सू०—अहाहा!—

### साकी.

तव गायन हें श्रवणीं पडतां वेडावुनिया गेलों ॥
नाट्य प्रयोगीं साह्य तुझें मज ह्मणुनी निर्भय जाहलों॥
जाविगें सुंदरी ॥ पात्रें नटवी लौकरी ॥

प्रिये! तुझें गायन ऐकून चित्तास परम आल्हाद झाला. धन्य मी कीं मला तुजसारख्या स्त्रियेचें या कामीं सहाय आहे. असो. बराच वेळ झाला तेव्हां चल मलाही तयारीस लागलें पाहिजे व तूंही मी सांगितल्याप्रमाणें तयारीस लाग.

न०—आपली आज्ञा शिरसा वंद्य आहे. प्राणनाथ! त्याविषयीं आपण बिलकूल काळजी करूं नये. असो चला तर (नमस्कार करते).

सू०—असो प्रभू कृपेनें एक काळजी तर दूर झाली. (प्रेक्षकजनांस हात जोडून) महाराज आतां नाट-

कास लवकरच आरंभ होईल तेव्हां सर्वांनीं साव-धान चित्तानें पहावें. अरे पण ही पहा—

**साकी.**

**नक्षत्रा माजि चंद्र जसा हा तशी बघ सौंदर्यवल्ली ॥**
**सकल स्त्रियांचें भूषण ऐशी हिजला विधीनें रचिली ॥**
**जाऊं निजधामा ॥ लागूं चल आपुल्या कामा ॥**

ही राजकन्या सौंदर्यवेली चारुगात्री आपल्या प्रिय सख्यासह बागेंत क्रिडा करण्याकरितां जाण्यास याच मार्गानें येत आहे. तेव्हां आपण येथून गमन करावें हें योग्य. (सूत्रधार नटीसह गमन करतो.)

प्रवेश पहिला समाप्त.

---

**प्रवेश दुसरा.**

(सौंदर्यवल्ली, अनुराधा, रेवती व सारजा दासी प्रवेश करतात.)

**सौं०**—सख्यानों! वसंतऋतू सर्वांस प्रिय असतो असं ह्मणतात तें कांहीं खोटं नव्हे हो. कायबाई असेल तें असो या ऋतूंत जिकडे जिकडे पहावें तिकडे तिकडे आपली टवटवी दृष्टीस पडते.

अ०—सखे! हें काय विचारावें कारण—

**पद.**

**ऋतूमध्यें हा पहिला वसंत वाटे सकलासी ॥ धृ.॥**

तरूंस नूतन पल्लव फुटति ॥ मधुर पुष्प सुवास सुटती ॥
भ्रमर त्यांवरी बहु लुब्ध होती ॥ आनंद सकलांसी ॥ ऋ. ॥

या ऋतूंत सर्व वृक्षांस नवीन पालवी फुटते; त्याचप्रमाणें सुवासिक पुष्पवृक्षांस त्या फुलांचा बहार येऊन तीं अत्यंत शोभायमान दिसतात. मधून मधून वाऱ्याची मंदमंद झुळूक येत असल्यानें त्या फुलांचा सुगंध सर्व बागेभर पसरला जाऊन त्याचे योगानें चित्तास परम आल्हाद होतो. तसेंच या फुलांतील मधुर मकरंद सेवन करण्याकरितां भ्रमरांच्या झुंडीच्याझुंडी एकमेकाशीं झगडत असतात. असा या ऋतुचा महिमा आहे. यावेळीं एखादा अत्यंत दुःखी प्राण्यास जरी येथें आणलं तथापि बाई तो सुद्धां आपलं दुःख घटकाभर विसरून आनंदी होईल मग इतर प्राण्यांचं मनरंजन होईल यांत नवल तें कोणचं.

सौ०—सख्यानों! तुह्मी ह्मणतां तें खरं परंतु बाई ज्या सुंदर स्त्रिया या ऋतूंत आपल्या पतीसह अशा ठिकाणीं क्रिडा करावयास येत असतील त्यांस यापासून इतर जनापेक्षां अधिक सुख होत असेल नाहीं बरं.

रे०—सखे अनुराधे! समजलीसना या बोलण्याचा अर्थ. बाई सौंदर्यवेलो आह्मी समजलोंहो तूं त्याबद्दल इतकी काळजी कशाला करतेस. अग तुझे तसे दिवस फार जवळ आले आहेत असं समज. कारण—

## पद.

तारुण्याचा भर हा भरला ॥ पुष्पीं जैसा भ्रमर नटला ॥ दिससी केवळ लावण्यखाणी ॥ बोल बोलसी मंजूळ वाणी ॥ चालसी जैसी गजगामिनी ॥ वर्णू किती मी तूला ॥ तारुण्याचा० ॥

बाई त्यांतून तुह्मी काय राज्यांच्या मुली कोणच्याही गोष्टीची न्यूनता कां आहे, व महाराजांच्याही मनांत ही गोष्ट पुष्कळ दिवस घोळत आहेच. पण बाई उगीच कसं तरी करतां येत नाहींना. कारण आपल्या तोलास तोल देणारा व्याही व हिच्या योग्य जावई मिळाला तर पाहिजेना.

सौं०—सख्यानों! त्या गोष्टीची बाई मला मुळींच काळजी नाहीं हो. कारण मला देवानं स्त्री जातींत निर्माण केलं आहे तेव्हां कोठें तरी वर उत्पन्न करून ठेवलाच असेल. पण बाई कोणचीही गोष्ट मनाजोगी झाली तर बरी नाहीं तर त्या संपत्तीचा व राज्याचा काय उपयोग बरं. कारण ह्मटलं आहेना—

## श्लोक.

जो प्रेमें हृदयीं धरी करि खरी प्रीति सदा अंतरीं ॥
ज्याचे अंगिं दया क्षमा नशिचही शांती असे ती खरी ॥ रूपें सुंदरही असोनि सहसा दुर्मार्ग जो नाचरी
ऐशा सत्पुरुषा बघूनि वरिते ती धन्य होते खरी ॥

काय माझं तसं होण्याची आशा तरी बाई आहे कां!

काय बाई सागावं! तुह्मांस तर सर्व माहित आहेच. आई तर बोलून चालून सावत्र, बाबा तिच्या अर्ध्या वचनांत व तो तिनं बाळगलेला भाचा हा नेहमीं माझ्या मागं आहेचं अशा स्थितींत कोणचीही गोष्ट मनाजोगी होण्याची आशा दिसत नाहीं आणि तसं न झालं तर या तुमच्या सखीसारखी दुर्दैवी त्रि-जगतांत नसेल असं ह्मणण्यास कांहीं चिंता आहे काय! असो जगदंबेस माझी काळजी. (उसासा टाकते).

अ०—सखे रेवती! बाई ही ह्मणते तें कांहीं खोटं नव्हे हो. कारण हिची योग्यता काय, हिचं स्वरूप कोणीकडे, हिचे गुण ह्मणून काय सांगावेत. आणि असं अमोल्य रत्न त्या माकडाच्या पदरीं बांधण्याचा आईसाहेबांचा प्रयत्न चालूं आहे. हो उघडच आहे; त्यांचं ह्मणणं शेवटास जाणार. कारण महाराज त्यांचे अज्ञांकित आहेत. तेव्हां या गोष्टीस उपाय तरी काय करावा कारण त्या काळजीनं ही अगदीं झुरणीस लागली आहे. तेज तर बहुतेक नाहींसं झालं लावण्य मात्र बाई काय तें उरलं आहे व अशाच स्थितींत राहिल्यास ही फार दिवस वाचेल अशी आशा सुद्धां करणं नको.

रे०—(अनुराधेस एकीकडे) पण सखे हिच्या मनांतला हेतु काय व हिचं मन कोणावर जडलं आहे हें तर बाई समजलं पाहिजे; तेव्हां हिला विचारावं हें बरं. (उघड) बाई सौंदर्यलता तूं कांहींएक का-

ळजी करूं नको हो. कारण तुजकरितां आमचे प्राण जरी खर्च झाले तरी चिंता नाहीं. परंतु बाई तुझ्या मनांतील गोष्ट तर कळूं देशील. ह्मणजे त्याप्रमाणें आह्मी वागण्यास तयार आहोंत. सखे नको-ग बाई असं दुःख करूं. बोल आह्मी तुझं कोणचं सहाय करावं ह्मणजे तुला सौख्य होईल (हनुवटीस हात लावून) मनांतल्यामनांत झुरणं कांहीं आह्मांस नीट दिसत नाहींहो. सांगित्याशिवाय बाई समजेल तरी कसं. हें काय मेलं; हं सांग लवकर पाहूं.

सौं०—अहाहा! सख्यानों या संकटावस्थेंत तुह्मी उभयतां मला सहाय करण्यास तयार आहांत येवढ्याबद्दल प्रभूचे मजवर फार उपकार आहेत असं मी समजते. असो, परमेश्वर तुमचं कल्याण करो.

अ०—सखे! ज्या गोष्टींत बाई तुझं कल्याण तीच गोष्ट आह्मी करणार व त्यांतच आह्मांस सौख्य. मग त्याकरितां कितीही संकटें आलीं तरी आह्मी तीं सहन करून तुझ्या इच्छेनुरुप वर्तन करण्यास मनःपूर्वक तयार आहोंत. सखे प्रयत्न करणार आपण फळ देणारी जगदंबा समर्थ आहे.

सौं०—सख्यानों! हें तुमचं धीराचं बोलणं ऐकून खचीत आजच माझं संकट निवारण झालं असं मी समजते. मी तरी काय करूं; आज बाई जीवास अगदीं चैन पडत नाहीं याचं कारण काय बरं असावं.

रे०—सखे! उघडच आहे कोणचीही गोष्ट मनांत घोळत असल्यावर ती शेवटास गेल्याशिवाय चैन कोठून पडणार! पण सखे आमच्यापाशीं सांगण्यास शंका ती कसची. सांगितल्याशिवाय आह्मांस समजेल तरी कसं. मुक्याचं जाण कोण बाई असणार.

सों०—सख्यानों! तुमच्यापाशीं नव्हे तर सांगायचं तरी कोणापाशीं. अग पण कोणाजवळ बोलणार तर नाहींना. कारण बाई कोणचीही मनांतील गोष्ट साध्य होण्यापूर्वी कळविली असतां ती शेवटास जाणं फार कठीण असतं ह्मणून बाई कनइ पंचाईत वाटतेहो दुसरं काय.

अ०—एकूण आमचा तुला विश्वास नाहींतर. सखे खचीत तुझ्याच गळ्या शपथ तुझं होईल तितकं सहायच आह्मी करूं व ही गोष्ट प्राण गेला तरी चवथ्याचे कानीं आह्मी जाऊं न देण्याविषयीं खबरदारी ठेऊं मग तर झालंना.

सों०—हें काय बाई तुमचा विश्वास नाहीं असं कां मी ह्मटलं. अग उगीच मन पाहिलं हो. बरं सांगते तर. पण नकोग बाई जळली लाज वाटते सख्यानों! कसं ग सांगावं.

रे०—सखे! आमच्यापासून आजपर्यंत तूं कोणचीही गोष्ट चोरून ठेविली नाहींस व आमचेपाशीं सांगण्यास कोणच्याही तऱ्हेची शंका तुझे मनांत

येत नसे असं असतां आज इतकें आढेवेढे. कां! खचित तूला सांगतों कीं ही गोष्ट कोठेंही फुटणार नाहीं व होईल तितकं ह्याबद्दल आह्मी तूला सहायच करूं. तुझ्याच गळ्याची. शपथ (गळ्यावर हात ठेविते.)

सौं०—हें काय सख्यानों! मला तुमचा विश्वास नाहीं ह्मणून कां सांगत नाहीं. पण जळली बायकानं एक लज्जा ही मोठी आहेना. असो, सख्यानों सांगते ऐका. आपल्या महाराजांनीं लहानपणापासून पाळलेले आपल्या माजो प्रधानांचे पुत्र. (लाजते) हर हर! (उसासा टाकून) काय त्यांचं दुःख सांगावं. लहानपणींच मातापितरें निवर्तलीं. त्यावेळेस महाराजांनीं पुत्राप्रमाणं पालन करीन ह्मणून त्यांस अभय वचन दिलं होतं व त्याप्रमाणं त्यांनीं आजपर्यंत केलंही पण ह्मणून तरी बाई कांहीं बरं झालं व आज हे दिवस दृष्टीस पडले अहाहा! काय त्यांचं नांव. खचित (पुण्यशील) हं नांव किती शोभत आहे. ज्याप्रमाणं नांव त्याप्रमाणं कृतिही आहे. सौंदर्य काय, गुण काय ह्मणून वर्णावेत, आचरण किती शुद्ध, मनाचे किती उदार, सख्यानों! काय काय ह्मणून सांगूं. असे जे (पुण्यशील) त्यांस मी कायावाचामने करून वरलं आहे तेव्हां त्याशिवाय इतर सर्व पुरुष मला बापा भावाप्रमाणं आहेत. आतां त्यांनीं जर माझा अंगिकार

न केला अगर कोणच्याही रीतीनं त्यांचा माझा विवाह न झाला तर हा देह असाच ठेऊन आयुष्याचे सर्व दिवस ईश्वर सेवेंत घालविणार हा कृत निश्चय समजा. एकवार बाई सूर्य पश्चिमेस उगवेल पण माझा निश्चय ढळणार नाहीं. पण कायग सख्यानों तिकडून माझा अंगिकार होईल कां! कशानं बाई होणार. मजसारख्या शेंकडो दासी सेवेंत रहाण्यास तयार होतील मग माझी कथा ती काय. असो, पण काय चिंता आहे जशा अनेक दासी सेवेंत राहतील त्यांतच मी एक राहीन ह्मणजे झालं कीं नाहीं.

अ०—सखे! असं काय बोलतेस ती. अग तुजसारखं रत्न मिळत असल्यास अंगिकार करणार नाहीं असा बाई या सर्व जगांत पुरुष असेल असं मला तर वाटत नाहीं. आह्मी तसं ह्मटलं तर शोभेल तरी. असो. पण सखे रेवती! निवड करण्याचं चातुर्य पाहिलसना. महाराजांनीं इतक्या तसविरा आणविल्या आहेत त्यांतील कोणीच पसंतीस आला नाहीं. बाई धन्य असो तुझ्या शहाणपणाची. कावळ्यांच्या पंक्तींतून हंस शोधून तूंच काढावास. ईश्वर तुमचा उभयतांचा जोडा चिरकाल सुखी राखो व जगदंबा तुझे मनोरथ पूर्ण करो.

सौ०—सख्यानों! खरचं पण माझे हेतू सिद्धीस जातील कां! कशानं बाई जाणार. ती महामाया या

गोष्टीस अनुमोदन तर कधींच देणार नाहीं व बाबा तर तिच्या अर्ध्या वचनांत, तेव्हां तेही अनुमोदन देतील ही आशा नको. सखे! काय करूं ग मला तर बाई पंचाईत वाटते. मेली मी जन्मले तेव्हांच कां मेले नव्हते. पण बाई तसं कोठून होणार! प्राक्तनीं लिहिलं असेल तें सर्व सोहळे झाले पाहिजेतना. नको ग बाई! तो चांडाळ मजकडे आला ह्मणजे काळासारखा दिसतो व काय करील याची भीति वाटते. सख्यानों! आह्मी राज्याच्या मुली होऊन कायग सुख. व्यर्थ आमचा जन्म. आई जगदंबे तूला माझी काळजी (उसासा टाकते).

चं०—सखे! नकोग दुःख करूं. तूझं दुःख पाहून आमच्या पोटांत भडभडून येतं; तरी तुला सर्व समजतं ह्मणून बरं. अग तुझा तसाच जर हेतु आहे तर आज नाहीं उद्या तो सिद्धीस जाईलच. बरं पण सखे अनुराधे! याला मी एक युक्ति काढली आहे ती ही कीं पूण्यशील महाराजांची व हिची आपण एकांतीं गांठ घालून द्यावी व नंतर या उभयतांनीं काय करणं तें एकमेकांच्या विचारानं करावं. कसं सखे तुला कसं वाटतं. ही युक्ति बरी आहे कां?

मों०—युक्ति बाई बरी दिसते खरी, पण बाई अशानं उद्याचं संकट कदाचित आजच येईल. कारण ही गोष्ट जर

त्या महामायेस कळली तर ती त्यांना येथें क्षणभर सुद्धां राहूं देईल असं वाटतं नाहीं. असो. काय होईल तें होवो. एक वार गांठ घ्यावी हेंच बरं असं मला वाटतं. खरं कां नाहीं सख्यानों!

अ०—हीच युक्ति उत्तम. कोण आहे ग ती दासी? सारजे! पुण्यशील महाराजांकडे जाऊन त्यांची एकांतीं गांठ घे व उद्यां सकाळीं घटकाभर ताई साहेबांनीं बोलावलं आहे ह्मणून सांग. खबरदार! ही गोष्ट कोणास कळतां कामा नये. फार युक्तिनं कर, समजलीस.

सा०—जी बाईसाब, जात्ये. (निघून जाते).

रे०—सखे! बराच वेळ झाला. अगदीं संध्याकाळ झाली. चलायचना आतां घरीं!

सौं०—खरंच. सख्यानों! तुमचे मजवर महत उपकार आहेत ते कसे फिटतील ते फिटोत. असो, चला गडे.

अ०—भग हे काय सखे? उपकार कसले त्यांत; आमचं कर्तव्य आह्मी करतों. असो. चला तर (सर्व निघून जातात).

प्रवेश दुसरा समाप्त.

## प्रवेश तिसरा.

ताजमहाल.

(मदनिकाराणी व गिरजा दासी प्रवेश करतात.)

म०—कायग दासी! इतकी संध्याकाळ झाली तरी

स्वारी अजून कां वरं आली नाहीं. काय बाई करावं. किती मेली वाट पहात बसावी. नेहमीं पहावं तों बाई दरबार न आपण. छेः ग मीच वेडी. त्यांचं लक्ष इकडे आहे कोठं! नव्हती आपल्याला गरज तर दुसरं लग्न करायाचं नव्हतं. कां पाया कां कोणी पडायला गेलं होतं. पहिल्या-नच विचार कां केला नव्हता. छेः बाई आप-ल्याच्यानं नाहीं हें सहन होणार.

गि०—बाईसाब हें काय. हवा खाण्यास गेले हैना तिकडे थोडा उशीर लागला असेल आतां ये-त्याल. त्यामंदी इतकं दुख कशाला करायला व्हावं नका सरकार! आपुन असं दुःख करावं मग आम्हांसनी गोड कसं वरं वाटल.

भ०—गिरजे! तूं ह्मणतेस खरी पण इकडची इकती शुद्ध नसावी हें आश्चर्य नव्हे कां! मी आपली पांखरासारखी वाटेकडे डोळे लावून बसते आणि तिकडच्या तें गांवींसुद्धां बाई नसतं. मेली मीच वेडी ग. असो. बोलून दाखवूं नये करून दाखवावं ताळ्यावर आणण्यास उशीर कां आहे. गिरजे जा स्वारी आली कीं नाहीं तें पाहून ये. लवकर येहो पण नाहीं तर जाशील तिकडेच वेंधळ्यासा-रखी बसशील.

दा०—जी बाईसाब आल्येच ह्मंगा. त्रिगिनशी जाऊन येत्ये. (निघून जाते.)

म०—(पलंगावर पडून मनाशींच) काय करावं कांहीं सुचत नाहीं. आपला हेतु सिद्धीस जाण्यास उपाय तरी काय करावा. ती कारटी तर ऐकत नाहीं. तिचं सगळं लक्ष त्या भिकाऱ्याकडे. सयाजीची सावली सुद्धां पडूं देत नाहीं. आतां तिच्या व त्याच्या योग्यतेंत जमीन अस्मानीचा फरक. पण तसं न झालं तर आपल्या कुळांत राज्य येतं कसं. इकडची तर प्रकृति पडली भोळी. असो. कांहीं असलं तरी तिचं लग्न सयाजीशींच लावलं पाहिजे. आणि तें जर कारटी न ऐकेल तर या जगतांतून तिला नाहींशी करून टाकते म्हणजे झालं. आतां इकडून कबूल होण्यास फारसा प्रयत्न नको आणि इतकंही करून ऐकणं न झालं तर त्यांचीही व्यवस्था करण्यास उशीर लागणार नाहीं. आ-तां गोडीनं सर्व मनाजोगं झालं तर ठीकच आहे. पण तसं होण्याची आशा मुळींच नाहीं. असो आतां येणं होईल तेव्हां आपण रुसून बसा-वं आणि समजूत करणं होईल तेव्हां प्रथम वचन घेऊन आपला कार्य भाग साधून घ्यावा म्हणजे झालं. (विचार करीत स्तब्ध बसते).

दा०—(प्रवेश करून) बाईसाब सरकार आल्याती आ-तां येतो छंगाले.

म०—हो कां बरं तूं बाहेर बैस जा. (शौर्यसागर प्रवेश करतो).

शो०—कां! आज तब्यत फारच कडक दिसते.. कोण आहे ग ती! दासी! आज सेवेंत कांहीं चुकला किंवा काय. तुह्मांस हजार वेळ सांगितलें कीं कोणच्याही गोष्टीची न्यूनता पडूं देऊं नका असं असून आज काय चुकला सांगा पाहूं!

दा०—सरकार! आह्मापून काइबी अन्योव झाला न्हाइ. सरकारासनी येण्यास थोडा उशिर लागला ह्मनून-शेनी बाईसावांस अक्शी चैन न्हाइ. माफी असावी सरकार.

म०—अग बाई! हें काय. त्या गरीब बिचारीवर कां तें! तिनं काय केलंन! काय बाई तरी! करून लपवि-ण्याची ही युक्ति बरीच आहे.

शो०—(जवळ जाऊन.) तर मग काय माझीच चूक! तुझ्या मी इतका आज्ञेंत आहे कीं.—

## पद.

तव वचनीं तत्पर आहे सखये ग सुंदरी ॥
परी रागें कां भरसी ग सांगे तूं मजवरी ॥
क्षमा करी तूं मजला ग चुकलों कांहीं जरी ॥
कांहीं मनिषा ही असली ग पुरविन मी लौकरी ॥
तरी त्यागुनि कोपातें हस्य मजसी तूं करी ॥ तव॥

आतां अमंळ येण्यास विलंब लागला येवढ्याचबद्दल राग असेल तर क्षमा मागतो मग झालं कीं नाहीं. पुरे बोवा आतां. या इकडे तर या. (हात धरतो).

म०—(हातास झटका देऊन) कांहीं नको! मी नाहीं

येत. दूर आहे ती काय वाईट आहे. जवळ येऊन काय कारायचं आहे. गरज कोणाला आ-हे माझी. तोंडापुरतं मला कोठं बोलतां येतं! (दूर उठून उभी राहते).

शौ०—ह्मणजे! तुझी गरज मला नाहीं. हें काय वेड्यासासारखें बोलावं. तुझ्या मी इतका वचनांत आहे कीं यवढं पाणी प्या ह्मटलेंस तर तेवढेंच पिऊन राहतो. कोणची गोष्ट तूं मला सांगितलीस आ-णि मी ऐकिली नाहीं सांग बरें? परवा तूं सां-गितलेंस कीं सयाजीरावाला दरबारांत नेऊनं राज्यनीति शिकवीत जा तसें हल्लीं करीत असतो. त्याचप्रमाणें सौंदर्यवल्लीचा व त्याचा विवाह करून देऊन त्यासच राज्यावर बसविण्याविषयीं तुझी इच्छा आहे ती ही गोष्ट मी कबूल केली. असा सर्वपरी तुझ्या आज्ञेत असतां रागावण्याचें कारण काय? गेलाना आतां राग? या अशा तर इकडे. (पुन्हा हात धरून जवळ घेतो.)

म०—खरंच का पण हें बोलणं! आहा! ऐकेल कोणी. काय जळं मला जर ठाऊक नसेल तरना पण; वरवर तोंडावरून हात फिरवून समजूत करायची मात्र. बरं प्राणनाथ! आपण ह्मणतां हें जर खरं असेल तर मला वचन द्या पाहूं! काय मेलं. ह्मणातातना नांव मोठं आणि लक्षण खोटं.

शौ०—प्रिये! हें काय बोलणें! तुला आज कोणत्याही

गोष्टीची कमताई आहे कीं काय? अग! कोण-चीही गोष्ट तोंडातून निघण्याचा अवकाश कीं लागलींच झालीच ती. असें सर्वपरी तुला अनुकूल असतां व मीही तुझ्या आज्ञेंत असतां दुःख क-रण्याचें कारण काय? प्रिये! नको नको! बोल तुझी काय इच्छा आहे. तुला जर सौख्य नाहीं तर मला हें राज्य व ही संपत्ति घेऊन काय कर्तव्य आहे. ( तोंडावरून हात फिरवितो ).

म०—( आपला मतलब साधण्यास ही संधी बरी आहे असें मनांत आणून) प्राणनाथ! आपल्या सारखे पती असल्यावर मला वास्तविक काडी इतकं सुद्धां दुःख नसावं व मला दुसऱ्या कोण-त्याही गोष्टीचं दुःख वाटत नाहीं; परंतु नको बाई! आणखी मलाच नांव ठेवणं होईल. आपलं डोक्यावर कातडं ओढून घ्यावं आणि मुकाट्यानं रहावं झालं. प्राणनाथ! राजकुलांत येऊन कुलास बट्टा लावण्याजोगं कृत्य घरांत व्हावं आणि त्याबद्दल सर्वांनीं छीः थुः करावी हें कसं बरं सहन होईल. असं वाटतं आपलं उठावं-न कांहीं तरी खावं झालं. बरं ह्मटलं कांहीं बंदोबस्त करावा तर तीही सत्ता नाहीं तेव्हां कस बरं दुःख होणार नाहीं प्राणनाथ!

शौ०—( थोडया रागानें) अशा संदिग्ध बोलण्यापासून माझ्या मनांस अधिकाधिक दुःख होतें. प्रिये! माझ्या

वाड्यांत असें विपरीत वर्तन कोण करीत असतो सांग पाहूं! आतां जाऊन पारिपत्य करितों. माझ्या वाड्यांत आणि वाईट वर्तन!

म०—अहाहा! जसं कांहीं कोणी ह्मणेल खरंच राग आला. पण हा टिकणार किती वेळ. मला ठाऊक नसेल तरना. माझ्या तोंडांतून ऐकलं नाहीं तोंपर्यंतच; मग रागविग राहील जागच्याजागीं. नको बाई! सांगून तरी काय करायचं! हातून होणार मात्र नाहीं कांहीं सुद्धां आन बोलेन तें तोंड दिसेल मात्र माझं. काय मेलं अडलं आहे त्यावाचून. मला एकटीलाच नाहीं कोणी हंसणार. त्यांत सर्वांसच नांव ठेवणार आहेत.

शौ०—लोकांनीं हंसण्याजोगी अशी आपल्या घरांत गोष्ट होत असते? सखे! विनाकारण माझें मन तूं विचारांत कां पाडतेस, कारण लपवून ठेवण्याजोगी ही गोष्ट दिसत नाहीं तेव्हां उगीच आतां विलंब लावूं नको. प्रिये! बोल ग! किती आढेवेढे घेतेस असं काय बरं. थट्टा करण्याची कां ही वेळ?

म०—खरंचे कां पण त्याचा बंदोबस्त होणार! नाहीं तर बाई या कानानं ऐकायचं आणि या कानानं सोडून द्यायचं असं करायचं असेल तर मी आपली सांगतच नाहीं. हो पण तसं कशाला प्रथम त्या-

बद्दल वचन द्या म्हणजे सांगते. बोलण्या-
वर विश्वास कोणी बाई ठेवावा!

शौ०—एकूण आमच्या बोलण्यावर विश्वास नाहीं
तर. यवढेंच कीं नाहीं हें घ्या वचन; झालं. सांगा
पाहूं आतां!

म०—सांगणं म्हणून येवढंच कीं आपली कन्या व तो
वाळगलेला पुण्यशील हे चार चार घटका एके
ठिकाणीं बोलत बसतात! आतां लहान का हे!
असलं करणं बाई त्यांस आतां नाहीं शोभत. लोक
आपल्यांत कुजबुजतात व भलभलते तर्क क-
रितात. खरंच आहे संशय येण्याजोगं त्यांचं
वर्तनच असतं मग लोकांस दोष कां लावावा.
मला बाई सुद्धां पुष्कळ दि सां पासून संशय येत
होता व लोकही सांगत हे.ते पण म्हंटलं बाई
बोलावं कसं. कारण न जाणो मी कांहीं सांगितलं
आणि इकडून रागावणं झालं म्हणजे बाई पंचा-
ईतच कीं नाहीं. शिवाय आपलेच दांत व आ-
पलेच ओंठ. मी आज सुद्धां कानावर घालणार
नव्हते पण राहवेना व इकडूनही विशेष आग्रह
पडला म्हणून बोलले. असो. एक परी हें तरी बरं
झालं कारण मी तरी दोषांतून सुटले. आतां
हवा तर बंदोबस्त करा नाहीं तर नका करूं माझं
कर्तव्य मी केलं.

शौ०—हरहर! प्रिये! काय करूं ग! यावेळेस असा

संताप आला आहे कीं आतांच जाऊन दोघांस देहांत प्रायश्चित द्यावें. कारण या शिवाय त्यांचे अपराधास दुसरी शिक्षा माझ्यामतें योग्य दिसत नाहीं. (मनाशींच) वा:! पूण्यशीला! चांगले उपकार फेडलेस! अरे तुझीं मातापितरें निवर्तलीं तेव्हां त्यांनीं तुझा हात माझे हातांत दिला व हा आपला पुत्र आमचा नव्हे असें त्यांनीं सांगितलें व मीहि तुझें पालग्रहण पोटच्या पुत्राप्रमाणें केलें आणि त्याच घरांत असें वर्तन. इतःपर माझ्या आश्रयास तूं पात्र नाहींस. वरं त्यानें असें वर्तन केलें पण माझ्या कन्येनें त्यास कसें अनुमोदन दिलें. अगे व्यभिचारिणी! तूलाही योग्य शासन केलें पाहिजे. मूर्खे माझ्या पोटीं जन्म घेऊन असें वर्तन काय! कांहीं चिंता नाहीं तूला शासन करण्यास कांहीं उशीर लागेल कीं काय! वरं वरं! पहातो आतां. (क्रोधयुक्त होऊन स्तब्ध बसतो).

म०—प्राणनाथ! हें काय! अमंळ शांत व्हावें उगीच आपल्या जिवास संताप करून कां घ्यावा? जा बाई! हें काय. डोळे किती लाल झाले आहेत, संतापानं सर्व आंगास कंप किती सुटला आहे! कोणीकडून बाई हें सांगण्याची मला बुद्धि झाली कोण जाणं. प्राणनाथ! राग शांत करावा! नाहीं. कां माझं ऐकायचं! असं काय तें. (वारा घालते).

शां०—प्रिये! काय आतां ऐकूं? धर्म करतां कर्म उभें राहलें. कारटीनें माझ्या कुळास बट्टा लावला. आतां याला युक्ति तरी काय करावी. असो. प्राणसखे! त्या पूण्यशीलास एकदम माझ्या राज्यांतून निघून जाण्यास सांग व कन्येवर नीट नजर ठेवून चांगल्या रीतीचा बंदोबस्त कर. काय! मूर्खाचें नांव पूण्यशील ठेवलें! (पुन्हा संतापून) हें तर त्यास मुळींच शोभत नाहीं. याबद्दल पापशील हें नांव ठेवलें असतें तर फारच शोभलें असतें असो. प्रिये पुन्हा माझ्या दृष्टीस तो न पडेल अशी तजविज कर व या गोष्टीबद्दल मजपाशीं पुन्हा उच्चार सुद्धां करूं नको. त्याचप्रमाणें कन्येस दोन गोष्टी बोधाच्या सांगून सयाजीशीं लग्न करील अशाबद्दल तिचें मन वळीव ह्मणजे सुमुहूर्त पाहून विवाह करून टाकूं ह्मणजे झालें. अशानें सर्वच बंदोबस्त होईल. तुजशिवाय हें काम दुसरे कोणाचे हातून होणार नाहीं, तेव्हां मजकरितां येवढें तू केलेंच पाहिजेस. तर तूं कबूल आहेस कीं नाहींस?

र०—प्राणनाथ! आपण सांगितल्याप्रमाणं मी बंदोबस्त करीन. पण मी कोणचीही गोष्ट केली आणि त्याबद्दल कोणी येऊन कांहीं भलतंच सांगितलं व मग मजवर रागावणं झालं तर मात्र माझ्या अगदीं कामास पडायचं नाहीं. नाहीं तर "मला

तो बंदोबस्त करणं नको आणि मग कुरकुरही नको. माझं आपलं उघड बोलणं; प्रथम कडू आणि मग गोड. हं विचार कां आतां काय तें सांगणं व्हावं एकदां!

शौ०—प्रिये! विचार कसचा; तूं जें करशील तें यथायोग्यच करशील अशी माझी खात्री आहे; कारण जें मला वाईट तेंच तुला वाईट. त्याबद्दल कोणी कांहीं जरी सांगितलें तथापि मी त्यावर विश्वास ठेवणार नाहीं व तूं करशील तें मला कबूल आहे. ही व्यवस्था करण्यास तुला पूर्ण अधिकार दिला आहे. हें घे वचन झालें कीं नाहीं आतां!

म०—बरं आहे प्राणनाथ! आतां इकडे त्याबद्दल काळजी करण्याचं मुळींच कारण नाहीं. मी आतां त्याचा नीट बंदोबस्त करते. बरं प्राणनाथ! आपण तो नवीन बगीच्या करण्यास सांगितला होता तो तयार झाला असेल नाहीं बरं. मग तो पहायचा तरी केव्हां? काय मेलं! म्हंटलं स्वारी आली म्हणजे इकडच्या तिकडच्या चार कर्मणुकीच्या गोष्टी बोलत आनंदानं वेळ घालवावा तों कांहीं तरी विघ्न उभं आहेच. मी म्हणते अश्यानं सुख लागेल तरी कसं! मग त्या संपत्तीचा व राज्याचा काय बरं उपयोग प्राणनाथ!

शौ०—प्रिये! मलाही तसेंच वाटतें; परंतु उपयोग काय! प्रारब्धींच सौख्य नसेल तर मिळणार कोठून! आपलें मुकाट्यानें रहावें झालें. ह्मंटलें पोटीं पुत्र संतान नाहीं पण परमेश्वर कृपेनें एक कन्यारत्न झालें त्यापासून तरी सौख्य होईल. छेः होणार कोठून. कारण तसें होईल तर साधु वाक्य जें "जगीं सर्व सुखी असा कोण आहे" त्यास बाध येईल. असो. (उसासा टाकतो).

म०—प्राणनाथ! एकदां सांगितलंना कीं त्याबद्दल मनांत कांहीं आणूं नये. आपली कन्या झालीच नाहीं ह्मंटलं नी गप्प बसलं. असो. बरीच रात्र झाली मला बाई आतां झोंप येते चलायचंना आतां. आपण आतां अगदीं निष्काळजी व्हावं. सर्व बंदोबस्त मी उत्तम करिते चलावं तर. (हात धरते).

शौ०—प्राणसखे! ठीक आहे चलावं (उभयतां हात धरून निघून जातात).

प्रवेश तिसरा समाप्त.

प्रवेश चवथा.

आरसे महाल.

(सौंदर्यवल्ली, अनुराधा, रेवती व सारजा दासी प्रवेश करतात.)

सौं०—सख्यानों! केव्हांग येणं होईल! दासीनं निरो-

प वगैरे कांहीं आणला का? काय बाई आज मला कांहींच सुचत नाहीं. असं होण्याचं कारण तरी काय बरं असावं?

अ०—सखे सौंदर्यवल्ली! असं काय तें अगदीं वेड्यासारखं करावं? येतील हो आतां. कोण आहे ग दासी? पुण्यशील महाराजांनीं केव्हां येतो ह्मणून सांगितलं?

सा०—नवाच्या अमलामंदी येतो ह्मंगाले. बहुशा इकडे येण्यास निवालबी असतीलया. आज खास येतो ह्मंगूनशेनी वचनबी दिलया.

रे०—सखे ठीकच आहे. आतां पावणेनऊ वाजले इतक्यांत यावेत असं वाटतं. त्यांचं टिपण बहुतकरून चुकायचं नाहीं. दासी जा ग बघून ये आले ह्मणजे आह्मांस तावडतोब कळीव मात्र हो. जा लवकर कशी.

सा०—जी बाईसाब. आल्येच ह्मंगा. (निघून जाते).

सौं०—सख्यानों! जगदंबेनं उद्याचं संकट आजच न आणावं ह्मणजे झालं! नाहींतर आपण करायाला जाऊं एक आणि होईल भलतंच. तें असो. पण कायग सख्यानों! तिकडून तर कांहीं कांकू होणार नाहींना? कारण बाई तिकडची योग्यता कोणीकडे व मी कोणीकडे. असो. माझ्या मनानें जी गोष्ट घेतली ती मी करणार मग त्यांत यश येवो अगर न येवो.

अ०—सखे! हें काय मेलं! असं भलभलतं नको गडे बोलूं. अग तुजसारखं रत्न मिळण्यास चांगल्याच देवी-ची पूजा केली पाहिजे हो! फुकटचं नाहीं. (इत-क्यांत सारजा प्रवेश करिते.) कोण सारजा कांग तीं; काय ग आली कां स्वारी!

सा०—जी सरकार! मधल्या चौकाप येऊन पोंच-ल्याती आतां येत्याल.

रे०—सखे! आह्मी आतां जातों बरं. कोणचीही गोष्ट करणं ती विचारानं करा ह्मणजे झालं. सांग-णं ह्मणून येवढंच कीं कोणच्याही रीतीनं संकट ओढवेल असं करूं नका. वरं येऊं तर आतां! अमंळशानं येऊं आह्मी (दोघीही निघून जातात व सारजा बाहेर उभी राहते इतक्यांत पूण्यशील प्रवेश करतो व सौंदर्यवल्ली लाजून एकीकडे उभी राहते).

पू०—कां! आज मध्येंच बोलावणें पाठविलें होतें; असें कोणचें जरूरीचें काम होतें. काय बोवा इकडे येण्याची सुद्धां मोठी पचांइत वाटते कारण हल्लीं मी उगीच पहात असतो तों ती माहामाया सदां रागावलेलीच असते व नेहमीं डोळे वटारून बघत असते. काय मी तिचा अपराध केला कोण जाणें. असा त्यावेळेस संताप येतो पण उप-योग काय. महाराज तर पडले भोळे आणि तिच्या अगदीं अर्ध्या वचनांत तेव्हां तिचें हवें तसें चालें-

तूं आणि सल्ला मसलत देणार सयाजीराव तेव्हां सर्वच आनंद! नेहमीं ऐकावें तों तुझ्या व माझ्याविषयीं गुणगुण चाललेली असते. काय मग तिच्या मनांत असेल तें असो. मला कांहीं तिचा भरंवसा येत नाहीं.

**सौं०**—प्राणनाथ! किती मी दुर्दैवी. कारण मजपासून सुख व्हायचं तें तर एकीकडेच राहिलं पण बाई उलट त्रास मात्र होत असेल. मजकरितां इकडे किती जाचणी होत असेल कोण जाणं. प्राणनाथ! नको बाई! हा मला आतां त्रास सोसत नाहीं व असे किती दिवस काढावे लागणार हें ही समजत नाहीं. परंतु प्राणनाथ—

## पद.

**दुर्दैवी ही तुह्मा सांगते ऐका गुणवंता ॥ धृ ॥**
**मत्संगानें दुःख हें होतें ॥ पाहुनि मन माझें ॥**
**तळमळतें ॥ पदरची ह्मणुनि तुह्मा विनविते ॥**
**अंतर न द्यावें कुलवंता ॥ हत ॥**

या हतभाग्यीमुळें इतका त्रास होतो ह्मणून प्रितींत तर अंतर पडणार नाहींना? नाहीं तर मग मात्र मजसारखी दुर्दैवी त्रिजगतांत नसेल असं ह्मणण्यास मुळींच हरकत नाहीं. पण छेः! असं होईल तरी कसं! कारण ह्मणताातना पदरीं पडलं आणि पवित्र झालं. आतां सांगणं ह्मणून येढंच कीं उभयतांस सौख्य होईल अशीं कांहीं तरी तज-

विज काढा. मजकडून कोणच्याही गोष्टीस प्रतिबंध ह्मणून नाहीं हें शरीर आपलं आहे. कसंही करून हा त्रास सुटेल अशी व्यवस्था करा मजकडून बाई तयारी आहे.

पु०—सखे!—

साकी.

ऐक सखे सुंदरी सांगतों तुजला शपथ वाहुनि ॥
प्राण हा जावो अथवा राहो देईना सोडूनि ॥
चित्तीं लोभ असावागे ॥ शोक मनीं न करावागे ॥

या देहांत जीव आहे तोंपर्यंत अन्य स्त्रियाकडे अवलोकन सुद्धां करणार नाहीं मग तुजवरची प्रीति कमी होण्याविषयीं तर बोलावयासच नको. कितीही संकटें आलीं तथापि तीं सर्व भोगीन पण तूला अंतर देणार नाहीं हें खात्रीनें सांगतों. आतां तुझ्या व माझ्यामध्यें असलेली प्रीति लोकांस पहावत नाहीं व खचीत आपणावर कधीं ना कधीं तरी संकट येणारच व त्या गोष्टीस मी अगदीं तयार आहे. प्रिये! काय सांगूं मला दुसरें दुःख कोणचेंही वाटत नाहीं; परंतु तुझें प्रेम या हतभाग्यावर जडल्यामुळें या सकुमार शरीरास काय काय दुःखें भोगावीं लागतील व तीं कशीं सहन होतील याबद्दल मात्र मला रात्रंदिवस काळजी आहे. हरहर!! परमेश्वरा! कायही आमची स्थिति! यापेक्षां एखाद्या गरीब कुलांत जनन देतास तर

किती बरें आह्मी सुखी असतों. असो प्रारब्धीं असेल तें भोगलें पाहिजे. तें कोणाच्यानें टाळवत नाहीं. देवा! आमचा कैवारी सर्वस्वी तूं आहेस व आमची काळजी तूला!

मों०—प्राणनाथ! हें काय? किती मेलं दुःख करावं.! मी ह्मणते आपणा उभयतांचा जसा निश्चय आहे हाच जगदंबेनं कायम ठेवावा ह्मणजे त्यांतच सर्व सोख्य आहे (इतक्यांत दासी घाबऱ्या घाबऱ्या प्रवेश करते.)

दा०—ताईसाब! आईसांबांची स्वारी इकड येत हाय तेव्हां महाराजांस त्रिगनिशी लाऊन द्या. स—स—सरकार ऊशीर लावूं नका. ऊ—ऊ—ऊठा लवकर.

पु०—प्रिये! सोड सोड ती महामाया आली वाटतें. आतां मात्र घात होईल! प्रिये! नको रडूं; हें काय हें! (डोळे पुसून आलिंगन देतो व दूर उभा राहतो).

मों०—प्राणनाथ! आतां काय हो करूं! आतां ती आपणा उभयतांस एके ठिकाणीं राहूं देईल हें स्वप्नीं सुद्धां आणणं नको. आतां ही मूर्ती कशी दृष्टीस पडेल! कितीही दुःख झालं तरी आपणाकडे पाहून मी विसरून जात होते. प्राणनाथ! कांहीं कारणामुळें एखादे दिवशीं जर दृष्टीस पडला नाहीं तर तो सर्व दिवस दुःखांत जायचा आणि आतां तर आपला नेहमींचा वियोग होणार मग हे प्राण कसे बरं वाचतील! किती मी हतभाग्यी!

मजकरितां आपणावर केवढं संकट येणार! देवा! मी जन्मले तेंव्हांच कां मेले नव्हते. प्राणनाथ! तिनं हा प्रकार पाहिला तर तिच्या तळव्याची आग मस्तकांत जाईल. असो. जसा प्रसंग येईल तशी पाठ दिली पाहिजे; परंतु विनंती ह्मणून येवढीच कीं या हतभाग्यविरची प्रिती कमी न होऊं देतां व आपल्या जीवास त्रास करून न घेतां ज्या ठिकाणीं सौख्य होईल त्या ठिकाणीं रहावं. परमेश्वरी संकेत असेल तर पुन्हा गांठ पडेल. आतां ही आंगठी मी प्रितीचं बंधन ह्मणून आपल्या हस्तामध्यें घालीत आहे तीं ही सौंदर्यवल्ली मरून दुसरी कराल तोंपर्यंत अशीच राहूंद्या. (मीठी मारते.)

पु०—प्रिये! हें काय असें! दुःख करूं नको! एकूण आज आपला वियोग होणारना! असो. दैवगती विचित्र आहे. महाराजांनीं आजपर्यंत पुत्राप्रमाणें पालन करून आज घातकी स्त्रीवर विश्वास ठेऊन माझा त्यांस कंटाळा आला काय! असो याबद्दल त्यांस पुढें पश्चाताप होईल. पण आपणास त्यापासून काय कर्तव्य आहे. प्रिये! यद्यपि तुझा माझा वियोग झाला तथापि परमेश्वर कृपेनें पुन्हा आपली भेट होईल. सखे! परंतु सागणं ह्मणून येवढंच कीं माझ्या वियोगामुळें अगदीं दुःख न करतां व जीवास कोणचाही अपाय

न करून घेतां जगन्नियंत्या प्रभूवर विश्वास ठेऊन सन्मार्गानें कालक्रमण कर ह्मणजे तो आपले हेतू सिद्धीस नेईल. सखे—

पद.

घालितों हस्तीं मी कंकण॥मानि यानें विवाह बंधन॥ध्रु॥
यातें रक्षीं प्राणापरी ॥ शुद्धभाव ठेऊनि अंतरीं ॥
पातिव्रत्यें आचरण करी ॥ तेंचि स्त्रियांस भुषणापरी॥
सदय पाहि तूं सेवकावरी ॥ कोप न करावा अंतरीं॥
उपदेशा ध्यानीं धरून॥ठेवि मजवरी पंचही प्राण॥घा.॥

मीही प्रीतिबंधनादाखल हें कंकण देत आहे ह्यास जीवांत जिव आहे तोंपर्यंत विसंबूं नकोस. व स्मरण झाल्यास याजकडे पाहून समाधान करून घेत जा समजलीस! नको दुःख करूं प्रिये! (डोळे पुसतो व चुंबन घेतो).

सा०—म—म—महाराज ऊ—ऊ—ठाकीं ती—ती—म—म—महामाया आ—आ—लीया. स—स—सरकार घा—घा घात होईल हो. अगदी जवळ आलीया. उशीर लावूं नका. आपणा उभयतांची प्रीति पाहून फार आनंद होतो. भगवान! अशा जोडप्याचा आतां वियोग होणारना! हरहर! असा प्रसंग वैऱ्यावरही न यावा उठाकीं सरकार. ही आलीच पहा. (मदनिका प्रवेश करते व दोघे दूर उभे रहातात.)

म०—(रागाऊन) मूर्खा! अजून तूं येथें आहेस. अरे!

आजपर्यंत तुझं पुत्राप्रमाणं पालन केलं त्याचे हे उपकार फेंडलेस वाटतं! अरे! जनाची तर राहिली परंतु मनाची तरी लज्जा बाळगायची होतीस! यावेळीं तुह्मी एकांतांत राहून काय आरंभलं होतं. तुह्मी समजत असाल कीं तुह्मांस कोणी बोलणार नाहीं परंतु आजच तशी वेळ आली नाहीं. (सौंदर्यवल्लीकडे पाहून) निर्लज्जे! काय तुझं करणं! सर्व कुळास बट्टा लावलास! धि:कार असो तूला! ज्यावेळेस जन्मलीस त्याच वेळेस कां मेली नव्हतीस! दमधर आतां येणं झालं ह्मणजे दोघांची काय अवस्था होते ती पहा कोण आहे ग ती दासी? सारजे! जा आणि आतांचे आतां घेऊन ये. जा लवकर, गेलीस कीं नाहीं अजून?

सा०—सरकार! ह्माराजासनी काय सांगूं! पण ह्माराजाचं काय काम हाय आपण त्यांस बोहलूनशेनी काय करणार? बाईसाब! त्यांची योग्यता कोणीकडे; त्यांस शिक्षा कोण करील! त्यांनीं आपला काय अन्येव केला ह्मनुनशी त्यांस आपण शिक्षा करताया!

म०—काय जीभ फार लांबशी केलीस! तूला इतकी चवकशी करण्याचं कारण काय? आचरट नाहीं तर. तूला काय सांगितल्या कामाची आणि घातल्या अन्नाची. निघ येथून, आतेस कां नाहींस (रा-

गाऊन) दहा लाथा माराव्यात आणि एक ह्मणा-
वी! मनुष्यानं आपल्या पायरीनं रहावं. वा:! गडी माणसं सुद्धां स्वच्छंदी व दांडगी करून टाकलीत. दमधर हें सर्व बंड मोडून टाकलं पाहिजे. गेलीस कां नाहींस अजून?

सा०—(मनांत आतां हिच्याशीं कमी जास्त बोलून उपयोग नाहीं असें समजून) जी सरकार, मला काय; हुकुमाची चाकर मी. (निघून जाते.)

पु०—(मनांत) काय करावं अशा वेळीं जर तरवार असती तर हिचे दोन तुकडे केले असते. अशा अभद्रभाषणानें ताडण करून मी तें सहन करून घेतो काय! पण काय करूं! हरहर! देवा! यापेक्षां मरण देतास तर बरें होतें. अरे पण आपणावर प्रसंग कोणचा! ही वेळ संतापाची नव्हे; मृदु भाषणानेंच कांहीं साधलें तर साधेल. (उघड) आईसाहेब या बालकाचे हातून एखादा गुन्हा झाला असल्यास क्षमा करावी. ह्या देहाचें आजपर्यंत पुत्राप्रमाणें पालन केलें तद्वतच ममता असूं द्यावी. शिक्षा करणार आपणच व पोटाशीं धरणारही आपणच. (खालीं मान घालून उभा राहतो.)

म०—(अत्यंत क्रोधायमान होऊन) निर्लज्जा! अपराध करून छपविण्याकरितां मानभावीपणाचीं भाषणें करतोस? परंतु अशा भाषणांनीं मोहित होऊन तूला मी कधींही क्षमा करणार नाहीं. तूझ्या अप-

राधाबद्दल तूला योग्य शासन केल्याशिवाय येथून तूं जाशील असं मुळींच समजूं नको. कोण ग तो! सारजा अद्याप आली कीं नाहीं. सारजे! अग सारजे!

पु०—आईसाहेब अशा अमंगळवाणीनें कां व्यर्थ मला ताडण करतां! मजकडे कांहीं एक दोष नाहीं. आतां या उपर आपल्यास मी अपराधी आहे असें वाटत असल्यास काय शिक्षा करणे ती करावी. परंतु इत:पर असें अभद्र भाषण माझ्यानें सहन होईल असें वाटत नाहीं; तेव्हां काय बोलणें तें विचारानें बोलावें समजलात. येवढा वेळ आपली मर्यादा ठेवली परंतु त्या मर्यादेस आपण पात्र नाहींत. तेव्हां संभाळून भाषण करावें हें पुनः एकवार सांगतों.

म०—काय मूर्खा! अपराध करून सवरून मलाच उलटा धमकावतोस ? बरं बरं ! अशा धमकावण्याला मी भिणारी नव्हे. निर्लज्जा! तोंड संभाळून भाषण कर.

सौं०—आई! काय हें भाषण! तुला हें अगदीं शोभत नाहीं ! अग ! अधिकाराच्या जोरावर मदांध होऊन राजकुलास बट्टा लावण्यासारखं वर्तन करतेस व लोकांस दुषण देतेस! काय तुला ह्मणावं! आमचे हातून काय अपराध झाला तो प्रथम पदरांत घाल नंतर काय दुषण देणार तें दे; व

शिक्षा कर. परंतु निरापराधी मनुष्यावर उगीच कुभांड रचून वाग्बाणांनीं ताडण करतेस हें पातक कोठें फेडशील! अंमळ शांत हो व विचार कर!

म०—मूर्खे! तुह्मी उभयतां एकांतांत काय ग करीत होतां! व्यभिचार कर्मास प्रवृत्त होऊन उलट ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी मलाच शिकवतेस. लाज वाटत नाहीं! पहाते तुमचा एकांत कसा आहे तो! बोलत नाहीं तोंपर्यंत. वघावं तों तों आपलं अधिकच!

सौं०—काय! तुझ्या तोंडाला हाड नाहीं! आई! हें काय भलतंच बोलतेस. तूं व बाबा एकांतांत असतां तेव्हां तुला व्यभिचारिणी असं कोणी ह्मणेल काय! या न्यायानंच आमचं वर्तन आहे. यांत आमचे हातून पातक झालं असेल तर परमेश्वर आह्मांस शासन करील. तेव्हां तूं कांहीं जरी ह्मटलंस तथापि चिंता नाहीं. ज्या दिवशीं या सौंदर्यवल्लीचे मनांत पापबुद्धि येईल त्या दिवशींच हिचा अंत झाला असं समज! (पुण्यशीला-कडे बोट दाखवून) यांचे शिवाय इतर सर्व पुरुष बापाभावाप्रमाणं आहेत व यांस मी काया-वाचामनेंकरून गांधर्व विवाहानें कधींच वरलं आहे, तेव्हां हा कृतनिश्चय यावज्जीव फिरा-वयाचा नाहीं. मग त्याबद्दल हवं तें झालं त-थापि सहन करण्यास मी अगदीं तयार आहे. आई

४

आई जास्त काय सांगूं! आतां विनाकारण या जीवास अमंगळ वाणीनें ताडण करूं नको व येवढं चुडेदान माझं सुरक्षित ठेवून नंतर मला हवं तें बोललीस अगर माझी हवी ती वाट लावलीस तरी चिंता नाहीं. हा तुजपुढं पदर पसरला आहे; येवढी भिक्षा मला घाल! दुसरं कांहीं एक मागणं नाहीं.

म०—बरं बरं! आज तूंच मुकत्यार झालीस वाटतं? तुला कोणी वडील माणसं नाहींत काय! व तुझं हीत आम्हांस कळत नाहीं वाटतं. असो. या तुझ्या उद्दाम वर्तनाबद्दल तुलाहि योग्य शिक्षा करावी लागेल. उगीच मूर्खासारखं भलभलतं बोलूं नको.

सै०—माझं हीत जसं मला कळेल त्याप्रमाणं इतर कोणासही कळणार नाहीं व त्याबद्दल कोणी विशेष काळजीही करीत असेल असं मला वाटत नाहीं. तेव्हां त्या संबंधानें काय करायचं तें मी मोठ्या विचारानं केलं आहे, व त्याबद्दल कोणाचंही मी ऐकणार नाहीं हें निक्षून सांगतें.

म०—असो. आतां कशाला बोलूं! वेळ आली ह्मणजे तुझा चमत्कार पहातें. (इतक्यांत दासी प्रवेश करिते) कोण ग ती सारजा कां! काय येण्यास फुरसत आहे कीं नाहीं!

सा०—आईसाब! आल्येच ह्मंगा. (शौर्यसागर प्रवेश करतो.)

म०—कां ! काल सांगितलेलं खोटं वाटलं असेल! पहा ह्या मुलीच्या कृति ! या वेळेस हीं दोघें एकांतांत असण्याचं कारण काय ? छेः ग बाई लोक तोंडावर थुंकतात ते उगीच कां ! उघडच आहे, त्यांचा काय त्यांत दोष आहे. ह्मणतातना आपलंच लंगडं आणि दुसऱ्याला बोलून काय उपयोग! बरं बाई प्रत्ययाला आलं ह्मणून बरं झालं. आतां हा सूर्य आणि हा जयद्रथ काय व्यवस्था करायची ती आपली पहावी कशी !

शौ०—( पुण्यशीलाकडे पाहून व क्रोधायमान होऊन ) मूर्खा ! अरे पुत्राप्रमाणें पालन केलें त्याचे असे उपकार फेडलेस काय? अरे या वेळेसच तुझा शिरच्छेद केला असता परंतु काय करूं रे तुझ्या मातापित्यांचे वचनांत गुंतल्यामुळें नाइलाज आहे. अरे—

**श्लोक.**

**जनन तव वडिलांचें उच्चकूलीं असोनि ॥**
**क्रमिले दिवस त्यांनीं शुद्ध वर्तन आचरोनि ॥**
**दिधलें जनन तुज ईशें वंशीं त्या निट दिसेना ॥**
**लवकरी येथुनि जाइ मूर्ख हे कर्महीना ॥**

त्यांची योग्यता काय! त्यांचें आचरण किती शुद्ध आणि त्यांचे उदरीं तूं कसारे करंटा जन्मलास. अरे! हिऱ्याचे पोटीं केरसुणी या ह्मणीप्रमाणें तूं आहेस. असो. मूर्खा! जा तुला जास्त बोलून काय उपयोग! आतां तुला शे-

वटचें निक्षून हेंच सांगतों कीं इतःपर तूं माझ्या राज्यांत राहूं नयेस व पुनरपि तुझें मुखावलोकन मला होऊं नये. आतां ही आज्ञा भंग करून पुनरपि तूं माझे नगरांत अगर राज्यांत आहेस अशी बातमी कोणी दिल्यास तुझा खचित शिरच्छेद करीन. जा! कर्महिना काळें करू व आजचे आज या नगरांतून निघून जा! समजलास ?

पु०—( हात जोडून व खालीं मान घालून ) महाराज! आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे. आपण जें मला दुषण दिलें त्यापैकीं कोणचाही अपराध व गैरवर्तन माझे हातून झालें नाहीं त्याप्रमाणेंच मी आपल्या मातापितरांचें नांवास कलंक मुळींच लावला नाहीं इतकेंच नव्हे परंतु त्यांस भूषणास्पद असें नेहमीं माझें वर्तन असतें व तसें सदोदित रहाण्याविषयीं मी नेहमीं प्रयत्न करीत असून प्रभुजवळ मागणेंही मागत असतों. आतां या दोषारोपाचें खंडणार्थ मी आपल्यास किती सांगितलें अगर पुरावे दाखविले तथापि आपली खातरी होणार नाहीं व याच कारणाकरितां मी यावेळेस कांहीं एक बोलूं इच्छित नाहीं. महाराज या आपल्या कृत्याबद्दल मागाहून पश्चात्ताप होईल; परंतु त्यापासून विशेष फायदा होणार नाहीं.

असो. महाराज—

## श्लोक.

अजी हे महाराजा नमुनि तुजला मी विनवितो ॥
मुळिंच अपराधी नसतां दुषणें शीण होतो ॥
असो आतां येतो ममता जशि असे मजवरी ॥
तशी राहो द्यावी विनति तुज ही जोडुनि करी ॥

मी आतां येतों जशी आजवर ममता होती तद्वतच राहूं द्यावी व कृपालोभ निरंतर असावा. (नमस्कार करून व सौंदर्यवल्लीकडे पाहून खुणेनें विचारतो व तिनेंही महत्प्रयासानें जाण्याविषयीं खुणेनेंच अनुमोदन दिलेलें पाहून निघून जातो).

शौ०—(मदनिकेकडे पाहून) प्रिये! कन्येशीं मुळींच भाषण करण्याची माझी इच्छा नाहीं. आतां हें सर्व तुजवर सोंपवितों. तूं तिला चांगल्या बंदोबस्तानें ठेऊन कोणाचाहि येथें शिरकाव होऊं देऊं नको. हिच्या दासदासी अशाच ठेवून हिची सर्व सोय येथेंच कर व सर्व महालाभोंवतीं चांगला पहारा ठेवून नीट नजर असूं दे. आतां एकादेवेळीं हिला बाहेर जाणें झालेंच तर तुझ्या हुकुमानें बरोबर विश्वासू माणसें देऊन पाठवित जा व फार वेळ बाहेर असूं देऊं नको. या कामीं माझा सुद्धां हुकुम मानण्याची मुळींच जरूर नाहीं समजलीसना! याप्रमाणें व्यवस्था कर मी जातो तर ( निघून जातो.)

म०--(सौंदर्यवल्लीकडे पाहून कपटानें) बाळ! असा भलताच हट्ट काय बरं करावा? अग आह्मी तुझ्या अनहिताचं कां कांहीं करूं! अग आह्मांस तुझी काळजी विशेष, आणि आह्माला तुजपेक्षां कांहीं जास्त पावसाळे गेले असतील. आतां तिकडून जरी इतक्या कडक रीतीचं सांगणं झालं कीं नाहीं तथापि मी तुला तसं बिलकुल वागविणार नाहीं. अग! माझी काय आणि सवतीची काय तुला मी माझ्याच कन्येप्रमाणं मानते. मला तरी दुसरं मूल कोण आहे. आह्माला मुलगाही तूंच आणि मुलगीही तूंच खरं कीं नाहीं! तर बाळ असं करूं नये. वडील माणसांचं ऐकावं ह्मणजे त्यांतच तुझं कल्याण आहे. तुला अशा स्थितींत ठेवून आह्माला त्यांत सुख कां कांहीं आहे. (तोंडावरून हात फिरविते.)

सौं०--आई! तेवढी गोष्ट शिवाय करून तूं सांगशील तें ऐकण्यास मी तयार आहे. कारण जी गोष्ट मी दूरवर विचारानें केली ती पुन्हा प्राण गेला तरी बदलावयाची नाहीं. पण आई! खरंच सांग मी यांत कायग वाईट केलं! कारण त्यांच्यांत कोणचा कमीपणा आहे. सर्व गुणांनीं युक्त आणि रुप किती सुंदर. मग तुह्मांस त्या गोष्टीस अनुमोदन देण्यास अडचण ती कोणची?

म०—(ही वेळ हिचें मन दुखविण्याची नव्हे व कांहीं कालेंकरून हिचा बेत फिरून आपलें कार्य साधतां येईल असें जाणून) बाळ तूं ह्मणतेस तें सर्व खरं पण तिकडे जर ही गोष्ट आवडत नाहीं तर आपण तरी कशाला बरं मर्जी मोडावी! आणखी मी ह्मणते कुळशीळ पाहिलं पाहिजेना; नाहीं तर लोक काय बरं ह्मणतील! राजकुळांतील मुलगी आणि तिचा यःकश्चित प्रधानपुत्राबरोबर विवाह केला. तेव्हां तसं करून लोकांत हसूं कां करून घ्यायचं. अग तुला सर्व समजतं आहे. एकाद्या पोक्त माणसाला सुद्धां तूं सल्ला मसलत देशील आणि तूंच जर असं केलंस तर मग कसं बरं लोक नांव ठेवणार नाहींत! तेव्हां बाळ विचार कर आणि आह्मी सांगतों तें ऐक; त्यांतच तुझं हित आहे हो.

सौं०—आई! जे अज्ञान असतील तेच या कामीं मला नांव ठेवतील. आणि जे शहाणे असतील ते मोठेपणा देतील. कारण ते असं ह्मणतील कीं खरी योग्यता पाहून हिनं आपल्या योग्य पती वरलान तेव्हां त्याबद्दल मला मुळींच भीति वाटत नाहीं. असो परमेश्वर हेतु सफळ करील तो सुदीन तूर्त तर दुःख भोगणं प्रारब्धीं आलं आहे! (इतक्यांत अनुराधा व रेवती प्रवेश करितात)

म०—(त्यांजकडे पाहून) मुलींनों तुह्मी तरी हिला दोन समजुतीच्या गोष्टी सांगा. कारण, असं पहा आह्मी जें करूं तें हिच्या वाईटा-करितां कां करूं? तेव्हां हिचं मन वळवून तिकडून सांगणं होईल तसं एक ह्मणून हिला सांगा समजलातना?

अ०—(मदनिकेचं कपट जाणून) खरंच आहे. आ-पण तिचं वाईट इच्छाल तर आपल्यास माता-पितरं हें नांव शोभेल तरी कसं? (ही पिडा एकदांची घालवावी असं मनांत आणून) आई साहेब! अज्ञान लेकरूं आहे. अविचारानं कांहीं अमर्यादा झाली असेल तर क्षमा करावी. राग भर-णार आपणच व पोटाशीं धरणार ही वाई आपणच. आपण आतां अगदीं निष्काळजी व्हावं. आह्मी दोन समजुतीच्या गोष्टी सांगून आपल्या ह्मणण्या प्रमाणं हिला कबूल करतों. आतां दिवस गतीनं मात्र हें काम होईल.

म०—ठिक आहे. मला आतां काळजी नाहीं. मी जाते तर नीट व्यवस्थेनें असा ह्मणजे झालं; दुसरं कांहीं सांगणं नाहीं. वाईट धरावर गोष्ट आणूं देऊं नका; येते तर. मी (जाते.)

र०—गेली एकदाची धिडका! काय सखे! काय ही अव-स्था झाली आहे! तोंड किती सुकलं आहे डोळे काय सुजले आहेत! काय बाई करावं मला वाट-

लंच होतं कीं कांहीं तरी अघटित प्रकार आज होणार. तसंच शेवटीं झालंना. असो! सखे चल थोडी विश्रांती घेऊं, ऊठ!

सों०—सख्यानों! मला कांहीं एक नको. प्राणनाथांची अशी अवस्था होऊन मला विश्रांती घेऊन काय करायचं आहे! अग त्यांचा जीव सुखी असता मग मला हवं तितकं दुःख भोगावं लागतं तथापि कांहीं चिंता नव्हती. सख्यानों! काय करूं! हे सर्व पदार्थ मला विषवत भासत आहेत. देवा! किती मी पातकी! काय माझं दुर्दैव हरयापेक्षां जन्मास आले तेव्हांच कां मेलें नव्हते! हर !! देवा! या पापिणीकरितां तिकडे किती संकटें भोगावीं लागणार. सख्यानों काय! बाई तिचं ह्रदय कठोर तरी! आतां उन्हांत तान्हांत ते कोठें फिरत असतील. ताहन लागेल भूक लागेल चालण्याची सवय नसल्यामुळें पाय दुखतील बाई सख्यानो सावलींत सुद्धां बाहेर जाण्याचा प्रसंग येणार नव्हे त्यांजवर या हतभाग्यीमुळें रानावनांत फिरण्याचा प्रसंग येणारना! कारण ती माहामाया त्यांस बरोबर कांहींएक घेऊं देणार नाहीं. हे धरणी माते आतां अंत न पहातां लवकर आपले पोटांत घे म्हणजे उभयतांचे दुःखाचा शेवट होईल! सख्यानों! काय अवस्था होईल कोण जाणं आणि असं तिकडे दुःख होत असतां मला हीं सौख्यें घेऊन

काय कर्तव्य आहे. सख्यानों कायग करूं! (मूर्च्छा येऊन पडते.)

भ०—(डोळ्यास गुलाब पाणी लावते व वारा घालून सावध करण्याचा प्रयत्न करतात.) सखे! हें काय हें! असं विनाकारण दुःख कां करतेस बाई! अग आपण काय करणार व संभाळणार. जो जगदीश सर्व सृष्टींतलि जीवजंतुंचं रक्षण करतो त्यास आमच्या पुण्यशील महाराजांचं रक्षण करव-णार नाहीं काय! सखे! ऊठ ऊठ सावध हो. प्रभूकडे लक्ष ठेऊन आलेले कांहीं दिवस धैर्यानं काढले पाहिजेत ह्मणजे त्याच कनवाळू ईश्वरास दया देऊन सर्व हेतु सिद्धीस जातील. सखे? नको शोक करूं. ऐकलसकां!

सौं०—सख्यानों! काय ग करूं! अग या शरीरास जे जे ह्मणून शीतोपचार तुह्मी करीत आहां त्यापा-सून दाह शांत न होतां उलट अधिकाधिक वाढत अहे सख्यानों! ज्या प्राणपतीकरितां ह्या देहाचं रक्षण करून सुखोपभोग घ्यावयाचे ते जर सुखांत नाहींत तर बाई या दुर्दैवीस शीतोपचार कशाला पाहिजेत! नको नको! हा देह माझा मलाच जड झाला आहे. सख्यानों! काय सांगूं पापाग-ह्दर्यां दोघेजण. ती तर बोलून चालून सावत्रच तेव्हां माझं कोणचंही बरं झालेलं तिच्यानं पहा-वणार नाहीं इतकंच नव्हे तर तिच्या मनांतील

हेतु सिद्धीस जाण्यास हावं तें साहसकर्म ती करील. बावाला तरी कांहीं दया येऊन मी प्रत्यक्ष त्याची कन्या तेव्हां माझ्या सुखाकडे तरी त्याचं लक्ष असावं पण तें सुद्धां नाहीं. उघडच आहे त्या माहामायेनं त्याला अगदीं एखाद्या मांजराप्रमाणं करून टाकलं आहे. काय तिची करणी! देवा! कशाला रे तूं मला राजकुलांत उत्पन्न केलंस? अरे! एखाद्या गरीब कुलामध्यें जनन देतास तर माझे हेतु तावडतोब परिपूर्ण होऊन मातापितरांस किती बरं आनंद झाला असता? देवा! मी आतां काय रे करूं! अरे! ज्यांस दुःख ह्मणून आजपर्यंत स्वप्नांत सुद्धां ठाऊक नाहीं त्यांस रानावनांतून व उन्हांतून प्रवास कसा रे होईल? जगदंबे! तूला सर्व काळजी तूं त्यांचं रक्षण कर ह्मणजे झालं. (स्फुंदत रडते)

रे०—सखे! नको शोक करूं. अग किती जीवास त्रास करून घेणार? सखे! कोणची गोष्ट बाई आपल्या स्वाधीन कां आहे. आपण काय रक्षण करणार. व्यर्थ नांवाला मात्र आपण आहोंत बाकी कर्ता करविता प्रभु समर्थ आहे त्यास आपली काळजी. ऐक ग बाई पुरे आतां, हें काय हें? सखे! सर्व हेतु तुझे लवकरच सफळ होतील कांहीं एक काळजी करूं नको व व्यर्थ जीवास त्रास करून घेऊं नको. (डोळे पुसून हृदयाशीं धरते.)

सों०—असो. सख्यानों! तुह्मी सांगतां हेंच खरं होणार तें होतंच, मनुष्य मात्र व्यर्थ मायापाशांत गुंतून काळजी वाहतो सख्यानों! पण आतां तो चंडाळ माझा विनाकारण छळ करील त्याला काय बाई उपाय करावा वरं? कारण पातीव्रत्याचं रक्षण कसं होईल याविषयीं मला मोठी काळजी आहे. यापेक्षां सख्यानों त्यांचे बरोबर मला जरी राज्याबाहेर घालवून दिलं असतं तथापि आह्मी उभयतांनीं एकमेकाकडे पाहून दुःखांत सुख मानून बाई आनंदानं काल क्रमण केला असता. सख्यानों! याला युक्ति सांगा वरं? कांहीं सुचते आहे कां तुह्मांस!

अ०—सखे! मनाचा निश्चय करून वर्तन केलं ह्मणजे सर्व संकटांचं निवारण होतं. सखे! त्या मुर्खांत काय शहाणपण आहे हें तूं सर्व जाणत आहेसच तेव्हां एकवार क्रोधयुक्त होऊन भाषण केलंस ह्मणजे पुन्हा तुझ्या वाऱ्यासही तो उभा राहणार नाहीं. त्यांतून सर्वपरी रक्षण करणार प्रभू समर्थ आहे तूं काळजी करूं नकोस. (आतां हिचं मन या विषयाकडून काढून दुसरीकडे लावलं पाहिजे असं मनांत आणून) सखे चल आतां आपण थोडी गाणीं ह्मणूं नंतर विराट पर्वांतील कीचकानं द्रौपदीचा छळ केला, ह्मणून भीमानं त्याचा नाश केला ही कथा आपली आजची वाचावयाची

आहे ती वाचून नंतर संध्याकाळीं बागेंत हवा खाण्यास जाऊं. चल येतेसना सखे?

रे०—खरंच बाई चला तर मी सुद्धां कांहीं ह्मणते चला गडे!

सौं०—सख्यानों! मला नाहीं बाई कांहीं सुचत. तें वाचणं तरी गोड कोणाला लागणार? तुह्मी बाई कांहीं ह्मणा मी आपली ऐकते. असो. चला बाई उठा (सर्व निघून जातात)

प्रवेश चवथा समाप्त.

---

## प्रवेश पांचवा.

### राजवाड्यांतील दिवाणखाना.

(सयाजीराव व अनृत व सत्यशील दोघे खुषमस्करे प्रवेश करतात.)

स०—कारे गड्यानों! आज फार दिवसांनीं गांठ पडली नाहीं वरें!

अ०—होय सरकार! खावंदाची आलिकडे मेहेर नजर थोडी कमी झाली आहे ह्मणून!

स०—छे: बेट्यानों! तुमच्यावरची प्रीति कमी ह्मणतां! असें स्वप्नांत सुद्धां होणार नाहीं. अरे तुह्मी तर माझे जीवाचे कलिजे.

सत्य०—(एकीकडे करायची काय मूर्खाची प्रीति) महाराज पण असेंच प्रेम सदोदित असावें ह्मणजे झालें दुसरी कांहीं विनंति नाहीं.

स०—कायरे गड्यानों! पण त्या दिवशीं त्या पुण्यशीलाची खेळण्यांत कशी खोड मोडली! त्यावेळेस बच्यारामजींची खोकडीच वळवली असती पण काय करावें तुह्मी मध्येंच आलां ह्मणून तो वाचला गेला. नाहींपेक्षां या स्वारीचा तडाका त्याला चांगला कळला असता.

अ०—हें काय विचारावें! आपली शक्ति कोणीकडे त्याची कोणीकडे! मला भीतिच होती कीं कोठपर्यंत प्रकरण वाढतें कोण जाणें! पण सरकारांनींहीं आमचें त्यावेळीं ऐकलें ही एक गोष्ट चांगलीच झाली, नाहींपेक्षां अनर्थ होण्याचा वेळ खरा.

सत्य०—(एकीकडे या राजश्रीची त्यावेळीं शंभर वर्षें पुरीं भरलीं असें मला वाटलें होतें. पण तो पूण्यशील पडला विचारी ह्मणून सर्व ठीक झालें.) (उघड) पण सरकार दांडगा खरा तो! आपला आगखो असा त्यानें अपमान करावा! (हळूच दोन मुस्कुटांत नाहीं मारल्या) असो झालें तें बरेंच झालें.

म०—आणि अशा अशक्त, भिकारी व कुरूप मूर्खाला ती सौंदर्यवती वरणार! तेव्हां तिला मूर्ख ह्मणण्यास कांहीं हरकत आहे कीं काय? सांगा कीरे ए बेट्यानों! त्यापेक्षां हा फक्कड हजार वाट्यांनीं बरा खरें कीं नाहीं?

अ०—उघडच आहे. राजबिंडा तो राजबिंडा. तिला

अक्कल असेल तर ना सर्व गोष्टी. जाऊंद्या महाराज; आपण तरी कशाला तिची इच्छा करावी. तिच्यापेक्षां हजारो सुंदर स्त्रिया आपल्यास वरण्यास एका पायावर राजी होतील मग हिलाच घेऊन काय करायचें आहे! खरें कीं नाहीं सरकार?

सत्य०—(एकीकडे तूं पुष्कळ इच्छा करशील पण हंसाला टाकून कावळ्याला ती कशाला माळ घालील! ती काय मूर्ख आहे! आणि तिचें स्वरुप कोणीकडे, शहाणपण किती, गुण काय. वरें इतकेंही असून त्या पुण्यशीलाची हा मूर्ख बरोबरी करतो. अरे याला त्याच्या नखाची तरी सर येईल काय! त्याची स्पर्धा करणार या कनकनगरांत तर मला कोणी दिसत नाहीं मग हा नर त्याचा नोकर सुद्धां शोभणें कठीण! तीनें निवड केली ती अगदीं बरोबर आहे. शाबास सौंदर्यवल्ली! धन्य तूं! तुमचा उभयतांचा जोडा परमेश्वर सुखी राखो.) उघड जाऊं द्या कीं सरकार मुर्खाच्या नादीं लागून मूर्ख कोणी व्हावें! ती आपल्या योग्य मुळींच नाहीं. आपल्याला शोभण्यासारख्या शेंकडो मुली महाराजांनीं पाहून ठेवल्या आहेत. आपण हिचें नांव सुद्धां घेऊं नये. खरें कीं खोटें मित्रा?

स०—भाणखी गड्यानों! दुसरी कांहीं आनंदाची खबर तुह्मी ऐकलीत काय! आतां तर सर्व काळजी

दूर झाली. अरे! या बापुचें नशीबच चांगलें!

अ०—सरकार! काय काय ती अशी आनंदाची खबर! आपण सांगितल्या शिवाय आह्मांस कळण्यास मार्ग कोणचा?

सता०—(एकीकडे परमेश्वरा त्या उभयतांस सुखी राख ह्मणजे झालें कारण या मूर्खास आनंदाची खबर ह्मणजे त्या उभयतांस कांहीं तरी अनिष्ट असावें दुसरा कशानें याला आनंद होणार.) (उघड) कोणची ती बातमी सरकार सांगा पाहूं!

स०—एकून तुह्माला कांहींच ठाऊक नाहीं तर! काय बेटे मूर्ख! अरे परवा तो भिकारी व ती सौंदर्यवल्ली एकांतीं कांहीं बोलत बसलीं होतीं इतक्यांत ताईला तें कळलें आणि ते काय करीत आहेत हें पाहण्याकरितां ती तेथें गेली. मग जी गंमत झाली (हः हः हः हसतो) बरी गाढवाची खोड मोडली. एकांतीं गुळगुळ गोष्टी सांगायला पाहिजेत नाहीं! पाहूं आतां कशा गोष्टी सांगतोस तो! माझ्या प्रिये बरोबर आणि हा मूर्ख गोष्टी सांगतो!

अ०—एकांतीं दोघे गोष्टी सांगत होते! आणि त्यांस भीति व लज्जा मुळींच वाटली नाहीं! मी ह्मणतो जनाची राहिली पण मनाची तरी कांहीं लज्जा! काय बेटा खाल्ल्या घराचे वासे मोजणार तो हा! सर्पाचें पिल्लुं झालें ह्मणून दुध पा-

जून दया करितां कामा नये. सापडेल तेथें टोकलेंच पाहिजे. त्याचा तरी काय दोष जसें बीज तसा अंकुर!

सत्य०–(एकीकडे आधींच हा एक मूर्ख आणि हे तोंड पुजारी शतमूर्ख! काय अक्कल पहा? इतकें समजत नाहीं. अरे त्या पुण्यशीलाचें बीज उत्तम ह्मणून तोही उत्तम या राजेश्रीचे मात्र बिजाचा घोटाळा दिसतो. उघडच आहे त्या माहामायेचे काय खेळ कमी आहेत तसेंच यांचें बीजही असेल. अरे त्या उभयतांचें नातें पती व स्त्री हें आहे. लोकव्यवहार रीतीनें झालें नाहीं ह्मणून काय चिंता आहे? जें त्यांचे मनांनीं केलें त्याप्रमाणें त्यांचें सद्वर्तनही आहे असें असतां हा मूर्ख तिला 'माझी प्रिया' असें ह्मणतो! काय हें पातक! पातिव्रत्य स्त्रियेस असें पापबुद्धीनें पाहणें! हरहर!! परमेश्वर या कृत्याबद्दल खचीत जाब घेईल. असो. पण याचे बोलण्यावरून त्या उभयतांवर खचित कांहीं तरी संकट आलें असावेंसें दिसतें बरें ऐकूं तर खरें पुढें काय सांगतो तें! सांगणार काय बहुतकरून कांहीं तरी दुःखकारक वर्तमान असेल उघड) मग पुढें काय झालें सरकार!

स०–अरे! पुढें काय विचारतोस? असें ताईनें पाहिलें मात्र आणि तिच्या तळव्याची आग मस्तकांत गेली. मग काय विचारतां! तिनें महाराजांस

बोलावून आणून तें सर्व दाखविलें! महाराजही ताईच्या अर्ध्या वचनांतच! तिची क्रोधयुक्त मुद्रा पाहून त्यांसही अत्यंत क्रोध आला व आपली मुलगी वगैरे कांहीं एक मनांत न आणतां तिला एकदम बंदीवानासारखी पहाऱ्यांत ठेवली व त्या भिकाऱ्यास येथून तावडतोब निघून जाण्याचा हुकूम केला. (अनृताच्या हातावर हात मारतो) आतां राज्यही आपलें आणि सौंदर्यवल्लीही माझीच! कां मित्रा? कशी माझी चैन आहे! आतां मी राज्यावर बसलों ह्मणजे मग करीन ती पूर्वदिशा. आणि फक्कडाला स्त्री फक्कड! मग तिला सुद्धां मी आवडेन खरें कीं नाहीं? बोलाकीरे बेट्यो! गप्प कां बसला?

अ०—एकूण असें झालेंना! वा: काम झालें. आतां काय. मग सरकार आपल्याला बक्षिस?

सत्य०—(एकीकडे हरहर! परमेश्वरा!! काय हें? अरे सत्याचा नेहमी जय असतो हें ह्मणणें अगदीं खोटें तर! छेः पण असें कधीं होणार नाहीं. कारण यद्यपि खोट्यास प्रथम दर्शनीं यश आलें तथापि अंतीं सत्याचाच जय होणार. काय पण त्या माहामायेचें कृत्य! महाराज इतके विचारी ह्मणवीतात पण त्यांस सुद्धां हिनें वेड लावलें आं? काय करतो विचारा सापडला हिच्या तावडींत!

पण कालचीच ही गोष्ट आहे तेव्हां बहुतकरून पुण्यशील अद्याप गेले नसतील. तरी आपण त्यांचा शोध करून त्यांची गांठ घ्यावी व ते सांगतील तें सहाय त्यांस आंतून करावें हें योग्य कारण सुसंगतीनें मनुष्याचें कल्याणच होणार. या मूर्खाजवळ राहून अपयशाला व पातकाला मात्र धनी व्हावें हें नीट नव्हे. आतां ही जरी गोष्ट करणें तरी फार चोरून केली पाहिजे कारण ह्या मूर्खाला कळलें तर हा मजवर आतांच संकट आणील. असो आतां व्यर्थ वेळ घालवून उपयोग नाहीं. येथून कशा तरी युक्तीनें लवकर जावें हें बरें. उघड) एकूण अशी गोष्ट झाली तर. बरें झालें तें बरेंच झालें.

स०–(अनृतास मंदील देऊन) हें घे बक्षीस! अरे तूला काय कमी आहे! अरे मी राज्यावर बसलों ह्मणजे प्रधान तूं! पण हा सत्यशील कायरे मनां- तल्यामनांत पुटपुटतो आहे आणि तोंड कां असें केलेंन! त्याला मंदील दिला व प्रधान करीन ह्मणून सांगितलें ह्मणून! अरे हें घे तूला कडें! तो प्रधान आणि तूं सेनाधीश मग झालें कीं नाहीं! अरे तुह्मी उभयतांही मला सारखेच जास्त कमी कोणी नाहीं.

अ०–महाराज! लक्षांत असलें ह्मणजे झालें, नाहीं तर एकदां सिंहासनारुढ झालां ह्मणजे ओळख

सुद्धां रहाणार नाहीं. तेव्हां असें न व्हावें येवढीच्च विनंती आहे सरकार!

**सत्य०**—(एकीकडे हवें कोणाला मूर्खाचें बक्षिस व तें सेनाधीशत्व! नको रे बोवा आपल्याला! ह्मण-तातना मूर्खांचा राजा होऊं नये पण शहाण्या-चा गुलाम व्हावें. याच्या सैनाधीशत्वापेक्षां पुण्यशीलाचें दास्यत्व बरें. उघड) महाराज गरी-बास येवढें बक्षिस कशाला व सेनाधीशत्व कर-ण्याची माझी योग्यता आहे कोठें! आमचें काय गरीबाचें खायला अन्न व पांघरायला वस्त्र असलें ह्मणजे त्यांत आह्मांस संतोष आहे.

**स०**—बरें चला बरीच गंमत झाली ह्मणायची. एक काळजी तर दूर झाली. पण कायरे गड्यानों आतां किती वाजले असतील बरें! कारण तिच्या-कडे उद्यां दोन प्रहरीं जावें असा विचार आहे. आतां आजच्च गेलों असतों पण तिला आज फार वाईट वाटत असेल कारण त्या भिकाऱ्यास येथून हाकून लाविलें आहे तेव्हां उदईक जाऊन तिची समजूत करून आपला कार्यभाग करून घ्यावा ह्मणजे झालें खरें कीं नाहीं मित्रांनों!

**अ०**—महाराज हेंच्च योग्य दोन प्रहरची वेळ फार उत्तम असते कारण त्यावेळीं महालांत ती एकटी सांपडेल. आपण जाऊन थोडी समजूत केली कीं झालेंच्च काम समजा.

सत्य०—(एकीकडे काय करावें! हा मूर्ख उद्यां तिचा छळ करण्यास जाणार! अगोदरच पतिवियोगानें तिचा जीव तळमळत असेल आणि तशांत ह्याचा त्रास! काय करूं रे! इलाज नाहीं! असो पण एक बरें आहे कीं तो उद्यां जाणार. परमेश्वरास तिची काळजी! फार उत्तम आहे. (मनांत पण आतां येथून जाण्यास काय युक्ति करावी एकदां तेथें पायपोस बसले ह्मणजे खोड मोडेल उघड) सरकार! मला थोडें काम आहे. मी रजा घेऊं काय!

स०—मलाही ताईकडे जायचें आहे. बरें मित्रांनों! तुह्मी जा आतां. मीही तिकडे जातो. उद्या या हो. कोण आहे रे तिकडे चाफाजी जा माझा पोष-ख आण. लवकर ये हो जा.

चा०—जी सरकार जातो. (निघून जातो).

अ०—बरें मी येतो तर उद्या सकाळीं सरकारच्या दर्शनास येतो. येऊं तर! (निघून जातो)

सत्य०—बरें मी ही येतो (इतक्यांत हुजऱ्या पोषाख घेऊन येतो.)

स०—(पोषाख करून आरशांत पहातो व मीशीवर ताव देऊन) कां कसा फक्कड दिसतो. सर्वांनीं पहात रहावें. अशा राजबिंड्याला आणि ती वश होणार नाहीं! उद्या गेलों कीं काम फत्तेच झालें समज. चाफाजी चल मजबरोबर लवकर गेलें पाहिजे

नाहीं तर ताई रागवेल.

**सत्य०**—(एकीकडे गाढव व तूं बरोबर! गेल्याबरोबर लाथा मिळाल्याच समज असो उघड) बरें महाराज येतो मी (निघून जातो).

**स०**—चला चाफाजी (सयाजी व चाफाजी निघून जातात.)

प्रवेश पांचवा समाप्त.

---

**अंक पहिला समाप्त.**

---

# अंक दुसरा.

## पात्रें.

पुण्यशील.........................माजि प्रधानपुत्र.
सत्यशील..........सयाजीचा खुष्मस्कन्या.
सयाजी.......................राणीचा भाचा.
सौंदर्यवल्ली.........................राजकन्या.
मदनिका.................................राणी.
चार रामोशी......................रामोशी.
शौर्यसागर................................राजा.
भालदार चोपदार व इतर मंडळी. } ...............सेवकजन.

### प्रवेश पहिला.

( शहरा बाहेरील मैदान. )

पु०–(मनाशींच) वाः आतां मात्र मी बरोबर फकीर बनलो खरा. आतां मला कोण ओळखणार आहे. परमेश्वराचे कृपेनें वेषांतर तर उत्तम झालें. पण प्रारब्धाची गति कांहीं विचित्र आहे कारण—

#### पद.

**काय गती दैवाची ॥ नकळे लीला प्रभुची ॥ धृ ॥**
**सकलही सौख्यें अनुकुल असतां ॥ झालों निराधार. क्षणही न लगतां ॥ अघटित करणी साची ॥ न० ॥**

माझा थोर कुलांत जन्म झालेला असून सर्व गोष्टींची

अनुकूलता असतां त्या सर्वांचा एका क्षणांत लोप होऊनें निराधार एखाद्या फकीरासारखा मी आतां रानावनांतून फिरणार काय? तस्मात इहलोकींचें सौख्य नाशिवंत असतां मनुष्यमात्र मायापाशांत बद्ध होत्साता हें माझें तें माझें ह्मणतो हा केवढा मूर्खपणा? परमेश्वरा आज खचित तुझे मजवर महदुपकार आहेत कारण तो सर्व मायापाश आपोआप तोडून टाकून मला तुझें ध्यान भजन पूजन स्वच्छंदपणानें करण्यास सवड दिलीस. असो. इतःपर त्या क्षणभंगूर सुखास मोहून तुझ्या सेवेंत अंतर कधींही पडणार नाहीं अशाच तऱ्हेचें वर्तन ठेवीन. परंतु अरे महा साधूचें एक वाक्य आहे कीं "प्रपंच साधून परमार्थाचा लाभ ज्यानें केला तो एक भला" अरे पण ती आशा मी कशाला करतो! कारण एक तर माझा विवाह झालेला आहे आतां ती जोंपर्यंत् जिवंत आहे तोपर्यंत दुसरा विवाह तर मुळींच करणें नाहीं आणि तिची व माझी पुन्हा भेट होणें कठीण तेव्हां माझा प्रपंच व्हावा कसा! बरें तिच्याशीं झालेला संबंध तोडून टाकून या स्थितींत सर्व आयुष्य घालवावें ह्मटलें तर तिला ही गोष्ट कळल्यास केवढा अनर्थ होईल शिवाय एकवार तिचें पाणिग्रहण केलें आणि आतां तिचा त्याग केला तर मला केवढें पातक लागेल व तिच्या मी ऋणांतून मुक्त कसा होईन!

काय या स्त्रिया! माया ह्मणून जी ह्मणतात तीच ह्या प्रत्यक्ष होत. कारण आमचे महाराज इतके विचारी असतां यःकश्चित् स्त्रीनें त्यांस इतकें वेड लावावें काय? अरे तिच्या तोंडांतून कोणचीही गोष्ट निघण्याचा अवकाश कीं, महाराजांनीं " जी " ह्मणून एकाद्या चाकरासारखें तें काम करण्यास तयार व्हावें अं! असें असतांना आह्मा उभयतांविषयीं जें जें त्या महामायेनें महाराजांचे मनांत भरवून दिलें असेल तें अक्षरशः त्यांस खरें वाटलें असेल यांत नवल तें काय? पण " स्त्रीबुद्धि प्रलयंगतः " या वाक्याची त्यांस अगदीं आठवण कशी राहिली नाहीं? उघडच आहे, कोठून रहाणार? अशी आठवण राहती तर मायेचा प्रभाव तो काय? असो, याबद्दल त्यांस दोष लावणें ह्मणजे वेडेपणा होय. आपले प्रारब्धींच असें लेखन केलें होतें ह्मणूनच त्यांस तरी तशी बुद्धि झाली असावी. अरे पण मी एवढ्या ब्रह्मज्ञानांत शिरलों, पण मजवाचून माझ्या प्रियेची स्थिति काय झाली असेल! कारण एकादे दिवशीं माझी भेट झाली नाहीं अथवा मी तिच्या दृष्टीस न पडलों तर तो सर्व दिवस तिचा काळजींत जात असे आणि आतां तर तिचा माझा नेहमीचा वियोग झाला. मग तिच्या दुःखास काय पहावयाचें! असो, मी तरी काय करूं? माझा इलाज असता तर मजकडे त्याचा दोष. प्रिये.

दुःख नको करूं बरें; कारण माझ्या वियोगानें तुझे पंचप्राण व्याकुळ होत असतील. देवा, अरे तिला राजकुळांत उत्पन्न केलेंस त्याप्रमाणें कांहीं तरी सुख द्यायचें होतेंस. प्रिये, हा वियोगही घटकाभर सहन करशील झटलें तथापि ते दुष्ट तुझा छळ करतीलच. मग मात्र तुझा प्राण राहणें कठीण. असो, हे सूर्यनारायणा, हे सर्व देवतांनों, मझ्या प्रियेचे नेहमीं संनिध वास्तव्य करून व आपल्या कृपेचें छत्र अक्षयी जागृत ठेवून पोटच्या पोराप्रमाणें सर्व दुःखांपासून व अरिष्टांपासून तिचें रक्षण करावें, एवढीच माझी आपणास विनंती आहे. आपणाशिवाय आतां तिला कोणाचा आधार नाहीं. हा प्रिये! हा सौंदर्यवल्ली!! अरे पण मी असा शोक करीत केवढा वेळ बसणार? मला जर कोणी पाहिलें तर काय ह्मणेल! अरे ज्या प्रभूनें तिला निर्माण केलें तोच तिचें रक्षण करणार समर्थ आहे. असो; देवा, मी आतां येतों, विनंती लक्षांत ठेव. दुसरें कांहीं मागणें नाहीं (कांहीं पावलें चालतो, पण पुढें जाववेना पाहून) काय, माझें पाऊल मलाच उचलत नाहीं! उघडच आहे कारण–

## श्लोक.

मम सुदैव हें दुःखा झालें॥ सुकारण चांगलें॥
पद न उचले माया पाशें॥ द्विधा मन जाहलें॥
हृदय फुटनें जाऊं कैसा॥ कांहीं न सुचे मला॥
दृढ विरह हा सखये भारी॥ जाळी मन्मनाला॥

अरे मना, किती तूं मुर्ख आहेस, व्यर्थ लोभास गुंतून नाशास कारण होऊं पहातेस, तुला ह्मणावें तरी काय? चल मूर्खा! त्याची तुला मुळींच काळजी करण्याचें कारण नाहीं. होणें जाणें सर्व भाग्याधीन आहे. सखे, येतों तर आतां. हे सर्व वनदेवतांनों, वृक्षपाषाणादि वस्तूंनों, हे मित्रा भास्करा; या देहाचें रक्षण करणार आपण आहांत. ( चालूं लागतो इतक्यांत सत्यशील धांवत धांवत येतो ).

सत्य०–पुण्यशील महाराज! अहो पुण्यशील महाराज! थांबा मी आलों. (मोठ्यानें हाक मारतो.)

पु०–(दचकून) हा कोण बरें मजकडे धांवत येत आहे! कां मी अद्यापि राजाच्या नगरासमीप आहें ह्मणून मला राजानें धरण्याकरितां तर याला पाठविलें नसेलना? तेंव्हां आपण लवकर जावें हें बरें. (त्वरेनें चालूं लागतो.)

सत्य०–महाराज, आपण मनांत कोणचीही शंका बाळगूं नये. हा आपला दास आपल्या सेवेंत हजर राहण्याकरितां आपणाकडे येत आहे, याचा अव्हेर करून जाऊं नये. थोडें थांबावें सरकार.

पु०–अरे हा कोणी तरी आपल्या साह्यार्थ येत आहेसें दिसतें. (उभा राहून) तूं कोण व माझे मागें कशाकरितां धांवत येत आहेस?

सत्य०–(येऊन नमस्कार करून) सरकार मी सयाजीचा खुषमस्कऱ्या, माझें नांव सत्यशील. आपली झालेली

हकीकत ऐकून अत्यंत दुःखित होत्साता त्या दुष्टाचे संगतीस मुळींच राहूं नये असा निश्चय करून आपली सेवा करावी या हेतूनें आपणांकडे आश्रयास्तव आलों आहें. सरकार आतां मी सयाजीजवळचा मनुष्य खरा, परंतु आपलें साह्य करणारा आहें. केवळ आपला नाश ते कसा करतात हें समजून घेऊन आपणांस योग्य वेळीं कळवितां यावें एतदर्थ त्यांजपाशीं होतों. सरकार काय सांगूं? त्याचें एकेक भाषण ऐकून आंगावर शहारून कांटा उभा राहतो व तळव्याची आग मस्तकांत जाऊन त्याचा एकदम प्राण घ्यावा असें वाटतें, पण काय करूं! इलाज नाहीं. सरकार नको त्याचा संग, कारण.—

## पद.

नको मज दुष्ट संगति । पावेन खचित मी नीचस्थिति ॥ ध्रु. ॥ प्रथम पदीं जरि ती सुखदचि दिसते । परिणामीं तीच दुःखद होते ॥ अनुभव याचा घेऊन हस्तें । आलों मी तुह्मां प्रति ॥ नको० ॥

सरकार! इतःपर त्याचे शब्द व त्याचीं कृत्यें माझ्यानें पहावत नाहींत. महाराज! या दासास आश्रय देऊन समागमें घेऊन चलावें. आपल्या संरक्षणार्थ हा देह खर्चण्यासही मी तयार आहें. तेव्हां माझा अव्हेर करूं नये. महाराज आपणांकडे देवानें कशी डोळे-

झाली केली समजत नाहीं! या काळांत सत्यास जयच नाहीं काय!

पु०—सत्यशील ! अरे तूं समजूतदार असून असें वेड्या सारखें कसें बोलतोस? कारण सत्याचा जय सर्वकाळ सारखाच होतो. आतां प्रथमदर्शनीं सत्याचा अपजय झाला असें जरी वाटतें, तथापि अंतीं सत्याचाच जय होणार. पण काय रे सत्यशीला, तूं त्या सयाजीचा मनुष्य एकदम मजजवळ येऊन भलतीच विनंती करीत आहेस, यावरून त्यानेंच तुला माझ्या प्राणनाशास्तव पाठविलें नसेल-सें कशावरून? सत्यशीला, अरे अशा कपट बुद्धीनें तूं आला असल्यास आल्या मार्गानें परत जा, नाहीं तर तुला आश्रय देणें एकीकडेच राहून (तरवार सरसावून) हिचा मात्र आश्रय मिळेल याचा विचार करून येथून मुकाट्यानें निघून जावेंस हें बरें.

सत्य०—महाराज, असा घात करणारा मी मनुष्य नव्हे; महाराज (आकाशाकडे बोट दाखवून) हा सूर्यनारायण साक्षी, मी आपल्या चरणांची सेवा करण्याकरितांच सत्यबुद्धीनें पायांपाशीं आलों आहें. (पायांवर मस्तक ठेवून) सरकार माझी विनंती मान्य केलीच पाहिजे.

पु०—हं! हं! हं! सत्यशीला, अरे तुझें मन पहाण्याकरितां बोललों, तों तूं एकदम शपथ वाहिलीस ना!

असो कांहीं काळजी करूं नको; यावज्जीव तुझें रक्षण करीन. परंतु सत्यशीला ! तूं माझ्या प्रियेजवळ रहावेंस अशी माझी इच्छा आहे. कारण तुझ्या इमानीपणाविषयीं पुष्कळजणांच्या तोंडून ऐकलें होतें, पण आज प्रत्यक्ष अनुभव आला. तशांतून तिला आतां कोणाचा आधार नाहीं व ते दुष्ट तिचा छळ केल्यावांचून राहणार नाहींत, तेव्हां एकादी सल्लामसलत देण्यास जिव्हाळ्याचें माणूस कोणी पाहिजे कीं नाहीं ? तुझी कशी काय मर्जी आहे बोल पाहूं ?

सत्य०—महाराज ! हुकुमाबाहेर हा तावेदार नाहीं; कारण आपली सेवा केली काय व त्यांची केली काय एकच, परंतु ते दुष्ट ताईसाहेबांचा छळ करतील, आपली निर्भत्सना करतील, मग ती माझ्यानें सहन न झाली ह्मणजे व्यर्थ माझे हातून एकादा अनर्थ घडेल. तेव्हां त्यापासून चार पावलें दूर रहावें एवढी इच्छा होती याउपर जसा हुकुम होईल तसा.

पु०—सत्यशीला, तूं ह्मणतोस हें खरें, परंतु माझें ह्मणणें येवढेंच कीं, माझ्या प्रियेचें कुशलवृत्त मला समजावें असें वाटल्यास अगर माझें तीस कळविणें झाल्यास दुसरा कोणचाही मार्ग नाहीं. मी येवढा वेळपर्यंत मोठ्या विचारांत पडलों होतों व माझें पाऊलही पुढें चालेना, इतक्यांत तूं येथें

आलास. सत्यशीला, आज जगन्नियंत्याचे मजवर महदुपकार आहेत असें मी समजतों; कारण या समयीं ध्यानींमनीं नसतां तुला बुद्धि होऊन तूं मला साह्य करण्याकरितां आलास, ही गोष्ट त्याच्या कृपेशिवाय होणें आहे काय. सत्यशीला, तुझे उपकार माझे हातून कसे फिटतील ते फिटोत. असो, मग तूं राहणारना येथें ?

सत्य०–महाराज, मला त्या मूर्ख सयाजीची भीति वाटते. तेंही असो, पण ती महामाया कोणचे वेळीं काय अरिष्ट आणील याचा मला नेम लागत नाहीं; कारण तिच्या कृति आपण सर्व जाणतच आहां. सरकार आतां आपला आग्रहच दिसतो त्या अर्थी मी ही गोष्ट कबूल करितों; परंतु आपलें कसें होईल ही एक काळजी राहतेच. कारण आपण एकटे, आपणांस कधीं प्रवास माहीत नाहीं, त्यांतून मार्गांत कोणकोणचीं संकटें व दुःखें येतील याचा भरंवसा नाहीं. तेव्हां–

## पद.

जाऊं नका तुह्मी वनाला ॥ महाराज त्यजुनि आह्माला ॥ ध्रु. ॥ विरह हा तुमचा दुःसहचि अती ॥ प्राण न राहील जाणा निश्चिती ॥ विनवूं तुह्मां किती दीन मी या रिती ॥ वदुं काय तुमच्या प्रियेला ॥ जाऊं० ॥

महाराज, आपण मला तरी बरोबर घेऊन चला,

अगर जवळच आसपास कोठें वास्तव्य करा येवढें ह्मणणें आहे.

पु०—अरे छेः! अशी गोष्ट करणें नीट नव्हे; कारण तूं असें पहा कीं, सर्व जन सारखे नसतात, कोणी आपले हितचिंतक असतात ते आपलें कल्याण करण्याविषयीं झटत असतात व जे दुष्ट शत्रू असतात ते सूड उगविण्याकरितां आपल्या नाशाची संधी पहात असतात. अधींच महाराजांचा मजवर अतिशय कोप, तशांतून मी अद्यापि त्यांचे नगरांत आहें असें त्यांस कळलें तर राजाज्ञाभंग केला हा दोष मजवर येऊन त्या उभयता दुष्टांस माझा नाश करण्यास आयण होऊन सवड दिल्यासारखें होईल, व तेणेंकरून आपणावर आजच संकट येईल. याकरितां परमेश्वरावर भरंवसा ठेवून मी तर जाणारच. ईश्वरी नेमानेम असल्यास पुनरपि आपल्या भेटी होतील. बरें, यद्यपि चोरासारखा राहिलों व ही बातमी राजास कळली नाहीं, तथापि घुबडासारखा घरांत राहून व्यर्थ जन्म घालवावा हें तुला नीट दिसतें काय? छेः! सत्यशीला, अरे हा वीराचा बच्चा आहे. अरे, परराज्यांत गमन करून बुद्धिकौशल्यानें व तरवारीचे जोरावर नांव मिळवीन व मी आपली प्रिया आपले हस्तगत करून घेईन. आतां मध्यंतरीं माझ्या प्रियेच्या जीवितास कांहीं अपाय झाल्यास या महाराजांपासून त्याचा जाब घेईन हें तूं पक्कें

समज. अरे, माझे आंगांत पराक्रम व गुण कमी आहेत काय? परमेश्वरकृपेनें सर्व विद्या मला अवगत आहेत, तूं मजविषयीं मुळींच काळजी करूं नको. आतां येवढें मात्र खरें कीं, कांहीं दिवसपर्यंत आपल्यास या स्थितींत रहावें लागेल. असो; परमेश्वर-रक्षणकर्ता समर्थ आहे. पण सत्यशीला, कायरे करूं माझ्या वियोगानें माझ्या प्रियेची काय अवस्था झाली असेल. हा प्रिये! हा सौंदर्यलक्ष्मी!! (मूर्छित होतो)

सत्य०—सरकार, हं! हं! हं! हें काय? येवढा वेळ पर्यंत शौर्याच्या गोष्टी सांगून एका क्षणांत दुःखसागरांत निमग्न झाल्याप्रमाणें ही काय अवस्था? महाराज! आपल्यास पदोपदीं ताईसाहेबांची आठवण होणार मग फार जड जाईल तेंव्हां मी सांगतों येवढें ऐकावें व लांब जाऊं नये.

पु०—(थोडा राग आणून) सत्यशीला, काय व्यर्थ भ्रांतींत पडला आहेस. अरे वेड्यासारखें काय करतोस, माझा एकवार झालेला निश्चय कधींही टळणार नाहीं, तेंव्हां तूं येथें राहणार किंवा कसें सांग पाहूं?

सत्य०—सरकार हें काय? कमीजास्त बोललों असल्यास क्षमा असावी. मी आपल्या आज्ञेबाहेर मुळींच नाहीं. सरकार पण जसा आपला मजवर पूर्ण भरंवसा आहे तसा ताईसाहेबांचा कसा बसणार?

पु०— सत्यशीला, तुला मी एक पत्र देतों हें पत्र तूं तिला कोणाचे नकळत पोंचतें होईल अशी तजवीज

कर, ह्मणजे सर्व ठीक होईल. त्याप्रमाणें दुरूनतर तिची भेट होईल अशीही तजवीज कर व मला तुमचें उभयतांचें कुशल वृत्त कळवीत जा. या गोष्टीची हयगय मुळीं करतां कामा नये समजलास ?

सत्य०—महाराज, त्याविषयीं आपण मुळींच काळजी करूं नये, कारण या कुडींत प्राण आहेत तोंपर्यंत ताईसाहेबांच्या केंसासही धक्का लागूं देणार नाहीं. प्रथम या सत्यशीलाचे प्राण जातील, नंतर त्यांचें काय होणें असेल तें होईल. सरकार फार काय सांगूं, ज्याप्रमाणें एकादा आज्ञाधारक पुत्र आपल्या मातेचें रक्षण करतो अगर मनुष्यास सर्व जगांत जो प्राण ही प्रिय वस्तु तिचें संरक्षण करतो तद्वत् त्यांचें रक्षण करीन. सरकार मी आपल्या तोंडानें स्तुति करीत नाहीं; पण माझ्या नांवायोग्य वर्तन करण्यास हा प्राण सुद्धां खर्च झाला तरी करण्यास तयार आहें येवढ्यांत सर्व समजा.

पु०—वाः शाबास! सत्यशीला, मी आपल्या प्रियेविषयीं आतां अगदीं निष्काळजी झालों. सत्यशीला, खरोखर आमचे वरचे तुझे उपकार फिटण्याची मुळींच आशा नाहीं, असो. सत्यशीला, पत्र लिहूं तर.

सत्य०—महाराज, धन्याची सेवा करणार यांत उपकार ते कसले. सरकार लिहावें पत्र आतां. आपण मात्र आपल्यास जपावें येवढेंच सांगणें आहे.

पु०–अरे, मनुष्य किती जपणार? रक्षण करणारा प्रभु समर्थ आहे. बरं तर पत्र लिहितों–

## पद.

ऐक सखे सुंदरी। लक्षी मम लेखा अंतरीं ॥ ध्रु. ॥
सन्मार्ग आपण आचरला ॥ ह्मणुनि करुणा आली प्रभूला ॥ सत्यशील मित्रचि जहाला ॥ शुद्ध भावास्तव विश्वासिला ॥ प्राणापरी राक्षिल हा तुजसी। त्वद्दद कळवीत जा तूं त्यासी ॥ शोक मनीं तूं व्यर्थ न करी ॥ लोभ ठेवी पूर्णचंद्रापरी ॥ ऐक० ॥

हं! हें बघ, यांत कांहीं कमजास्त पाहिजे काय? हवें असल्यास सांग. ह्मणजे त्याप्रमाणें करतों.

सत्य०–अहाहा! किती चातुर्यानें पत्र लिहिलें आहे. बरें आहे सरकार, यांत जास्त तें काय पाहिजे? सर्व मजकूर आलाच आहे. मी अज्ञान काय सांगणार?

पु०–असो; सत्यशीला, आणखी असेच आपण गोष्टी बोलत बसलों तरी त्या कधींही संपणार नाहींत. उलट मोहपाश जास्त उत्पन्न होऊन त्रास मात्र होईल. तेव्हां आतां तूं परत शहरांत गमन कर व मी सांगितल्याप्रमाणें व्यवस्था ठेव, व माझ्या प्रियेस मी कुशल असल्याचें सांगून माझ्या वियोगामुळें होणाऱ्या दुःसह दुःखाचें सांत्वन करून तीस जपत जा दुसरें कांहीं एक सांगणें नाहीं. येऊं तर आतां? (एकमेकास भेटतात व रडूं लागतात).

सत्य०—महाराज, ! हें काय? असें दुःख करूं नका. सरकार, आपण आह्मांस धीर देणार, ते स्वतःच जर दुःख करूं लागलां तर आमची काय बरें अवस्था होईल? सरकार आपणास ताईसाहेबांची काळजी मुळीं सुद्धां करणें नको. ह्या सत्यशीलाच्या देहांत जीव आहे तोंपर्यंत त्यांचे केसांसही धक्का लागणार नाहीं. सरकार, कां व्यर्थ काळजी करतां?

पु०—सत्यशीला, फार उत्तम आहे. मला तिजविषयीं आतां बिलकुल काळजी राहिली नाहीं. सत्यशीला, ये तर आतां. सर्व दुःख गिळून जाऊन तिला नेह-मीं धीर देत जा बरें ! (पुनः गहिंवरतो. )

सत्य०—ठीक आहे महाराज. आपण आपल्या प्रकृतीस मात्र जपत जावें व प्रत्येक मुक्कामाहून कुशलवृत्त कळवीत जावें, येऊं तर ( निघून जातो ).

पु०—परमेश्वरा, एक तर काळजी दूर केलीस. ( तरवार सरसावून ) आतां ही माझें रक्षण करणार. असो, पर-मेश्वरा, जसें आजपर्यंत रक्षण केलेंस तसेंच सदोदि-त करून या दासाचे हेतु पूर्ण कर. हे सूर्यनारायणा, हे वनदेवतांनो, हे वृक्षपाषाणादिवस्तूंनो, हे अष्ट दिक्पालांनो तुह्मांस हा नमस्कार करतों. माझें सर्व-परी रक्षण करणारे तुह्मी आहांत व तुमचेवर सर्व भरंवसा आहे येतों तर ( निघून जातो. )

**प्रवेश पहिला समाप्त.**

## प्रवेश दुसरा.

### आरसेमहाल.

(सौंदर्यवल्ली, अनुराधा, रेवती व सारजादासी प्रवेश करतात.)

**सौं.**—सख्यांनों! कायग करूं? त्या कालच्या प्रसंगाचं स्मरण झालं ह्मणजे बाई आंगावर कांटा उभा राहतोहो! ह्मटलं ह्मणजे मी राजाची कन्या मला आणि असं कां दुःख असावं, पण करायचं काय बाई? जें जें नशीबांत असेल तें तें भोगलंच पाहिजे. देवादिकांना सुद्धां सुटलं नाहीं, मग आह्मी तर काय यःकश्चित् मृत्युलोकींचीं माणसं. पण सख्यांनों! खरंच सांगा, जन्मवेरी असंच कां बाई दुःख भोगायला लागेल. सख्यांनों! काय सांगूं! बायकांचं मेलं असो, पण तिकडचा जीव कांग मी उगीच दुःखांत घातला! कुठं आतां असतील, काय करीत असतील, माझी आठवण झाली ह्मणजे काय अवस्था होईल, किती दुःख भोगावं लागत असेल. नको ग बाई तें मनांत सुद्धां आणणं नको. देवानं इतकी थोर करून या संकटांत घातलन त्यापेक्षां लहानपणींच कां शेवट केला नव्हतान? आणि अजुनही तरी डोळेझांक कां करतो? परमेश्वरा, नको नको तें जगणंही नको आणि तें दुःखही भोगणं नको!

**अ०**—सखे, अग तें कोणाच्या हातीं कां असतं? काय बाई; मेलं किती सांगितलं तरी आपलं ऐकायचंच नाहीं.

असं काय बरं सखे! तुझं दुःख पाहून कनइ आमचं हृदय करपून जातं हो! आतां दुःख तरी बाई किती करायचं ते तरी एकदा कळूं दे कशी?

सौ०- सख्यांनों, तुह्मी मजवर रागावतां, मला बाई कळत कां नाहीं? मेली मी पुष्कळ मनाची समजूत करते हो, पण करूं काय राहवतच नाहींग. काय मेली मी पातकी. मजपासून कोणा कोणाला तरी दुःख होणार कोण जाणं! सख्यांनों, या दुःखावस्थेंत सर्वस्वी आधार काय तो तुमचा. तेंव्हां तुमच्या ह्मणण्याप्रमाणं वर्तन होत नाहीं ह्मणून रागावणार तर नाहींना. सख्यांनों, ही तुमची धाकटी अज्ञान बहीण आहे, हा तुमचे पुढं पदर पसरला आहे, तुमचे इच्छेप्रमाणं माझे हातून वर्तन होत नाहीं याबद्दल मनांत किंचित् राग न आणतां क्षमा करा, व लोभ कमी होऊं देऊं नका एवढंच मागणं आहे.

रे०—हं! हं! हं! सखे. हें काय? अग बाई तुझ्या अन्नावर आह्मी येवढ्या वाढलों आणि तूं आमचे पुढं पदर पसरतेस तुला ह्मणावं तरी काय! सखे, तुझ दास्यत्वही करण्याची आमची योग्यता नाहीं आणि हें भलतंच काय करतेस? हर हर! परमेश्वरा, काय हें. सखे आह्मी तुजवर खरोखरी मुळींच रागावलों नाहीं. तुझं दुःख आह्मी सर्व जाणतों. पण बाई उगींच आपल्या जिवास त्रास करून घेतेस ह्मणून बोलायचं हो. दुसरं काय! अग तुझी अशी अवस्था पाहून आ-

झांस रात्रंदिवस सखे चैन नाहीं. पण बाई करायचं काय? कांहीं विवेक केला पाहिजेना. प्राणिमात्रास सुखदुःख समसमान असतं. अग सध्या आपले वाईट दिवस आहेत, पण हेच सदोदित राहतात हें थोडंच आहे. हेही दिवस जाऊन सुखाचे दिवस लवकरच येतील असं समज. सखे, नाहींचना बाई ऐकायचं? असं काय मेलं तें! नको ग दुःख करूं ऐकलसना? ( जवळ जाऊन डोळे पुसते ).

सौ०—तुझी सांगतां तेंच ऐकते हो. मी नाहीं का झणते का मला समजत कां नाहीं? पण एकादेवेळीं स्मरण झालं झंटलं झणजे अंमळ बाई वाईट वाटतं, दुसरं काय? बरं सख्यांनों, कांहीं कर्मणुकीकरितां एकादं गाणंबिणं तरी झणा ग!

अ०—तें काम माझं, कोणचं गाणं झणूं? कंकण झणूं किंवा बेलबाग, कां कृष्णाचं एकादं झणूं, तूं सांगशील तें झणते.

सौ०—अग कोणचं तरी चांगलसं झण झणजे झालं.

र०—अग हीं कसलीं गाणीं! या वेळीं का हिला गोड लागणार आहेत? अग हिच्या सांप्रतच्या स्थितीस अनुसरून असं एकादं झण, येवढं कां समजत नाहीं तुला ?

अ०—बरं बाई तसं झणते हो— .

## पद.

भूप तनयेसि मनीं विचार वाटला । ऐक सखे तोचि मी सांगते तुला ॥ धृ ॥ यौवनभरीं आली जयिं कष्टी होतसे ॥ मिळेल कसा पती मन ज्यावरी असे ॥ अनुमोदन वाडवडिल देतीं मज कसे ॥ लेखिति त्या शत्रु सम ज्या मी वरितसे ॥ हेतुसफलार्थ वक्रतुंड नवसिला ॥ भू० ॥

**सौं.**—सखे पुरे गडे. पुढचं सर्व यावरून समजले हो मी. किती गोड गाणं तरी. तुला तरी बाई चांगलीं गाणीं येतात हो. ती राजकन्याही माझ्याच सारखी वेडी होती तर. ( इतक्यांत सत्यशील प्रवेश करतो, व हा सयाजीजवळचा मनुष्य आला हें पाहून सर्वजणी थोड्या भीतियुक्त होत्सात्या उठून लांब उभ्या राहतात. )

**सत्य.**—( सौंदर्यवल्लीस नमस्कार करून ) ताईसाहेब, हा आपला विश्वासू व आज्ञाधारक दास कांहीं खबर कळविण्याच्या हेतूनें आला आहे. मनांत कोणतीही शंका धरूं नये ( पत्र पुढें ठेवतो ) हें पत्र वाचून पहावें ह्मणजे सर्व शंकेची निवृत्ति होईल सरकार.

**सौं.**—( सख्यांस ) सख्यांनों, पण तें कोणाचंग पत्र आहे? नाहीं तर दुसऱ्याचं कांहीं भलतंच पत्र असल्यास उगीच या हातास बाई विटाळ होईल. सख्यांनों पहाग तें कोणाचं पत्र आहे तें ?

**सत्य०**—ताईसाहेब ! तें फक्त आपणच वाचलें पाहिजे.

दुसऱ्याचे हातीं मी देणार नाहीं. ज्यांचे करितां आपणास इतकें दुःख होत आहे त्यांचेंच आहे इतरांचें नाहीं येवढें मात्र शपथ पूर्वक सांगतों.

सौ०—काय, तिकडचं पत्र आणि तें तुमचे हातीं असं बाई होईल तरी कसं ! कारण तुह्मी त्या दुष्टाचे मित्र आहांत हें तर तिकडे माहित आहे तेव्हां या बोलण्यावर माझा कसा वरं विश्वास बसेल ? भलतीच गोष्ट सांगून माझा नेम मोडून पापांत पडण्याचा व्यर्थ प्रयत्न कां करतां? अशा गोष्टीनं माझं मन कधींही फिरणार नाहीं हो.

सत्य०—ताईसाहेब, खोटी गोष्ट सांगून एकनिष्ठ पातिव्रत्याचा भंग करण्याचें पातक घेणारा हा दास मुळींच नाहीं. परमेश्वर साक्षी हें त्यांचेंच पत्र. वाचून पहावें ह्मणजे खात्री होईल.

सौ०—अग बाई, तुह्मी शपथ वाहता या वरून तें असत्य असेल असं माझ्यानं एकाएकी ह्मणवत नाहीं. असो परमेश्वरा ! तूला माझी काळजी व माझ्या व्रताचं रक्षण करणारही तूंच आहेस. (पत्र घेऊन उघडते) सख्यांनों अक्षर तर बाई तिकडच्या सारखं दिसतं आहे. (पत्र वाचते) अहाहा किती गोड तरी पत्राची रचना केली आहे! (मनाशींच एकून असं आहे काय) सत्यशीला तुह्मी स्वतः त्यांस भेटून आलांना? धन्य तुह्मी! तुमच्या दर्शना-

चा लाभच ह्मणायचा तर. पण बाई तिकडची प्रकृति कुशल आहेना?

सत्य०—ताईसाहेब, महाराज कुशल आहेत. मी समागमें येतो ह्मणून बहुत प्रकारें विनवणी केली परंतु ती व्यर्थ झाली. ते ह्मणाले अरे मी वीराचा बच्चा आहे माझ्या विषयीं मुळींच काळजी करण्याचें कारण नाहीं. आपण येथें एकटे आहांत. व ते दुष्ट आपला छल करतील, तसेंच आपल्यास वियोग दुःख अत्यंत होत असेल तेव्हां आपणास धीर व एखादेकामीं सल्लामसलत देण्यास त्याच प्रमाणें त्यांचे कडून कुशल वृत्त येईल तें कळविण्यास कोणी तरी पाहिजे एतदर्थ मला त्यांनीं सरकारचे चरणापाशीं रहाण्याची आज्ञा केली आहे. मी त्यांकडून प्रत्येक मुक्कामाहून पत्र पाठविण्याविषयीं वचन घेतलें आहे. ताईसाहेब, तेव्हां आपल्यास मी तें कळवीत जाईनच. माध्यंतरीं आपणास या दासाची गरज लागल्यास दासीद्वारें कळविण्याची मेहेरबानी व्हावी ह्मणजे हा दास येऊन हजर होईल. ताईसाहेब, ज्या प्रमाणें एखादा आज्ञाधारक पुत्र आपल्या मातेची सेवा करण्यास सिद्ध असतो तद्वत हा आहे. फार काय सांगूं ह्या चरणाकरितां हा प्राण जरी खर्च झाला तरी हा दास तयार आहे सरकार.

सौ०—अहाहा! या संकटसमयीं आह्मांस सहाय करण्याकरितां तुमचे मनांत जगन्नियंत्या प्रभूनंच प्रेरणा-

केली असं वांटतं. सत्यशीला तुम्ही स्वारी बरोबरच गेला असता तर बरं झालं असतं. कारण मी येथें सुखांत आहे. कोणच्या गोष्टीची बाई काळजी कां मला आहे! पुष्कळ दास दासी सेवेंत हजर आहेत. झालं म्हटलं तर आज मला पाहिजे तें हव्या त्या येळीं मिळण्या सारखं आहे पण रानावनांतून एकट्या स्वारीचं फिरणं होईल त्या वेळेस बाई प्रसंगीं मनुष्याची गरज लागली तर केवढी बरं पंचाइत! आमचं काय मेलं बायकाचं! अहो पुरुष सुखी तर आह्मी सुखी नाहीं तर आह्मांस हीं सौख्यें घेऊन काय कर्तव्य आहे. सत्यशीला खरंच मी केवढी पातकी, माझ्यामुळें किती जणांस दुःखं भोगावीं लागत आहेत. तिकडची तर ही स्थिति, या माझ्या सख्यांसही माझेपासून त्रासच आणि आतां तुमचा जीव ही धोक्यांत घालण्यास कारण मीच. तेव्हां मी ह्मणते असल्या दुर्दैवीचा शेवट प्रभूनं लवकर केला असता तर किती बरं चांगलं झालं असतं! सत्यशीला कायहो मी करूं. माझा जीव बाई मलाच नकोसा झाला आहे. ( उसासा टाकते ).

सत्य०—छे: छे:; ताईसाहेब, हें भलतंच काय आपण बोलतां! मनुष्यमात्रांस सुख दुःख सारखें असतें. शिवाय साधु वाक्य जें " जं जं लिहिलें संचितीं तें तें चुकेना कल्पांतीं " हें लक्षांत आणिलें असतां आपल्यास इतकें कधींही वाईट वाटणार

नाहीं. आपले हे थोडे अनिष्ट दिवस आले आहेत हे जाऊन चांगले दिवस लवकरच येतील व्यर्थ आपल्या दैवास दुषण कां लावतां ताईसाहेब?

सौं०—असो, सत्यशीला आतां या संकटावस्थेंत आमचे साह्यकर्ते काय ते तुह्मी तेंव्हां तुह्मी सांगाल त्या प्रमाणं वर्तन ठेवीन ह्मणजे झालंना.

सत्य०—ताईसाहेब ठीक आहे मी रजा घेतो तर. कारण त्या दुष्टांपैकीं मला जर येथें कोणी पाहिलें तर कांहीं तरी विघ्न ओढावेल. ज्या ज्या वेळेस जरूर लागेल त्या त्या वेळेस दासास विदित करावें ह्मणजे हा तयार आहेच. मीही वेळ प्रसंग पाहून येत जाईन. येऊं तर आतां?

सौं०—ठीक आहे पण बोलल्याप्रमाणं तिकडलं कुलश. वृत समजल्याबरोबर कळविण्यास येत जा हो. नाहीं तर विस्मरण होईल ह्मणून सूचना करते.

स०—ताईसाहेब, हें काय सांगावें? एक वार पूर्वेचा दिनकर पश्चिमेस उगवेल पण याचें वचन असत्य होणार नाहीं. हा दास या चरणाची सेवा करण्यासच प्रभूनं निर्माण केला आहे असें समजा. प्राणा पलिकडे आपलें सहाय करण्याचा माझा कृतनिश्चय कधीं ही ढळणार नाहीं. सरकार अनुभवांतीं सर्व समजेल येतो तर मी?

सौं०—बरं आहे या. ( सत्यशील निघून जातो. )

अ०—पाहिलंसना सखे. अग तुह्मांस सहाय करण्यास

हवा तो एका पायावर राजी आहे. बरं सखे तें पत्र मात्र फार जपून ठेव हो नाहीं तर बाई जर कां तें त्या महामायेच्या हातीं लागलं तर मात्र मोठीच पंचाईत होईल.

सौं०—सख्यांनों! खरंच बाई. पण हें पत्र मी फाडून टाकूं काग ? कारण बाई ह्मणतातना "मन चिंती तें वैरी न चिंती." सख्यांनों तुह्मी ह्मणता तसंच न होईल ह्मणून कशावरून ! (मनाशींच) पण तिकडचं पत्र आणखी फाडूं कां ? चोरी कां आहे कोणाची ? मला चैन पडेनासं झालं ह्मणजे ह्या पत्राकडे पाहून तरी चित्तास समाधान करून घेईन. हे पत्रा तूं नुकताच भेटून आला आहेस तेंव्हां एकवार दृढालिंगन दे पाहूं ? (पत्राचं चुंबन घेते) अहाहा किती गोड तरी हें चुंबन. आतां कनइ तूं कोणाचे दृष्टीस न पडशील अशा ठिकाणीं मी तूला ठेविते बरं का ? (कंचुकींत पत्र ठेविते) उघड सख्यांनों, काय बाई आज जांभया फार येतात ग ? (जांभई देते.)

रे०—सखे, आतां थोडसं समाधान झालंना? आतां बाई घटकाभर स्वस्थ विश्रांती घे कशी ? कारण ही ऐन दोन प्रहरची वेळ त्यांतून रात्रीं ही तुला झोंप नाहीं, त्यामुळें डोळे कसे लाल झाले आहेत जा आंत अमंळ विश्रांती घे. आह्मी ही घटकाभर येथं पडतों.

सौ०—सख्यांनो, मला झोंप येईल असं वाटत नाहीं पण तुमचा आग्रहच आहे ह्मणून बाई घटकाभर आली तर पहाते. ( खोलींत जाऊन दार लोटून घेऊन आंत पलंगावर निजते व सख्या बाहेर निजतात व दासी दाराशीं उभी राहते. )

सौ०—( पलंगावर पडलेली मनाशींच ) हर हर! नारा-यणा! काय माझी स्थिति! अरे नांव मोठं न लक्षण खोटं तशांतली गत. लोक ह्मणत असतील या सौंदर्यवल्ली सारखी सुखी कोणी ही नसेल; पण वास्तविक पहातां जें सुख मला पाहिजे तें काडी इतकं तरी आहे काय! या राज्य संपत्ति वगैरे बाह्यातकारी सुखांस घेऊन काय करायचं आहे! देवा यापेक्षां आह्मा उभयतांस एकाद्या गरीब कुलांत जनन देतास तर आह्मी किती बरं सुखी असतों! असो, करायचं काय प्रारब्धा पुढें तर कोणाच्यानं जाववत नाहीं! ( उसासा टाकून पलंगावर पडते इतक्यांत सयाजी येतो आहे हें पाहून दासी सौंदर्यवल्लीस सावध राहण्याकरितां सूचविते ).

दा०—( घाबरून ) बाईसाब तो दुष्ट येतोया सावध असा हो.

सौ —( मनाशींच ) देवा माझं मलाच दुःख सहन होण्याची पंचाईत आणि हा दुष्ट माझा छल कर-ण्याकरितां येत आहे काय! असो. प्रसंगास धैर्य सोडून उपयोग नाहीं. माझाही राग त्याला दाख-

विण्याची हीच संधि बरी आहे (उघड) दासी वेळेवर मला सूचना केलीस फार उत्तम झालं. (इतक्यांत सयाजी प्रवेश करतो).

स०—(दासीकडे पाहून) कोण आहे ग? दासी! आंत आहे कां ती; काय करते आहे?

सा०—म्हाराज! सरकारासनी झोंप लागली हाय. कोनासबी आत येऊं देऊं नग म्हंगुनशेनी मला आज्ञा केलीया. तेंव्हां आपली यायेळीं भेट होनार न्हाई.

स०—काय मला आंत जाण्यास तूं प्रतिबंध करणार? ठाऊक नाहीं वाटतं हा सयाजी आहे. नाक कापून टाकीन खबरदार (दाराजवळ जाऊं लागतो.)

सा०—(दाराजवळ उभी राहून) म्हाराज ही दासी आपल्यास न्हाई म्हंगते असातली गोष्ट न्हाई. सरकारची आज्ञा म्हनुनशेनी सांगते; या येळेस आपुन आंत जाऊं नगा परिनाम लइ दोड होईल म्हंगून पुनः एकवार इनंति करते इकडे लक्ष द्या म्हाराज.

स०—छेः ग मूर्खे अशा दरकावणीच्या गोष्टीनें भिणारा हा नव्हे; हा नांवाचा सयाजी आहे. मी तर आंत जाणारच मग हवा तो परिणाम होवो. चल हो एकीकडे नाहीं तर व्यर्थ शिक्षा भोगावी लागेल याचा नीट विचार कर.

सा०—म्हाराज! पर आस्तुरी निजली असतां आपना सारख्या लोकांनीं आंत जान नीट न्हाइ. त्यांतूनं सरकारास एकवार राग आला तर आपली

अवस्था लई कठीन होईल तेंव्हां या भरीस व्यर्थ पडूं नये अशी आनखी एकवार इनंति करते.

स०—मूर्खे ती पर स्त्री असें कसें ह्मणतेस? अग ती या बापूशी पट्टराणी होणार हें तुला अद्याप माहित नाहीं काय? जीभ लांब करून ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी मला सांगूं नको चलहो दूर. (हात धरून तिला एकीकडे लोटतो.)

सा०—(घाबरून) बा—बा—बाईसाब सा—सा—सावध असा. हा—हा दुष्ट आंत आला हो आंत आला. (सयाजी सौंदर्यवल्लीच्या खोलींत प्रवेश करतो.)

स०—अहाहा!—

## पद.

**मम प्रिय सखी किती सुंदर दिसते ॥ वाटे खचित ही रती लाजविते ॥ धृ० ॥ पहातां हीच्या सौंदर्यासी ॥ कामी जन विसरती भानासी ॥ हावभावें ही वेड लाविते ॥ मम ० ॥**

कायरूप तरी हें! आणि असलें सुंदर रत्न या सयाजीला मिळणारना शाबास सयाजी धन्य तूं! प्रिये उठ उठ हा दास तुझी काय आज्ञा होत आहे हें ऐकण्या करतां व तुझी सेवा करण्या करतां आपण होऊन आला आहे, तेंव्हां मजशीं एकवार गोड भाषण कर पाहूं!

सौ०—(दचकून उठून बसते व सयाजीनें आंत प्रवेश केला पाहून अगदीं घाबरल्यासारखी होऊन मनाशींच

देवा ! कायरे हा प्रसंग. आतां हा दुष्ट माझा छळ केल्या वांचून राहणार आहे काय ! आतां माझ्या पातिव्रत्याचं रक्षण करणार तुझ्या शिवाय कोणी नाहीं. पण अशी घाबरून परिणाम कसा लागणार ? प्रसंगास धीर धरलाच पाहिजे रक्षण करणार प्रभु समर्थ आहे (उघड) कोणग दासी ? मी अंमळ पडले होते व कोणास आंत येऊं देऊं नको ह्मणून तुला सांगितलं असतां हाग आंत कसा आला ?

सौ०—सरकार, मा काय करूं; मी बी लइ त्यास सांगितलं पन त्यांनीं न ऐकतां मला लोटून देऊनशेनी जबरदस्तान आंत शिरलं. सरकार, यांत माझी काइवा तकशीर न्हाइ. ही दासी पायावर डोइ ठेवूनशेनी माफी मागत हाय. (सौंदर्यवल्लीच्या पाया पडते.)

स०—प्रिये ! व्यर्थ दासीस कां रागें भरतेस ! तिनें आपलें काम योग्य रीतीनें बजाविलें; पण:—

## साकी

गौरवर्णमृदुअंगसुंदरी । पाहुनितुजमोहितझालों ॥
कामशरेंमजापीडिलेंम्हणनि।प्राणरक्षणास्तवआलों॥
मानुनिममवचना । धन्यकरीजगिंयादीना ॥

या दासाच्या अंगाचा कामाग्नीनें दाह झाल्यामुळें तो शांत करण्याकरीतां येथें आलों आहें; तेव्हां आतां अंत कां बरें पाहतेस ? एकवार याची इच्छा तृप्त कर. हा दास तुझ्या अगदीं वचनांत आहे.

सौं०— ( रागावून ) मूर्खा ! काय वाणीनं उच्चार करतो

आहेस ! अरे कांहीं अंमल वगैरे तर केला नाहींस ना! दुष्टा, ती जिव्हा झडूनरे जाइल. अरे अशी पाप वासना मनांत धरलीस तर त्याचा झाडा कुठंरे देशील ? अंमळ विचार कर !

स०–प्रिये ! माझें मन तुजविषयीं किती निश्चयाचं आहे ह्याची परीक्षा पाहण्याकरितां असें राग आल्यासारखें भाषण करतेस होय ? तर सांगतों ऐक:—

साकी.

एकसखेसुंदरीसांगतों । तुजसीशपथवाहाने ॥
प्राणापरितुजरक्षिनखचितगे । अमरप्रीतिठेउनि ॥
अंतकितीपहासी । शंकाकायमनींआणिसी ॥

तुझ्याच गळ्याची शपथ तुझा एकवार अंगिकार केला तो यावज्जीव अंतर देणार नाहीं. आतां तर झालेंना. प्रिये, आतां कां बरें उशीर ? या दासाचे ओष्ठ तुझें अधरपान करण्याकरितां किती तृषित झाले आहेत पहा बरें ? किती अंत पहाणार सखे, येग लवकर ?

सौं०– ( अति संतापून ) अरे अधम्या, नीचा, व्यर्थ माझ्या जिवाचा संताप करूं नको. अरे माकडा, तुजकरितां परमेश्वरानं मला निर्माण नाहींरे केलंन! अरे हिचा अंगिकारकर्ते निराळेच आहेत. तुला एकवार निक्षून सांगते कां आपला प्राण जरी दिलास तथापि या सौंदर्यवल्लीच्या पातिव्रत्यास काडी इतका धक्का लागणार नाहीं. मूर्खा मग अशी

व्यर्थ बडबड करून माझा छल कां करतोस व आपल्या जिवावर कां उदार झालास ? येथून काळें कर कसं !

स०—प्रिये ! या अशा राजबिंडयाला सोडून त्या भिकारडयास वरण्याचा कां व्यर्थ आग्रह धरतेस ? माझें व तुझें लग्न झालें ह्मणजे त्यापासून महाराजांस व ताईस केवढा बरं आनंद होईल आणि मग सर्व राज्याचे व संपत्तीचे मालक आपणच. मग आपल्या सारखे सुखी कोण असणार आहे ? पुरे आतां; काय बरें हें; कोण हट्ट तरी ? संतापानें काय ही अवस्था झाली आहे ! छेः बोवा, आपण अशी दुराग्रही बायको नाहीं कोठें पाहिली ! हं ये आतां पाहूं ?

सौ०— ( क्रोधयुक्त होऊन ) दुष्टा ! अरे तिकडचें नांव सुद्धां घेण्याची तुझी योग्यता नाहीं. मूर्खा, त्यांच्या नांवास कां विटाळ करतोस ? तिकडच्या नखाची तरी सर तुला येईल काय ? निघ मूर्खा येथून नाहीं तर तुझ्या पायाशीं मीं आपला प्राण देईन. जातोस कीं नाहा ?

स०—काय ? त्याच्या नखाची ! माझ्या नखाची त्याला सर येणार॰नाहा असें ह्मणतेस होय? हं ! हं ! हं ! ठीकच आहे. मला समजलें नाहीं. मग कां बरें आतां उशीर. नका आतां व्यर्थ आपल्या जिवास त्रास करून घेऊं ( जवळ जातो. )

सौं०—दुष्टा ! तोंड संभाळ येवढा वेळ ऐकून घेतलं पण आतां मात्र सहन करणार नाहीं जातोस कां नाहा येथून निर्लज्जा ?

स०—तुझा इतका वेळपर्यंत पुष्कळ अर्जव केली पण तूं ऐकत नाहीस. काय हा दांडगेपणा! आतां जबरदस्तीवर प्रकरण आलं ह्मणजे मात्र मुळमुळ रडत बसशील याचा विचार कर व मीं ह्मणतों हें मुकाट्यानें ऐक (अमंळ जवळ जाऊन हळूंच ) असें काय बरें सख, किती तरी हट्ट करावा ?

सौं०—छेः रे मूर्खा, अशा तुझ्या दबकावणीच्या किंवा मधुर भाषणांनीं ही आपल्या व्रतापासून ढळणारी नव्हे! प्राण गेला तथापि व्यभिच्यारिणी हें नांव कधीं ही मिळवून घेणार नाहीं. अरे, फार काय सांगूं, पूर्वेचा सूर्य पश्चिमेस उगवेल पण या सौंदर्यवल्लीचा निश्चय ढळावयाचा नाहीं. अरे, नको रे हें नीच तोंड मला दाखवूं; जा येथून लवकर नाहीं तर खाचित तुझ्यापुढें जीव देईन.

स०—हं!हं!असें काय? बरें तर पहातों कशी ऐकत नाहीस ती (जवळ जाऊन धरूं लागतो).

सौं०—(घाबरून मोठ्यानें)अनुराधे, ए रेवती, अग दासी. बाहेर आहांत कांग कुणी? हा दुष्ट मजवर जुलूम करतो आहे. धांवा! धांवा! मला या दुष्टाचे हातून सोडवाग! देवा! द्रौपदीसतीनें तुझा धावा केला त्या वेळेस कसारे धाऊन आलास आणि आतां कां बरं

अजून येत नाहीस. हायरेहाय! (बेशुद्ध पडते. इतक्यांत अनुराधा रेवती व सारजा प्रवेश करतात हें पाहून )

स०—बरें बरें, काय चिंता आहे; आतां तुला सोडतो एखादे दिवशीं पाहून घेईन. त्याच्या नखाची सर मला येणार नाहीं काय? त्याच्या नखाची होय (असें ह्मणून मिशीवर ताव देत निघून जातो).

अ०—जा मूर्खा तूं माकडानं काय करायचं आहेस? अशीं माकडं पुष्कळ दारांत बांधून ठेविलीं असतात.

रे०—अनुराधे, काय त्या मुर्खाच्या तोंडीं लागतेस बाई, आपल्याच पायाखालीं अंधेर आणि दुसऱ्याला कां बोल लावावा. हेच महाराज चांगले असते तर असं कां होतं. देवा कितीरे या आमच्या सखीला दुःख भोगावं लागणार. असो बाई अनुराधे अधीं तिला सावध कर. सारजे, आणग तें गुलाबपाणी व तो पंखा. (सारजा पंखा व गुलाबपाणी आणते. )

अ०—(गुलाबपाणी डोळ्यांस लावून वारा घालते ) सखे उघडग डोळे; या आह्मीं तुझ्या सख्या आहोत; पाहिलंस कां आमच्याकडे? सखे, अग सखे?

सौ०—(अंमळ सावध होऊन ) मीं नाहींग बाई डोळे उघडीत. त्या मेल्या दुष्टाचं तोंड माझ्या नजरेस सुद्धां नको. मला बाई त्याची भिती वाटते. नको, नको, देवा! ( पुनः निचेष्ट पडते. )

रे०–सखे, तो चांडाळ येथे नाहीं हो. या आह्मीं तुझ्या सख्या आहोत; एकदां पहाशील तर खरं. भिऊं नको, आह्मीं तुझं रक्षण करण्याकरतां येथं आहोत. तो दुष्ट तर केंव्हांच येथून गेला. असं काय तें सखे!

सौं०–(थोडी अधिक सावध होऊन) खरंच नाहींना तो येथं? पहा बरं, नाहीं तर मला पातकांत पाडण्यास कारण तुह्मीं व्हाल याचा विचार करा.

अ०–सखे, तुझ्याच गळ्याची शपथ तो येथं नाहीं. अग तुला आह्मीं अशा कामीं फसवूं असं तुला वाटतं कां?

सौं०–(डोळे उघडून अनुराधेच्या गळ्यास मिठा मारते) सख्यांनों! कोण आजचा मजवर प्रसंग! असा प्रसंग प्रत्यक्ष आपल्या वैऱ्यावर सुद्धां बाई येऊं नयेहो. सख्यांनों, कधींही तुह्मीं मजजवळून दूर रहात नाहीं आणि आजग कुठं गेला होता? ही सारजा सुद्धां नव्हती. असो बाई तुह्मांस दूषण देऊन काय उपयोग? ईश्वरी संकेताप्रमाणं सर्व गोष्टी घडून येतात. माझ्या प्रारब्धींच आजचा प्रसंग लिहिला होता मग तुह्मांस तरी मजजवळ राहण्याची बुद्धि कोठून बाई होणार? तुमचेकडे काय त्याचं. माझं प्रारब्धच फुटकं, दुसरं काय!

रे०–सखे, आमचा किंचित डोळा लागला होता इतक्यांत बाई येवढा प्रकार झाला. आतां या सारजेनं आह्मांस जागृत करायचं तें केलं नाहीं. काय मेला दुष्ट तरी. त्याला हा संधी तरी कशी बाई सांपडली पहा. स-

खे, आम्ही तुजपासून कांहीं कुठं लांब गेलों नव्हतों, बाहेरच्या दालनांतच होतों पण बाई अशी काळ झोंप कोणी कडून आली कोण जाणं! येवढा मात्र आमची कायती तकशीर खरी.

दा०—सरकार, यासनी आक्शि निःसुर झोंप लागली होती ह्मगून मी उठविलं न्हाइ आन् हा दोड बेहत येऊनशनी इतक्या थरावर गोष्ट जाईल असंबी मला वाटलं न्हाइ काय बया कस आक्शि भुरळ पडल कोन जान. सरकार, समदा अन्योव या बटकीचा हाय, व आपल्या आजच्या सर्व दुःखास बो कारन मींच हाय, तेव्हां या दाशीला जी शिक्षा द्याल ती भोगण्यास तयार हाय सरकार.

सौ०—अग बाई, मी मघाशींच सांगितलंना पण, कीं कोणाकडेही त्याचा दोष नाहीं. एक मींच दुर्दैवी ह्मणून अशी गोष्ट घडली. असो. परमेश्वरा, मजवर हवा तितकीं संकटं व दुःखं आण; परंतु एक पातिव्रत्याचा भंग व तिकडच्या जिवास कोणचाही अपाय येवढं मात्र होऊं देऊं नको दुसरं कांहींएक मागणं नाहीं.

अ०—सखे, असं काय बाई तें भलतंच बोलावं! पण भलतंच कसं; तुझं बोलणं बरोबर आहे. जें जें होईल तें तें बाई थोडंच आहे. हरहर! देवा! आमच्या वाड्यांत आणि एका महामायेमुळं एवढा अंधेर असावा

काय ! महाराजांची इतकी अक्कल तिनं गुंग करून टाकलीना ! काय बाई बायको तरी ! सखे रेवती, ही गोष्ट मला वाटतं महाराजांच्या कानावर घालावी ते शुद्धीवर असून कांहीं दया आली व बंदोबस्त केला तर केला. नाहीं हें आपलं आहेच; कसं बाई रेवती, तुला कसं वाटतं ?

सौं०–सख्यांनों, या भरीस बाई तुह्मी पडूं नका. बाई धर्म करतां कर्म उभं राहयचं एखादं; अग महाराजांची स्थिति माहित का नाहीं तुह्मांला? बाई, प्रारब्धीं असेल तेवढं भोगलंच पाहिजे. संप्रत आपल्यास दैवच प्रतिकूल आहे. आपण जाऊं करायला एक आणि भोगावं लागेल आपल्यालाच. छे:ग बाई तसला विचार तुह्मी मनांत सुद्धां आणूं नका.

रे०–ही ह्मणते तेंही एकपरी खरंच आहे; पण असं जर न करावं तर बाई परिणाम तरी लागणार कसा. काय बाई अंधेर हा!

सौं०—सख्यांनों, बोलून काय उपयोग आहे. असो, प्रभु कृपेनं त्या वेळीं तरी तुह्मीं आलां ह्मणून तरी बाई कांहीं बरं झालं नाहीं तर ही तुमची सखी पुनः बाई तुमच्या दृष्टीस पडली नसती. बरं कायग पण, आजच्या दिवसांत सत्यशील कुठं इकडे आले नाहींत. कांहीं पत्रबित्र आलं नाहीं वाटतं?

अ०—सखे, बहुतकरून उद्यां येतील ते. सखे, पांच वाजले अंमळ बागेंत तरी फिरावयास येतेसकां? चल जाऊं.

वेळ तरी जाईल व थोडं बरंही वाटेल.

रे०—मलाही बाई तसंच वाटतं. दासी, जाग रथ सिद्ध करून घेऊन ये. लवकर येहो पण.

दा०—सरकार, रथ केंव्हाचा तयार हाय, चला कीं लवकर.

सौ०—चला सख्यांनो; तुमच्या इच्छेप्रमाणं कां होईना. चला बाई.

अ०—चल बाई रेवती, सारजे तूंही चल. चला.

रे०—चला बाई. (सर्व निघून जातात.)

( प्रवेश दुसरा समाप्त. )

---

## प्रवेश तिसरा.

### ताज महाल.

(मदनिका व दासी प्रवेश करतात.)

म०—(आपल्याशीं) काय करावं, ही कारटी तर अगदीं बोलूं देत नाहीं. म्हंटलं त्या भिकारड्या पुण्यशीलास येथून हांकून लावल्यावर तरी ही ताळ्यावर येईल तें तर एकीकडेच राहिलं पण ही उलट आमच्या सांगण्याचा जास्तच तिरस्कार करूं लागली आहे. उघडच आहे. शहाणीच आहे ती. या आमच्या सयाजीच्या आंगीं शहाणपण व गुण असता तर असं कशाला झालं असतं; तेव्हां आपलंच लंगडं, मग दुसऱ्यास बोलून काय बाई उपयोग?

पण असं ह्मणून उपयोग नाहीं, कारण आपल्यास तिच्या सुखदुःखाकडे पाहून काय करायचं आहे! कोणीकडून आपल्या हातांत राज्य आलं ह्मणजे झालं. बरं पण सयाजी काल तिजकडे जाणार होता त्याची हकीकत काय झाली समजत नाहीं, झाला तर इकडे यणं ह्मणंजे अगदीं कस जीवावर येतं. कोणग आहे तो, दासो, जा व सयाजीला मी बोलावलं आहे ह्मणून सांग.

दा०—जी सरकार (निघून जाते व सयाजी वाटेंत भेटतो त्यास) महाराज आपली बाईसाब केधोळची वाट पाद्यातो चलावं सरकार लवकर.

स०—काय ताईकडून तं बोलावण्या करितां येत होतीस? मींही तिकडेच येण्याकारितां निघालों होतों. चल तर. (दोघेही प्रवेश करतात.)

म०—काय, बाळा सयाजी, होतास कुठं येवढा वेळ बाबा? अरे, तुझ्याकरतां मात्र मी वाट पहात बसावं आणि तुझ्या तें गांवां सुद्धां नसतंना.

स०—ताई, असें काय बोलतेस; अग मी तुजकडे येण्याकारितांच निघालों होतों, इतक्यांत ही दासी वाटेंत भेटली. विचार पाहिजे तर तिला (दासीस) काय खरं कीं नाहींग?

म०—अरे पण मी नाहीं कधीं ह्मटलं. पण बाळा तुझं लक्ष नेहमी पाहवं तो खेळाकडे व हलकट लोकांचे संगतींत. अरे दोन अक्षरं जर शिकलास तर केवढा

उपयोग होणार आहे बरं! असं बघ एकदां राज्य चालवण्याचं गळ्यांत पडलं आणि जर कां त्यांत तुला समजूत नसली तर मग बाई मात्र तुझी व माझी फजिती बरोबरच. याचा विचार कांहीं केलास कां?

स०—ताई, मला काय येत नाहींग. मला थोडें वाचतां येतें; सही मात्र दुसऱ्या कडून करवावी लागते ती गिरवून पाठ करतो मग झालों कीं नाहीं शहाणा? राज्य तर हातीं येऊं दे मग पहा माझें शहाणपण!

म०—(आपल्याशीं अहाहा काय शहाणपण! सही करण्याची मारामार तो राज्य चालविणार? पण त्याच्याशीं काय कर्तव्य आहे. कारभार पहाणार सर्व मींच; नांवाला मात्र त्याला धनी करावयाचं ह्मणजे झालं उघड) बरं काल तूं त्या पोरटीकडे जाणार होतास ह्मणून ऐकलं होतं मग गेला होतास कां?

स०—(मनांत लज्जित होऊन) खरेंच ताई तुला कालचा हकीकत सांगण्याकरतांच इकडे येत होतों; परंतु गोष्टींच्या नादांत अगदींच विसरलों. काल कनइ ताई, उत्तम प्रकारचा पोशाख करून व बरोबर मानाजीस घेऊन तिजकडे गेलों होतों.

म०—मग गांठ पडलीच असेल तर?

स०—हो, महालांत ती एकटीच होती, दाराशीं दासी बसली होती व दोन्ही पोरी (तिच्या सख्या) बाहेर निजल्या होत्या.

म०—हं! मग काय काम झालंच असेल!

स०—(तोंड वाईट करून) छेः ग ताई, मी तेथें गेलों तों प्रारंभीं मक्षिकापात या ह्मणीप्रमाणें त्या दासीनें आंत जाण्याची मनाई केली; पण बळजबरीनें तसाच आंत गेलों आणि तिनें मला पाहिलन मात्र ग ताई!

म०—मग काय पाहिल्या बरोबर उठून लाजून एका बाजूस उभा राहिली असेल!!

स०—छेः ग, तिनें मला पाहिल्याबरोबर तिच्या तळव्याची आग मस्तकांत गेली. मी तर ताई त्या वेळेस अगदीं घाबरून गेलों. पण मी मनांत ह्मटलें ही माझें मन पाहाण्या करितां विनोद करीत असेल, •ह्मणून थोडा धीर करून अमळ पुढें गेलों व तिची बहुतप्रकारें विनवणी केली पण हट्टीच पोर ती कसाची ऐकते. नाहीं नाहीं त्या शब्दांनीं तिनें माझी विटंबना केली. ती ह्मणाली त्या पुण्यशीलाच्या नखाची सद्धां मला सर येणें कठीण इतकेंच नव्हे पण त्याचा नोकर जरी होण्याचा इच्छा धरलीस तथापि तेंही तुला शोभणार नाहीं. कायग ताई, मी इतका हलका झालों कांग? त्याच्या पेक्षां माझे अंगांत कोणचा गुण कमी आहे. हिनें मला असें बोलावें ना!

म०—( आपल्याशीं ती अगदीं खरं बोलली पण अशानं आपला कार्यभाग सिद्धास जाणं कठीण आहे उघड ) द्वाडच आहे ती पोरटी काय बाई तरी! बर मग पुढं काय झालं?

स०—पुढें काय, मग मी असा विचार केला कीं अशा-
नें ही वळणीवर यावयाची नाहीं; तेव्हां जुलूम
करावा ह्मणून जवळ गेलों इतक्यांत ती मोठ्यानें
ओरडली त्या बरोबर तिच्या सख्या व दासी खोलींत
आल्या व त्यांनींही माझी निर्भत्सना केली, तेव्हां मला
अतिशय संताप येऊन मी तिला " पाहून घेईन "
अशी धमकी देऊन निघून गेलों. ताई माझी
आणि तिनें अशी निर्भत्सना करावीना! हें तुला तरी
बरें दिसतें कां ? व्यर्थ मीं जन्माला आलों व तुझा
भाऊ झालों. याची लाज तुला तरी असूं दे. (मान
खालीं घालून बसतो ).

म०—(आपल्याशीं याच्या आंगीं जर शहाणपण
असतं तर तिनं असं कां ह्मटलं असतं. मुलींना
वाटतं आपला नवरा पराक्रमी असावा, शहाणा अ-
सावा. आणि त्याचा तर याचे आंगीं आभावच; मग
तिचा यांत काय बरं दोष आहे. पण असं ह्मणून
आपल्या मनाप्रमाणं कसं होणार. जो पक्ष एकवार
उचलला तोच शेंवट पर्यंत धरायचा मग त्यांत सोक्ष
किंवा मोक्ष. आतां याचा अखेर परिणाम काय होणार
तो मला दिसतो आहे, पण बाई कोणी पाहिलं आहे
चालली घटका ही खरी उघड ) असं बोललीना,
काय बाई पोरटी दांडगी! माझ्या मनांत कारटीनं
तुझ्याशीं लग्न करावं आणि तुला गादीवर बसवून
राज्यकारभार आपण चालवांवा पण तसं होण्याची

आशा कनड वाळा मला मुळींच दिसत नाहींहो; तेव्हां आपल्या सर्व मतलबांत ही जी आडकाठी येत आहे तीच एकदाची समूळ काढून टाकावी ह्मणजे झालं! तुला कसं वाटतं सयाजी?

स०—ताई, तुझ्या युक्तीस कोण नांवें ठेवील फार उत्तम युक्ति आहे. पण हें काम व्हावें कसें व करील तरी कोण?

म०—अरे, हें काम आपल्या फत्तेसिंगाकडून करून घ्यावं. कसं ह्मणशील तर तो आहे जातीचा रजपूत. त्याच्याशीं गोड गोड भाषण करून त्याला हर-भऱ्याच्या झाडावर चढवावं झालं. ती जात मूर्खच असते; तारतम्य ज्ञान ह्मणून त्यांस मुळींच नसतं, अशा संधींत त्याचे कडून वचन घ्यावं आणि थोडी पैशाची लालुच दाखवावी ह्मणजे झालंच काम.

स०—पण तो तरी हें काम प्रत्यक्ष वाड्यांत कसें करूं शकेल. आणि हें काम तर फार गुप्त रीतीनें झालें पाहिजे.

म०—अहारे वेड्या? नाहीं तरी वाड्यांत हें काम कसं होईल. अरे तिच्या रात्रीच्या जेवणांत कांहीं अमली पदार्थ मी घालते ह्मणजे त्यापासून तिला अमंल ये-ईल. मग त्यांनीं तिला रात्रीच्यारात्रीं लांब जंगलांत नेऊन काम करावं ह्मणजे झालं. बरी आहे कीं नाहीं ही युक्ति?

स०—अहाहा! ताई, युक्ति फारच चांगली आहे. बरें तर

ह्या दासीस पाठवून त्या फत्तेसिंगास लवकर बोला-व. हें काम आजच केलं पाहिजे नाहीं बरं? पण ताई, ह्या गोष्टीचा बोभाटा होऊन ती महाराजांस कळली तर मात्र आपली धडगत नाहीं याचा विचार कांहीं केलास कां तूं?

म०—आहारे वेड्या! पुरुषासारखा पुरुष असून येवढ्याशा गोष्टीस भितोसना! अरे आहे काय त्यांत. आज रात्रीं तें काम झालं म्हणजे उजाडलं नाहीं तों आपणच बोभाटा करावा व कोणास संशय न येईल अशा रीतीनें तिच्या शोधाच्या खटपटीस लागण्याची घाई करावी म्हणजे झालं. कोण आहेग ती? दासी? इकडे आलीसकां?

दा०—जी बाईसाब, काय हुकुम होतोया.

म०—अग, त्या फत्तेसिंग जमादाराकडे जाऊन त्याला मीं संध्याकाळीं बोलावलं आहे ह्मणून सांग. कांहीं जरूरीचं काम आहे तेव्हां विसरूं नको ह्मणावं. खबरदार ही गोष्ट कोणाजवळ बोललीस तर नाक कापून टाकीनहो!

दा०—जी बाईसाब, मी कशासनी बोलूं. जाते तर सरकार आतांच आले पघा, ( निघून जाते. )

म०—सयाजी आतां तूं कांहींएक वाईट वाटूं देऊं नको. झाल्या गोष्टीस इलाज नाहीं, ती जें तुला बोलली तें मला बोलल्याप्रमाणं आहे तेव्हां त्याबद्दल तिला शासन केलंच पाहिजे. बरं तूं जा आतां; संध्याकाळीं

मात्र येहो. नाहीं तर बाई खेळत बसलास ह्मटलं ह्मणजे तुला शुद्ध राहणार नाहीं.

स०—छेः ग ताई, असें कसें होईल. या कामाची आपणा उभयतांस सारखीच काळजी आहे मग मी विसरेन कसा? येऊं तर, ( नमस्कार करून निघून जातो. )

म०—( आपल्याशींच ) बरं आतां कार्यभाग तर झाल्या सारखाच आहे; तेव्हां आपणहि अमंळ विश्रांति घेण्याकरितां जावं. ( निघुन जाते. )

**प्रवेश तिसरा समाप्त.**

---

## प्रवेशचवथा.

### ( दासी प्रवेश करिते. )

दा०—( आपल्याशींच ) काय बया, काय या अवदसेचे इचार आन हिला अस्तुरी म्हनावी कां राखिस ! यडाच तो सयाजी एक रेघोटी बी वढतां येईना; बाबाचा पराकरम पाहिला तर लांब बंदुकीचा एखादा बार ऐकला कीं खोलीस कडी लावूनशेनी आंत लपतोया; अकलेचा तर अखिश ताराच आन विच्छा करतो ताईसाबांस भाळ घालावी ह्मून. अरे, त्यांच्या चाकुराची बी चाकुरी करन्याची पन योगिता हाय काय. त्येच पुन्यशील महाराज पघा; काय त्यांचे गुन, पराकरम केवढा आन इचार बी कित्ती लइ खोल. ताईसाबांनीं लइ ठ्येस गोष्ट केली ह्मून

त्यांस ही शिक्शा व्हय? आन् त्या पुन्यशील महाराजासवी या महामायनं कपटानं घालवूनशेनी दिलं आं? महाराजांचीवी अक्कल अक्शि कशी गुंग झाली. काय हा न्योव! देवा, एकून खऱ्याचा वाली या कलियुगांत कोनीच न्हाइना. पन म सारख्या वटकीला हे इचार कशाला? पन खरंच कीं त्यो सत्यशील ताईसावांची इमनानं चाकरी करतो न्हवका त्याच्या कानावर ही गोट घालावी इक्त काम आपुन करावं; दुसरं काय मपून होनार हाय. असो. फत्तेसिंगास निरोप सांगून यावं अन् सत्यशीलाची गांठ घेऊनशेनी त्यास ही गोट सांगून सावध करल्ये म्हंगजे त्यास कांहीं वंदोवस्त करायचा असल तर तो करील. चला तर, फत्तेसिंगाकडे जावं हेंच व्येस. (चालूं लागते.) हें पघा फत्तेसिंगाचं घर आलं. भेटला म्हंगजे निरोप सांगून टाकावा म्हंगजे एकदां सुटलं. ( आंत प्रवेश करून देवडीवरील शिपायास ) काय शिपाई वावा फत्तेसिंग जमादार घरांत हैती कां असले तर वाईसावांकडून मी आल्ये हाय आन् कांहीं निकडीचं काम हाय म्हंगून सांगा जा.

शि०—हो, पण मी आंतून हुकूम घेऊन येईतों तूं येथेंच वस. ( निघून जातो. )

फ०–( घरांतवसलेला ) कौन है, क्या बकवा है ?

शि०–(मुजरा करून) महाराजवाड्यांतून वाईसाहेबांकडून आपणांस बोलवण्या करितां दासी आली आहे.

फ०—क्या, सरकार वाडेमेसे कुच संदेसा लंवडीनें लाया है. अच्छा उस्कु अंदर छोड देव.

शि०—जी सरकार, (मुजरा करून निघून जातो व बाहेर येऊन) जाग आंत सरकार बोलावीत आहेत.

दा०—पन काय दादा, मी मुसलमानाच्या घरांत गेल्ये तर राग तर नाहींना येनार त्यासनी नाहींतर हंगाडी जात; करतोस काय त्याचं?

शि०—अग, ते मुसलमान नाहींत हो; असें ह्मणशील एखादी. ते हिंदु असून त्यांची जात रजपूत आहे.

दा०—कोनाला ठाऊक,मी ह्मंगलं त्यो मुसलमानी कां काय बोलतो न्हवका तेव्हां मुसलमानच असल बरं बात्रा जाऊ कां मग आंत ( आंत प्रवेश करिते.)

फ०—(दासीकडे पाहून ) क्यौंबे लवंडी, क्या संदेसा लाया है. बाईसाहेबकी तब्यत तो दुरस्त है.

दा०—होय आन् मीबी खुशाल हायकी. तुह्मांसनी वाड्यांत सरकारनीं बोहिल्या बिगिनशी या हो नाइ तर इसरून जाल.

फ०—क्या, बाइसाबने मेरेकु वाडेमे जरूर बुलायाहै आच्छा. बिगिनशी आला है जा.

दा०—बिगी बिगी ये बरं कां; नाहीं तर पघ मंग ?

फ०—अबे ज्या लंवडी; क्या साली आखो चमकाती है. ( तिच्या तोंडाजवळ जातो. )

दा०—अं, नव्ह बरं कां; मंग मसारखी दोड कुनी न्हाइ; बरं बिगिनशी येहो पन.

फ०—रे क्या बात है सरकारके कामके वास्ते आना अलबत जरूर है.

दा०—बरं मी जायें तर ( निघून जाते. )

फ०—अच्छा मै बी अबी आता हूं जा. ( निघून जातो. )

दा०—(पुन:प्रवेश करून चिंतीत होतसाती आपल्याशींच) चला हे काम तर बाबा आपुन केलं; पन आतां सत्यशीलाची गांठ पडये कशी? असो. त्याच्या घरींच जावं. त्यो भेटला तर बरंच हाय नाइ तर मंग मीबी काय करूं. (थोडी चालते इतक्यांत तिकडून सत्यशील येतो त्यास पाहून) वा: लइ ब्येस काम झाल्या ह्यो सत्यशीलच आला न्हवका यावरून हे संकट ताईसाबां-वरचं खचित निवारन होनारसं दिसतंया (सत्यशील प्रवेश करतो.)

सत्य०—कांग दासी, कोणीकडे येवढ्या गडबडीनें गेली होतीस? तुह्मी काय, राज्यकारस्थानी स्त्रियांच्या दासी. कांहीं कमी जास्त प्रकार आहे कीं काय? आलीकडे सयाजीरावांकडे माझें जाणें नाहीं त्यामुळें कांहीं हकिकत कळत नाहीं. तूं तरी सांग कांहीं कमी जास्त असेल तर?

दा०—वा: काय झंगतातना तशी गत. तुह्मासनी खबर कळत न्हाइ असं व्हईल तरी कसं! अहो आमच्या परिस तुह्मासनी थोडीजास्त बातमी समजत असल. हे आपुन उगीच आमचं मन पघतां व्हय?

सख०—नाहीं, तुझ्याच गळ्याशपथ पुण्यशील महाराजांस येथून घालविल्या पासून त्या चंडाळ सयाजीचें तोंड सुद्धां पाहण्याची इच्छा नाहीं. काय बोवा तरी त्या महामायेची कृती. खरेंच सांग, यांत त्यांचा काय बरें अपराध होता. एकमेकांची योग्यता पाहून त्यांनीं गांधर्वविवाह लावला यांत कां त्यांनीं व्यभिचार केला काय? बरें तुझ्या बाइसाहेबांचें ह्मणणें तिनें आपल्या भाच्याला वरावें हें कांहीं तरी शोभतें! तिच्या चाकरीस याला ठेवला तरी तीही याचे आंगीं योग्यता नाहीं. पण बोवा मला त्या महामायेच्या कृत्यांचें राहून राहून फारच आश्चर्य वाटतें! आश्चर्य कसें ह्मणशील तर हिनें आमच्या माहाराजांला, आपल्या माहाराजांची योग्यता काय, किती न्यायी, तसेच पराक्रमी, सदाचरणी व विच्यारशलि आणि या अवदसेनें त्यांस अगदां जगतांतून उठविल्यासारखें किंग केलें! आणि खेद ह्मणून इतकाच होतो कीं असल्या पुरुषाची अशी अवस्था झाल्यामुळें प्रत्यक्ष पोटच्या पोरीचे हे हाल व वनवास! धिःकार असो या राजास. असो. तें राहूंदे; पण, खरेंच कांहीं खबर असली तर सांग तर खरी?

दा०—अहाहा! ज्यापरमानं तुमचं नांव त्याच परमानं तुमचं बोलनं दिसतं आन् ह्मनूनच मीं तुह्मा कड येन्यास निघाल्ये होत्ये. काय सांगूं बाबा पोट जळत न्हाइ ह्मून इलाज न्हाइ बाकी गांवांत भिक मागावी पन त्या महामायेचं त्वांड पघूं नइ. मग चा-

करी करन तर दूरच राहिलं. हरहर!! काय त्याच्या करन्या.

सत्य०—असो, तुला ही अनुभव आहे ह्मणून बरें आहे. बरें त्याचा आतां विचार करून उपयोग नाहीं, व वेळहि तशी नव्हे. कांहीं कमी जास्त बातमी असल्यास मला सावध रहाण्यास ठीक पडेल. बोल बोल पाहूं? नाहींतर आपल्यास कोणी पाहिलें तर ह्मणतील काय खलबतें करतात कोण जाणें. तेव्हां आपणांस येथून लवकर गेलें पाहिजे.

दा०—सत्यशीला, अरे राजवाडा तो; तिथं बातम्यानं काइ कमीकां हाय. दाहाजनांच्या तोंडून दाहा बातम्या समजायच्या. तुह्मासनी कोनची बातमी पाहिजे ती सांगा ह्मंजे सांगत्ये मीं.

सत्य०—अग, मला दुसऱ्या बातम्या समजून काय कर्तव्य आहे; मला माझ्या प्राणापरिस जास्त अशी त्या उभयतां विषयीं कांहीं असली तर सांग. कारण त्या उभयतांच्या सुख प्राप्तीपेक्षां जास्त प्रीय वस्तु मला या जगांत कोणचीच नाहीं. परमेश्वरानें त्या उभयतांवर संकट आणू नये येवढीच इच्छा आहे दुसरी कांहीं नाहीं.

दा०—सत्यशीला, तुमचं त्या उभयतांविशीं प्रेम पाहूनशेनी खचित लइ आनंद होतोया आन् मीं तुह्मांसनी जी बातमी सांगनार ती लइ वाइट हाय तेव्हां नीट ऐका व त्या इशीं सावधगिरी ठेवा ह्मंजे झालं. आतां

हकीकत ह्मंगून ही कीं ताईसाबानीं परवा त्या सयाजीची पुष्कळ इटंबना केली व त्यास वाऱ्या-सबी उभं राहूं दिलं न्हाइ हें तर तुह्मांसनी कळलच असल न्हवका?

**सय०**—होय, तें मी ऐकलें. बरें गाढवाला पायपोस बसले. तरी एक मुस्कुटांत नाहीं मारली; बरें पुढें.

**दा०**—पुढ काय बाबा तेव्हां तो रडत आमच्या अवदस कड आला व ही सर्व हकीकत तिला सांगितली मग काय इचारतां आधीं राग होतांच आन् त-शांत हे कळल्या बरोबर तिच्या तळव्याची आग कपाळांत चढली.

**सय०**—हो, तसें होणारच त्या संतापानें तिचेंच भस्म झालें असतें तर बरें होतें. हं बरें मग पुढें.

**दा०**—मग अमंळ इचार करून त्या उभयतांचा असा इचार ठरला कीं ताईसाब कांहीं आपल्या ह्मन-न्यास कबूल व्हतीला अस त्यांसना वाटना तेव्हां तो आपला फत्तेसिंग जमादार न्हाइका त्याच्या कडून वेलभंडार करवूनशेनी ताईसाबासनी गुप्तरीतीनं रानांत नेऊन ठार मारनार! देवा! नको, तोंडानं बोलूंबी नाइ असली करनी देवा, दोघांचं रक्षन करनार तूं बळकट हैस. तुला त्यांची काळजी.

**सय०**—असो, दासी जें जें होईल तें तें थोडें आहे. बरें तूं तरी मला योग्यवेळीं सूचना दिलीस हीहि गोष्ट चांगली झाली. आतां तुला त्याबद्दल विशेष काळजी

करण्याचें मुळींच कारण नाहीं. मी त्याबद्दल योग्य सावधगिरी ठेवीन. यश देणें प्रभूकडे आहे.

दा०—बरं सत्यशीला, मपून चाकरी जी व्हायाची ती तर मी केली हाय मला येऊनबी लइ येळ झाला या तेव्हां मी आतां जाये, सांगनं ह्मंगून इक्तच कीं ही गोट तिसऱ्याच्या कानांवर जाऊं नाइ व कोनचही संकट येन्यापूर्वी योग्य बंदोबस्त ठेऊनशेनी त्यांचे रक्षन करावं दुसरं कांहीं एक न्हाइ, समजलातना, येत्ये तर मी आतां.

सत्य०—आतां त्यांची काळजी तुझ्या पेक्षां मला किंबहुना ज्यास्तच आहे असें समज. पण काय दुष्टांची निर्दय मनें व कृती तरी किती घातकी, तुला खचित सांगतों परमेश्वर या हातचे झाडे या हातावर घेण्यास कधीं चुकणार नाहीं. बरें त्याचा विचार आज कशाला, तूर्त तर आमचे हाल आहेत ते भोगले पाहिजेत, असो मला ही आतां त्या उद्योगास लागलें पाहिजे. जास्त कमी बातमी असल्यास कळवीत जाहो, ये तर आतां.

दा०—ठीक हाय ( निघून जाते. )

सत्य०—बरें ही गोष्ट बहुतकरून एक दोन दिवसांतच होईल तेव्हां आपणही त्याच्या उपायास लागावें हें बरें ( निघून जातो ).

## प्रवेश चवथा समाप्त.

## प्रवेश पांचवा.

( मदनिका चिंताग्रस्त झालेली प्रवेश करिते. )

म०—( आपल्याशीं )बरं हा घाट तर मीं बराच जमवून आणला खरा पण ही गोष्ट तर कुठं फुटायची नाहींना. नाहीं तर बाई मग मात्र माझी गत कठीण. पण फुटेल कशी कारण ही गोष्ट फक्त सयाजीला व दासीला माहित आहे, त्यानंहीं मीं चांगली ताकीद देऊन ठेवली आहे व धाकही घातला आहे, तेव्हां त्या भितीनें गोष्ट तर फुटायची काळजी नको.( मनास किंचित उद्विग्नता आलीसें दाखवून ) काय, पण मी हें कर्म करणार तें परमेश्वराजवळ रुजु होईल काय? हरहर !! त्या गरीब उभयतांचा कांहींएक अपराध नसतां व्यर्थ मीं नाशवंत संपत्तीस भुलून आज उभयतांची ताटातूट केली हें केवढें घोर पापकर्म मीं केलं. आणि त्याहि पेक्षां मोठं करण्याचा मीं विचार करीत आहे. काय? त्या राज्याला व संपत्तीला करायचं आहे एक चिंधी तरी बरोबर येणार आहे काय फक्त मनुष्य चांगल्या वाईट कृती करतो तेवढ्याचा मात्र इश्वराचे घरीं न्याय होतो पण (पुनःदचकुन) हे भलतेच विचार माझ्या मनांत आज कां बरं येत आहेत ! मनुष्य मेल्यावर

त्याची काय अवस्था होत असेल! बरं, पण येवढ्या ब्रह्मज्ञानांत मीं कशाला शिरले. जो एकवार निश्चय केला तोच खरा; मग त्यामुळं हवं तें जरी झालं तरी चिंता नाहीं. पण, दासी कुठं गेली. त्या फत्तेसिंगाकडे पाठविली होती, निरोप वगैरे सांगून काय जबाब आणलान् हें सुद्धां सांगितलन् नाहीं. काय बाई तरी हिला करावं! आणि थोडं कमी जास्त बोललं कीं, लागलींच येवढंस तोंड करून मुळमुळ रडायला लागते. बरं, आतां येऊं दे तर खरी, ह्मणजे चांगलीच खोड मोडते. ह्मणतातना "चांभाराच्या देवाला खेटराचांच पूजा" पाहिजे. (इतक्यांत दासी प्रवेश करिते तिजकडे पाहून रागानें) कायग, ए रांडे! होतीस कुठंग येवढा वेळ? काय बाई, मनुष्यानं काम सांगितलं तर त्याचं उत्तर सुद्धां सांगूं नये. असतं तरी कुठं तुमचं चित्त? धन्य बाई, मीं तर बोलून थकले. बरं कायग, गेली होतीस कां त्या फत्तेसिंगाकडे; काय तो ह्मणाला?

दा०—बाइसाब, मी निरोप सांगूनशेनी केव्हांची आलेया पन सरकारचा वाइच डोळा लागला होता ह्मून काल आपुन सांगितलेली मोतीयाचीं फुलें गजरा करन्या कारितां आनन्यास मोतीबागेंत गेल्ये होत्ये तिकडे थोडा येळ लागला बाइसाब; माफी मागतेया.

म०—होकां, वरं त्या फत्तेसिंगानं केव्हां येतो ह्मणून सां-

गितलंनू? भेटला कां तो; काय करीत होता?

दा०— सरकार, बसला होता. मीं त्यास निरोप सांगितला तो ऐकून घेऊनशेनी पांच वाजतां येतो हंगाला बाईसाब.

म०— मग, आता कितीग वाजले असतील ? सयाजी देखील अद्याप आला नाहीं. काय बाई, त्या पोराला काडी इतकी सुद्धां कसली ती काळजी नाहीं.

दा०— बाईसाब, सयाजी म्हाराज वाटेंतच भेटले होते. इकडेच येत होते पन् वाटेंत मध्येंच कोणाशीं बोलत असतीला इतक्यांत येतीला ( इतक्यांत सयाजी प्रवेश करतो ).

स०— ( दासीस ) कायग, ताई आहेत कां आंत, काय करीत आहेत?

दा०— म्हाराज, आपलीच वाट पघत्याती; आतांच सय केली होती, चलावं आंत सरकार.

स०—हं, हं, फार उत्तम आहे चल तर ( महालांत प्रवेश करतो व मदनिकेस नमस्कार करून दासीस ) कायग दासी, फत्तेसिंगाकडून कायग निरोप आणलास.

म०— अरे, पण थांब अमंळ, तूं होतास कुठं येवढा वेळ. तो आतां येईल. पांच वाजले असतील नाहीं कां आतां?

स०— ( खिशांतून घड्याळ काढून ) होय, हे आतांच वाजले.

म०— तर मग आतां येईल. कोण आहेग तीः दासी,

जा बाहेर उभी रहा. व तो आला ह्मणजे त्यास आंत घेऊन येहो. जा लवकर.

दा०—जी सरकार ( बाहेर जाते इतक्यांत फत्तेसिंग दरवाज्यापाशीं येऊन दासीस )

फ०—क्यौंबे लवंडी, सरकारकी सवारी अंदर है. मै आया है करके खबर दे जा.

दा०—आलास बाबा, किती उशीर केलास तरी. चल लवकर. आंत बाइसाब तुझा केधोळ्ची वाट पघत्याती ( त्यास घेऊन आंत प्रवेश करते व मदनिकेस) बाईसाब हे फत्तेसिंग आले हैता काय हुकुम होतोया.

म०—हो कां, बरं जा तूं, मीं सांगते काय सांगायचं तें.

फ०—( मुजरा करून ) सरकार, बंदा गुलाम चरनपर सीस धरता हूं. सरकार, मालिकनें क्या सबबसे मेरेकु बुलाया.

म०—अरे फत्तेसिंगा, काम कसलं, ह्मटल नेहमी तूं भेटण्या करतां येणारा तो पुष्कळ दिवसांत आला नाहींस ह्मणून फक्त भेटण्या करतांच तुला बलावलं बरं कां. कां खुशाल आहेसना ?

फ०—वाहवा! वाहवा! सरकार ये बंदेपर इतनी प्यार करतेहै वास्ते मै बोहोत लाचार हूं. खुदावंत; आपकी सब रय्यत आबादी आबाद है, फेर मै कैसा न खुसी रहूंगा मालिक?

म०—बरं, आतांशा तुह्मांला तनखा वगैरे तर

पोटभर मिळतोना? हो, नाहीं तर काय ह्मणता-
तना बाई तशी गत. आमच्या इकडची प्रकृत पड-
ली भोळी, चार चौघे सांगतील तें प्रमाण.
कारण जो इमानानं नोकरी करतो त्याला बाई
पोटभर अन्न मिळायची सुद्धां पंचाईत; व जो
तोंड पुजारीपणा करतो कनई, तो मात्र गब्बर:
अरे, बहुतेक दरबारांत असंच बरं कां. ते-
व्हां ह्मंटलं तुझं तसं न व्हावं, व तुलां सर्वांस
पोटभर अन्न मिळावं, ह्मणून चवकशी करावी असं
वाटतं. बरं आतांशा तूझ्या पलटणींत किती लो-
क आहेत? त्यानांही योग्यतेनुरूप तनखा मि-
ळून तेही खुषी आहेतना?

फ०—खावींद, सच बात है. महाराज तो भोला-
शंकर है. सरकार, मेरे तावेमे आब्बी
एक हजार फौज है. सब जवान आपापने का-
ममे बोहोत हुषार है, और सबकू तनखाबी ब-
राबर मिलता है, मालिक सब लोक आबादी आ-
बाद होके खुसीमे है, और महाराजकू रातदी-
न दुवा देते है. सरकार, मेरे कू बी तनखा
बराबर मिलता है. खावींद, माहाराज तो सब जानते
है फेर सब अबादी अबाद क्यौं न होवे.
ओहोहो! खुदानें आप दोनोका जोडा सलामत
रखना इतनाही मै हरवख्त उस्केपास अरज करताहूं.

म०—नाहीं, बहुत करून तसं इकडून व्हायचं नाहीं.

पण असं पहा, चार चौघे लबाड कार्यसाधू जवळ नेहमी असतात; तेव्हां त्यांच्या त्या मसलतीस बाई भ्यावं लागतं! वास्तविक ह्मटलं ह्मणजे राज्याची शक्ति कायती फौजेवरच कीं नाहीं; असं कां ह्मणतोस, राज्य इमारतीचा मुख्य खांबच कनई तो; ह्मणन बाई चवकशी करावी लागते. मी ह्मणते हें खरं कीं खोटं? उगीच तोंडदेखलं नाहीं मीं बोलायची.

फ०—खावींद, आबही सब जानते है, मै क्या कहूं. फेर खुदाकी कसम ऐसा पालनवाला मालिक कब्बी हुवाबी नही और आगे होनेवालाबी नही. वाहवा! मै बंदा क्या तारीफ करूं सरकार! आब सबपर सरीखी प्यार करते है तो खुदा आपनेपर क्यौं न मेहर रखेगा; अलबत जरूर रखेगा; वाहवा! वाहवा!

म०—बरं तें असो; पण, आज तूला कां बोलावलं समजलास कां? माझं काम कांहीं नाजुक करायचं आहे; तेव्हां तें कोण करील या विचारांत होते; इतक्यांत तुझं स्मरण होऊन, पुष्कळ दिवसाचा तूं इमानी नोकर, तेव्हां तुझ्या शिवाय हें काम दुसऱ्याच्मानं होणार नाहीं; झालं ह्मटलं तर, माझं काम केलंस ह्मणजे तुझं हीं त्यांत कल्याण होणार आहे. मग काय, करशीलका तें काम तूं?

फ०—( थोडया धीरश्रीनें ) ये क्या बात है. मा-

लिकका काम उठानेकेवास्ते मै आपना जानकीभी आशा न रखूंगा. आपका निमक आजतक खाया है फेर सरकारका काम कुचवी हो, क्यौ नही उठायगा. ऐसी हरामखोर जात रजपूतकी कब्बी नही रहती. क्या हुकुम है सो एकदफे बंदेकु फर्मा देव· अब्बीके अब्बी बनवा देता हूं.

म०—( अंमळ तोंड वाईट करून ) फत्तेसिंग, तुह्मीं काम कराल यावद्दल मला मुळींच शंका नाहीं. मीं ह्मणते, आह्मी राजाच्याना बायका, मग आह्मांला सुख व अब्रू कांहींच कां नसावींत? काय करूं, ह्मणतात तें कांहीं खोटं नाहीं " जितकं मोठं तितकं खोटं " काय, ह्मंटलं ह्मणजे आह्मीं नेहमी सुखांत राहयचं तें एकीकडे राहून या कार्टीच्या दुर्वर्तनानं सर्व कुलास काळोखी आणली. काय सांगं फत्तेसिंग, रात्रंदिवस ऱ्हद्रोग लागल्या सारखी माझी अवस्था झाली आहे. चैन ह्मणून मुळींच नाहीं. काय करावं वरं? ( उसासा टाकते. )

फ०—( अमंळ घाबरल्यासारखें करून ) बाईसाब, ये क्या बातहै. तोबा! तोबा! ( तरवार सरसांवून ) सरकार, ऐसा कौन दुष्मन हरामखोर है के मालिककूं ऐसा सताते है. ऐसे बेवकूब शख्सकूं अब्बी के अब्बी जाल्मके पडदे परस निकाल डालताहूं. एकदफे बयान तो कर देव सरकार. तोबा! तोबा! सरकार, रो मत. ए परवरदिगार सब दुनयाकी पालन वाली होके इस्कुबी

दु:ख है; तो इतना ही सच कीं सब दुनियामे आराम किस्कुबी नही होता है. मालिक, क्यों न बयान करते?

म०– फत्तेसिंग, न सांगायला काय झालं? तुमच्या शिवाय दुसऱ्याच्यानं हें काम मुळींच होण्यासारखं नाहीं, आणि ह्मणूनच तुह्मांला बोलावून आणलं; तर तुमच्यापाशीं नव्हे तर दुसऱ्यापाशीं कां हें काम सांगायचं आहे. पण ह्मटलं, बाई काम आहे फार नाजुक, या कानाची गोष्ट त्या कानाला कळतां कामा नये, आणि हें काम करीनच अशाबद्दल बेलभंडार केला पाहिजे. तुमच्या हातून काम होण्यासारखंच आहे हो; तुमच्या शक्तीच्या पलीकडचं नव्हे कांहीं. ( हळदीकुंकवाचा डबा पुढें करिते ).

फ०– सरकार, आजतक हम इतना लढाई मारा, और बहोत बोडाबडा कामबी उठाया, लेकिन बेलभंडार उठानेका कुच जरूरबी नही पडा. फेर आज बेलभंडार उठानेके वास्ते हुकुम होता है ये क्या बात? ( अमंळ विचार करून यांत कांहीं तरी दगा आहे असें समजून ) अच्छा, पहिले काम तो बोल देव फेर बेलभंडार उठाते है. वखतपर मालिक आकाशमेका सुरज नारायन लानेकु बोलेगा तो क्या मेरे बावासे ये काम होगा!

म०–अरे, प्रथमच सांगितलंना कीं तुझे हातून होण्यासारखंच तें काम आहे. तरी विश्वास नाहींच.

पाहिलंस, ह्मणूनच ह्मणते कीं आधीं वेलभंडार कर मग सांगते. हं हा घे डब्बा. तूं जर माझं काम खरोखर करणार तर मग वेलभंडार करण्यास हरकत ती कोणती ? खऱ्याला काय बाई मरण !

फ०—सरकार, आपका मेरेपर भरोसा नही तो मेरा कैसा रहेगा. पहिले मतलब कह देना फेर मैं वेल-भंडार उठानेकु राजी है खाविंद.

म०—काय बाई तरी, आजपर्यंत आमचं अन्न खाऊन त्याचे असे उपकार फेडतोस काय ? एकून तुला आजपर्यंत पोसलं ही आमचीच चूक. बरोबर आहे तुजकडे काय त्याचं. पात्र पाहून दान करावं ह्मणतात तें कांहीं खोटं नव्हे. अरे, तूं जर खचित माझं काम करणार, तर वेलभंडार करण्यास हरकत ती कोणती ? कायबाई तरी चमत्कार!

फ०—तोबा, तोबा! सरकार, ऐसा वात मत करना. हमारे रजपूत की जात ऐसी हरामखोर कब्बी नहीं रहती. अच्छा सरकार, आपकी इतनी ही इच्छा है तो, ये लेव वेल भंडार (हळद कुंकु उचलून मदनिकेच्या हातावर देतो ) बस, बोलो अबी सरकार, क्या हुकुम है.

म०—अरे, काम ह्मणून कांहीं मोटं नाहीं. आपली ती कारटी आहे कीं नाहीं तिनं, तो लबाड पुण्यशील, परवा इकडूनच वाड्या बाहेर हाकून लावला तो, त्याजशीं कांहीं पापकर्म केलंन् व त्याबद्दल „सर्व

जण आह्मांस दुषण देत आहेत, व आह्मीं प्रत्यक्ष सत्ताधीश असून लोकांस तोंड दाखविण्याची सुद्धां आ-ह्मांला लाज वाटते. बरं, एवढा मोठा अपराधहि आह्मीं पोटांत घातला. कारण, आमचीचना ती. आणि इकडूनहि तिला सांगितलं कीं झालेली गोष्ट कांहीं परत येत नाहीं पण आतां तरी कांहीं आढे वेढे न घेतां मुकाट्यानं लवकर सयाजीला माळ घाल. पण छेः, राम शिव गोविंद. हट्टीच पोर ती, ऐकणार कां आहे कोणाचं? तिनं आपला एक हट्ट धरला आहे कीं, मीं त्या भिकारड्याशीं विवाह केला आहे; तेव्हां त्या शिवाय इतर पुरुष मला बापा भावा प्रमाणं आहेत. काय बरं या पोरीला करावं आतां? आह्मांला हिच्या पेक्षां कांहीं जास्त समजत असेल. तेव्हां इकडे असा राग आला आहे कीं, ही एकदाची पीडा टळते कशी. तेव्हां त्यांनीं तें काम मला सांगितलं आहे. कारण जरी त्यांच्या मनांत ही गोष्ट फार आहे तथापि उघड कोणची ही गोष्ट त्यांस करतां येत नाहीं. तेव्हां उद्यां रात्रीं कांहीं भूल पडण्या जोगा पदार्थ मीं तिच्या पोटांत जाईल अशी तजविज करते व बारा वाजण्याचे सुमारास तुह्मीं तिला घेऊन जाऊन रातोरात लांब न्यावं व तिला ना-हांशी करून टाकावी. समजलातना? काम कां-हीं मोठं नाहीं. एकदां मनावर घेतलं कीं सहज होणार आहे, खरं कीं नाहीं रे सयाजी?

स०–उघडच आहे, आणि तें काम यांचे शिवाय दुसऱ्याचे हातून होण्याजोगेंहि नाहीं; आणि आतां यांनीं बेल भंडाराहि केला आहे; तेव्हां यांस तें काम जरूर केलंच पाहिजे. कां फत्तेसिंग, आतां चिंताग्रस्त कां बसला, व येवढा विचार तो कसला? आहे काय त्यांत, एक घाव आणि दोन तुकडे!

फ०–(तरवार टाकून व उदास होऊन) अरे भगवान, ये संकट मेरेपर क्या लाया. अरे, ये मा आप होके लडकीकूं मार डालनेके वास्ते मेरे हातसे इने बेल भंडार उठाके लिया तोबा, तोबा! आब्बी मैं क्या करूं ( विचार करून कांहीं तरी युक्तीनें हिला अडिवलें पाहिजे) सरकार, क्या, ये कामके वास्ते मेरे हातसे आप बेलभंडार उठाके लिया. वाः! बोहोत खूप. आप तो ताईसाहेबकी मा हो फेर ऐसा काम करनेके वास्ते कैसा हुकुम फर्माते हो. येक्या मेरी टटोली चलाई है. अरे भगवान, वाहवा, वाहवा!

म०–( रागावून ) मूर्खा, थट्टा कसली. तुझ्याशीं मीं थट्टा केलेली तुला आठवतं का कधीं? माझीच तूं थट्टा करतोस वाटतं. तुझी माझी योग्यता सारखीच कारे मेल्या! अरे ताटाखालचं मांजर तूं. सांगितल्या कामाचा आणि घातल्या अन्नाचा. मेल्या तूं, काम करायचं सोडून जीभ लांबकरून फारसा बोलतो आहेस. लाज नाहीं वाटत तूला.

ल्हाना तोंडीं मोठा घांस घेतला ह्मणजे घशांत अडकतो हो. करणार कीं नाहीं तूं हें काम?

फ०—( अत्यंत रागावून ) सरकार, ये बात हमारे पास नही चलेगा. ये कामके वास्ते मै बेलभंडार नही उठाया. ऐसी हरामखोरी करनेंवाला ये फत्तेसिंग नही. ये काम मेरे हातसे कब्बी न होगा चाहिये मेरा जान लेओ मगर दुसराबी कुच करो. (तरवार टाकून देतो. )

म०—( संतापून ) काय, हें काम तुझ्या हातून होत नाहीं तर एकून? मज सारखी बायको जरी झाला असतास, तर एखाद्या गरीबाचं घर उभं राहिलं असतं. मूर्खा, बांगड्या तरी भर. त्या रजपूत जातींत जन्मून तीस कलंक लावूं पहातोस. जर तुला माझं काम करणं नव्हतं तर बेलभंडार कशाला केलास? मेल्या, विसरलास वाटतं; कांहीं विचार करून बोल.

फ०—( थोडा शांत होऊन आपल्याशींच, क्या मै बेलभंडार उठाया ये बात कुच अच्छा नही किया. औरतकी जात बडी कपटी रहती है. इनके सल्लेसे जो आदमी चलेगा उस्का बेशक सत्यानास होवेगा. अच्छा कुच परवा नही. “ बुंदसे गयी तो हौदसे नही आती. ” पुनः रागावल्यासारखें करून व तरवार सरसावून ) सरकार, ये काम उठानेकु मै नामर्द हूं. ऐसी कुच बात नही. लेकिन तुमारे हुकु-

मसे मै ये काम कब्बी न करूंगा वास्ते आपका दस्कत, और महाराजकी उसपर निशानी करके ये काम करनेकेवास्ते मेरेकु हुकुम मिलेगा तो मै ये काम उठायगा नही तो मेरेसे ये काम नही हो सकता.

म०—अरे, पत्र कशाला पाहिजे. मी सांगते येवढ्यावर विश्वास नाहींका तुझा? एकदां जें मीं बोलेन तें प्राण गेला तरी फिरवायची नाहीं हो, हें खूप समज.

फ०—नही नही, ये कुच मै नही जानता. खत तो जरूर होना. देनेकु तयार हो तो देव नही तो ये मैं चले जाता. ( उठून जाऊं लागतो. )

म०—( मनाशीं वरं झालं मीं आधींच तयारी करून ठेविली होती ह्मणून. मला स्वप्नच पडलं होतं तसं. उघड ) हं, हें घे मेल्या पत्र; ( पत्र त्याचे आंगावर टाकते ) झालंना आतां. मग केव्हां हें काम करणार?

फ०—( पत्र पाहून विस्मित होत्साता मनाशींच वाहवा! क्या, सरकारकीबी अक्कल गुंग हो रही. क्या, आपने लडकीकु जानसे मारडालनेकु हुकुम करता है! ये परवरदिगार! तेरा खेल तो बोहोत अजब है! ये सब जगत मायेसे जखडबंद किया है इसवास्ते अभी सच, और झूट कोनसा, ये पच्छाननेकु नही सकता. अच्छा उस्का आखेरी क्य होगा

ये मै खूप जानता हूं. अच्छा सरकार जब आपका हुकुम होवेगा तब मै तयार हूं. मै अबी रजा लेता हूं.

म०—बरं, उद्या रात्रीं तुह्मी चांगले चार जवान घेऊन तिच्या महालाजवळ तयार असा. मी तिला भूल पड-ण्याचें औषध उद्या संध्याकाळीं देईन, ह्मणजे नऊ वाज-ण्याचे सुमारास ती बेशुद्ध होईल व नंतर सर्व रा-त्रभर ती तशीच राहील, मग तुह्मी तिला लांब रा-नांत घेऊन जाऊन हें काम करा समजलातना ?

फ०—अच्छा, कल मै इदर तयार रहता हूं. अब मै रजा लेता हूं सरकार (मुजरा करून निघून जातो.)

म०—कां सयाजी पाहिलसना काय आढेवेढे घेतलेन् ते, मीच एक त्यास खबरदार मिळाले ह्मणून त्याची अक्कल कांहीं चालेना. काय मेला लबाड तरी!

स०—ताई, हें काय विचारावें; माझें शहाणपण तरि तुझ्याच सल्ला मसलतीवर. आतां तूं आपले कडून तर हें काम बरोबर केलें आहेस, होईल तेव्हां खरें.

म०—आतां त्याची काळजी तूं अगदीं सोड. हें काम झालंच असं समज; मात्र उतावीळ होऊं नको व कोणापाशीं चकार शब्द सुद्धा बोलूं नको.

स०—छेः ग ताई असें कसें होईल. मी अगदीं कोणा-पाशीं बोलणार नाहीं.

म०— दासी, ही बातमी जर दुसऱ्याला कळली तर मात्र काय होईल याचा विचार कर समजलीस; किती ग वाजले असतील आतां?

दा०— छे: बाईसाब मला वटकीला कशासनी इकित पंचाइत व्हइ. सरकार आतां सहा वाजण्याचा अंमल झालाया.

म०— होका, जा तर रथ सिद्ध करून आणण्यास सांग ह्मणजे ती परवा नवीन बाग तयार केली आहे तिकडे तरी घटकाभर जाऊन विश्रांती घेऊं. सयाजी तूं येणार का?

दा०— जी सरकार (निघून जाते.)

स०— ताई मीही येतो, हा पोशाख बरा आहे नाहीं बरें. (दासी प्रवेश करते.)

दा०— सरकार रथ केधोळचा तयार हाय, आपल्याच कडून उशीर हाय.

म०— होका, मलाग काय ठाऊक. ही उठले तर. सयाजी चल ऊठ बाबा. लवकर परत आलं पाहिजे कारण स्वारीची येण्याची वेळ होत आली आहे नाहीं तर घरीं येणं झालं आणि मी नसले ह्मटलं ह्मणजे बाई रागावणं होईल हो.

स०— चला तर, मला काय मी तयारच आहे.

म०— चल दासी तूंही चल.

दा०— जी बाईसाब चलावं (सर्व निघून जातात).

प्रवेश पांचवा समाप्त.

**अंक दुसरा समाप्त.**

## अंक तिसरा.

| | |
|---|---|
| शौर्यसागर | ........ कनक नगरीचा राजा. |
| मदनिका | ........................ त्याची स्त्री. |
| सयाजी | ................ मदनिकेचा भाचा. |
| मंत्री चोपदार<br>भालदार | ........इतर दरबारी मंडळी. |
| फत्तेसिंग व दुसरे<br>चारजण | सौंदर्यवल्लीचे मारेकरी. |
| सौंदर्यवल्ली | ........................राजकन्या. |
| अनुराधा व<br>रेवती | ........ सौंदर्यवल्लीच्या सख्या. |
| सारजा | ................ सौंदर्यवल्लीची दासी. |
| सत्यशील | ....सौंदर्यवल्लीचा विश्वासू हितकर्ता. |
| दुर्वासऋषी | ........ वनांतील महान् तापसी. |
| शिष्यवर्ग | .................... ऋषिसेवाजन. |
| वेत्रवती व<br>सानुमती | ..................... ऋषिकन्या. |

## प्रवेश पहिला.

( सौंदर्यवल्ली, अनुराधा, रेवती व सारजा दासी प्रवेश करतात. )

अ०– कायग सखे सौंदर्यवल्ली, तुझी कनइ बाई मला मोठी काळजी आहे; कशी ह्मणशील तर बाई

तुझं कोणी सुद्धां चांगलं पहात नाहीं झालंच ह्मटलं तर परवा तो चांडाळ सयाजी इकडे आला होता तेव्हां त्याचीही चांगलीच फजिती झाली. त्यानं कां तें त्या माहामायेला सांगितलं नसेल ह्मणतेस? मग काय, त्या सटवीच्या तळव्याची आग मस्तकांत गेली असेल. कायबाई करावं, कसं हें संकट जगदंबा टाळून उभयतांचे मनोरथ पूर्ण करील व केव्हां यांचा जिव सुखी होईल तो होवो.

रे०— अग छे:, सांगितलं नसेल अशी संशययुक्त कां बोलतेस? मला तर बाई वाटतं त्यानं खचित् सांगितलं असावं; कारण आह्मीं कोणी तिच्या दृष्टीस पडलों कीं एकेक डोळा केवढा मोठा करते. फुटले कां नाहींत ते मेलीचे डोळे! काय आह्मीं तिच्या डोळ्यांत मावणार आहोंत कां हिच्या आह्मीं गांव मोकाशा काढल्या कां केलं तरी काय? आणि पहावं तों आपली नेहमी कुजबुज चाललेली असते. मग कसले बेत करतात व कोणाचं राज्य घेण्याचा विचार असेल तो असो!

सौ०— सख्यांनो, काय सांगूं मला वाटतं मजवर कांहीं तरी संकट ती आणील. असो एकदां माझा नाश केलान् ह्मणजे मी सुटले तरी एकदाची. ह्मणतातना एक घाव न दोन तुकडे. करायचं काय मेलं अशा स्थितींत जगून? नको नको; तें जगणंही

नको आणि तें दु:ख सोसणंही नको. मी ह्मण- ते असं जर खरं असेल तर जगदंबेनं माझं गाऱ्हा- णंच ऐकलं ह्मणायचं आणि तिला जर तशी बुद्धि झाली तर ती माझ्या सुदैवानंच झाली समजा- यची. देवापाशीं मागणं ह्मणून एवढंच कीं तिक- डचा जीव मात्र सुखी ठेवावा मग माझं कांहीं जरी झालं तरी त्याची मला मुळींच भीति नाहीं. कां सख्यांनों, मी ह्मणते हें खरं कीं खोटं?

अ०— सखे, आमचा जीव जो तुझां उभयतां करतो तिळतिळ तुटतो आणि तुझं सहाय करावं ह्मणू- न आह्मी ज्या इतक्या जीवावर देखील उदार झालें आहोंत तें तूं असलं अभद्र भाषण बोलून आह्मीं ऐकावं येवढ्या करतांच कां? अग प्राणी उत्पन्न झाला तेव्हां देवानं त्यास मृत्यू नेमून ठेवलाच असतो. पण उगीच उठलं आणि जिवावर उदार झालं तर आह्मांला गोड कसं वरं बाई लागेल (तिच्या ज- वळ जाऊन ) सखे असं करूं नये. अग आह्मांला तूं शहाणपणाच्या गोष्टी शिकवतेस आणि थोड्या दिवसाच्या विरहानं तुझी अशी दशा होऊन तूं इतकं निराश व्हावसना? अग, शक्ति तर सर्व नाहींशी झाली लावण्य मात्र उरलं आहे. काय ही अवस्था! जा मेलं अगदीं वेड्या सारखं काय करावं. लवकरच हे दिवस जाऊन सुखाचे दिवस येती- ल हो. सखे, असं भलतं भलतं बोलूं नये कांहीं

विवेक करावा. किती बरं जिवाला त्रास करून घ्यावा.

रे०— सखे, तिनं तरी कायग करावं? मी ह्मणते, मेलं कांहीं दुःख कांहीं सुख असं असेल तर मनुष्य कांहीं विवेक करील पण एकामागून एक आपली सर्व दुखंच येऊं लागलीं तर बाई मनुष्य सोशिल तरी किती. बरं पण कायग सखे, त्या बयाचे काय विचार चालले आहेत ते बाई एकदां कळले तर बरं होईल. कसेग ते कळतील तुला कांहीं युक्ति सुचत असल्यास सांग पाहूं?

अ०— युक्तीच ह्मणून कांहीं नव्हे; पण बाई मला वाटतं त्या सत्यशीलास कदाचित कांहीं माहित असलं तर न जाणो; कारण त्याचं लक्ष उभयतांचे हिताकडे जसं आहे तसं आमचंही नसेल. झालं ह्मटलं तर तो चवकसही पुष्कळ आहे तेव्हां चवकशी केल्यावाचून त्याच्यानं कांहीं राहवणार नाहीं बाई. पण तोही दोन दिवसांत आला नाहीं. हो येतो कसा, त्याला तरी यायची ह्मटलं ह्मणजे चोरीच कीं नाहीं. मला वाटतं सारजेला पाठवून तरी त्याला आणवावं ह्मणजे कांहीं वातमी कळली तर कळेल तूला कसं वाटतं सखे?

सौ०— तूं ह्मणतेस तसं असण्याचा संभव, आहे खरा; पण मी ह्मणते कळून तरी बाई करायचं काय? जें जें होईल तें तें दिसेल याउपर बाई तुमची मर्जीच

असेल तर पाठवा बोलावूं माझी कांहीं ना नाहीं. पण बाई तुमच्या समक्ष तो मजजवळ कांहीं बोलेल असं वाटत नाहीं तेव्हां तुह्मीं, तो आला ह्मणजे, बाहेरील बाजूस व्हा ह्मणजे झालं.

रे०— हो, तसंच कां होईना. खरंच बाई हें मला सुद्धां बरं दिसतं. कोण आहेग ती दासी, सारजे, त्या सत्यशीलाच्या घरीं जा व त्याला बोलावलं आहे ह्मणून सांगून घेऊन ये. लवकर येहो नाहींतर आचरट आहेस जाशील तिकडेच बसशील, जा लवकर.

सा०— अं, मी आचरट व्हय सरकार. ही आल्येच ह्मंगा. ( निघून जाते इतक्यांत सत्यशीलाची वाटेंत गांठ पडते तिला पाहून. )

सत्य०— सारजे, इतक्या लगबगीनें कोणीकडेग चालली होतीस? मनुष्यसुद्धां कां तुला दिसत नाहीं.

सा०— दादा, तुह्मी नव्हका ते. आन् तुमच्याच घरासनी बोलवाया चालल व्हते कीं. बाईसाबांनीं सांगितलं कीं तुह्मांस बोहून आन म्हंगुन बाइच धांदलींत व्हते आन् दुसरं काय; चला तर.

सत्य०— असें काय; बाईसाहेब काय करीत आहेत? प्रकृति खुशाल आहेना.

सा०—खुशाल कुठुन असणार पर है हानायची बाइच बरी है.

सत्य०— हं बरें चल तर (दोघेही निघून महालाचे दरवाज्याशीं येतात; सारजा आंत प्रवेश करते व

सत्यशील बाहेर उभा राहून ) सारजे . जा आंत बाईसाहेबांस मी आलों आहे ह्मणून कळवून परवानगी घेऊन मला कळविण्यास ये तोंपर्यंत मी येथेंच उभा राहतो.

सा०— ब्येस. ( आंत प्रवेश करून ) सरकार सत्य-शील बाहेर उभे हैता व मला परमाणगी मागन्या-करितां पाठविलं हाय.

सौं०— अग, त्यानां परवानगी कशाला ती. जा लवकर घेऊन ये.

सा०— जी बाईसाब ( सत्यशीलास घेऊंन ) चला दादा आंत सरकार वाटच पघत्याती.

सत्य०— हं, बरें तर चल ( प्रवेश करतो व मुजरा करून ) सरकारची तब्यत तर ठीक आहेना.

सौं०— सत्यशील, तुह्मांस सर्व माहित असतां असा प्रश्न करतां याचंच मला नवल वाटतं. असो, आहे साधारण बरी आहे.

सत्य०—तो हृद्रोग आपली मनीषा पुरी झाल्यावाचून बरा होणार नाहीं हें तर मी पक्कें जाणतच आहे. पण माझ्या विचारण्याचा अर्थ येवढाच होता कीं, स्वारीची शरीर प्रकृति बरी आहेनां. सरकार बो-लल्याची माफी असावी.

सौं०— ह्मणजे हे काय तें. क्षमा ती कसली करायची. माझा अपराध कां कांहीं तुह्मी केला आहेत. बरं असो. सत्यशील आजचे दिवसांत मुळींच इकडे

आपण आला नाहींत याचं कारण तरी काय; कांहीं कमीजास्त तर खबर नाहींना; तिकडचं कांहीं पत्र-त्रित्र कां आलं होतं खुशाल आहेतना.

सख०– ह्मणजे परवा नुकतें आलेलें पत्र मीं आपल्यास कळविलेंच होतें त्या नंतर कांहीं अद्याप आलें नाहीं. कां सरकारास कमी जास्त बातमी कांहीं समजली कीं काय.

सौ०–छेः हो, मला कोठून समजणार? पत्र आलं तर तुमच्या कडेच यायचं कीं नाहीं ह्मणून आपलं सहज विचारलं. आणि वास्तविकच आहे त्यांच्या कुशलत्वापेक्षां अधिक प्रीय वस्तु ती मला काय आहे!

सख०–आणि सरकार मला तरी त्या वाचून या जगतांत प्रीय वस्तु काय आहे. कारण आपणा उभयतांचें कल्याण त्यांतच मला सौख्य असें मीं समजतों.

सौ०–बरं, पण आलिकडे वाड्यांतली कांहीं कमी जास्त बातमी ऐकलीत कां. कारण आलीकडे पुष्कळ खलबतं चालत असतात ह्मणून बाई विचारते.

सख०–(इकडे तिकडे पाहून) अहाहा! बाई साहेब काय सांगूं आपण फार चतुर आहांत याबद्दल माझी बालंबाल खातरी झाली. सरकार, मीं तीच बातमी सांगण्या करतां येत होतों इतक्यांत या सारजेची गांठ पडली. मला उगीच बसून चैन कसें पडेल पण सरकारची बातमी थोडी भयंकर आहे तेव्हां

सांगितल्या पासून मनास कदाचित अधिक भीति व दुःख होईल याची मला काळजी वाटते.

सौं०—सत्यशील, अहो इकडच्या विरहापेक्षां अधिक दुःख होणारी वस्तु या जगांत मला दुसरी दिसत नाहीं तेव्हां दुःख होईल याबद्दल मुळींच काळजी नको. आतां भीति वाटेल ह्मणतां ती तरी कशा साठीं? मीं ह्मणते एकदां तिनं माझं कमी जास्त कांहीं करून टाकलंन् ह्मणजे मीं सुटले एकदाची कशी. मग हें दुःख तरी सोसणें नको. तेव्हां मनांत कोणत्याही रीतीची शंका न बाळगतां सांगा पाहूं एकदाची काय ती बातमी?

सत्य०—बाईसाहेब, आपण असे निराश झालां तर आह्मीं आज पर्यंत वांचून आपल्या हिताविषयीं रात्रंदिवस काळजी वाहतो त्याचा काय उपयोग. सरकार असें निराश होऊं नये कारण जरी ती बातमी प्रथम दर्शनीं भयप्रद वाटत आहे तथापि माझ्यामतें ती पुढें सुख-दायकच होईल कारण प्रभूची इच्छाच तशी दिसते. जर तसें होणार नसतें तर ही बातमी मला आधीं कळलीच नसती मग त्याबद्दल युक्ति काढणें तर लांबच राहिलें.

सौं०— ती कशी सांगा पाहूं? कारण, ह्मण आहेना होणंजाणं भाग्याधीन असतं. हें सर्वांस कळतं पण उघडया डोळ्यांनीं प्राण जात नाहींना. आतां आशा ही मोठी वाईट वस्तु आहे कारण "आशायाः

परमं दुःखं ” असं एक साधुवाक्य आहे. पण बाई आज तुमच्या सारखे माझे हितकर्त्ते एक आहेत ह्मणून बाई मलाही थोडीशी आशा उत्पन्न होते खरी. आतां कोणची बातमी व त्यास तुह्मी काय युक्ति काढली आहे ती एकवार कळूं तर द्या. तुमच्या विचारा बाहेर मी नाहीं. पण सत्यशील, हे तुमचे उपकार आमचे हातून कधीं व कसे फिटतील ते फिटोत.

सत्य०—महाराज, हें काय भलतें बोलणें. या दासाचे कसले उपकार. आमचें कर्त्तव्य आह्मीं करीत आहोंत. सरकार, बातमी ह्मणून हीच कीं त्या माहामायेनें फत्तेसिंग जमादाराचे साह्यानें आपला प्राणनाश करण्याचा निश्चय केला आहे.

सौं०—[मनास धक्का बसल्यासारखं करून व काबऱ्या बावऱ्या मुद्रेनं] काय! इथपर्यंत गोष्ट येऊन ठेपलीना. हर हर! देवा! आतां मात्र प्राणप्रियाची मूर्त्ति पुन्हा दृष्टीस पडण्याची आशा नको. असो, देवा तूं माझं गाऱ्हाणं लवकर ऐकलंस याबद्दल मी तुझी फार उपकारी आहे. प्राणनाथ आतां माझ्या विरहानं मात्र आपल्यास अत्यंत दुःख होणार आहे तर तें मुळींच न करतां दुसरी सौंदर्यवल्ली करून सुखोपभोग घ्या बरं. या दुर्दैवीनं आपल्यास घोटाळ्यांत घालून काडी इतकं सुद्धां सुख दिलं नाहीं इतकंच नव्हे तर उलट दुःखास मात्र कारण झाली येव-

त्याबद्दल मात्र क्षमा असावी. ( उसासा टाकून ) सत्यशीला मग याला युक्ति योजण्याचं मुळींच कारण नाहीं. कारण औषधावाचून दुखणं गेलं असं मीं समजते. काय नाई तरी तिचं साहस पण! हीं पातकें ती कुठं फेडील. पण मला काय करायचं आहे व तिला दुषण कां लावावं; कारण माझं तिनं हितच केलं आहे तेव्हां माझी हितकर्तीच ती असं मीं समजते. सत्यशील एकून माझ्या मनाप्रमाणं तुली बातमी सांगीतलीत. हा घ्या माझा चंद्रहार तुमच्या कामगिरीबद्दल! मीं तुह्मांस हा बक्षिस देते. ( चिंताग्रस्त बसते ).

सत्य०— सरकार, हें काय हें. याकरितांच कोणचीही गोष्ट कानांवर घालण्यास भीति वाटते. असा आपण धीर सोडूं नये. या सत्यशीलास ही बातमी वेळेवर कळली असून तजवीज केल्याशिवाय तो स्वस्थ राहील असें आपणांस वाटतें काय? प्रथम सत्यशीलाचे प्राण जातील नंतर आपल्या केंसास धक्का लागेल असें समजावें. त्याचप्रमाणें पुण्यशील महाराजांकडे आपण लक्ष दिलें पाहिजे; कारण आपण जर असें कराल तर ते आपल्या करतांच केवळ इतकीं दुःखें भोगीत आहेत व तीं सर्व गिळून जाऊन परमेश्वरावर भार टाकून आलेले प्रतिकूळ दिवस महत् प्रयासानें कंठीत आहेत, त्यांची हें वर्तमान ऐकल्यावर काय बरें अवस्था होईल याचा पक्का विचार करून

निराश न होतां धैर्य धरून आलेल्या प्रसंगास दैवावर विश्वास ठेवून पाठ द्या व मीं सांगतों हें ऐका ह्मणजे सर्व संकटांचें निरसन होईल सरकार; तर विनंती मान्य करणारका ताईसाहेब?

सौं०— पण, बाई मी ह्मणते एवढ्या सर्व दुःखाचं कारण मींचना मग माझं बरं वाईट झालं ह्मणजे सर्व दुःखांचा शेवट नाहींका झाला; आणि तिकडे तरी इतका त्रास व इतकं दुःख होतं आहे तें तरी माझ्या मुळंच कनइ तर मग ही अशी दैवहीन पापीण फार दिवस जगून तरी काय करायची आहे? आणखी दुःखाचे डोंगरच वाढवणार कनइ;तेव्हां मला बाई वाटतं होतं आहे तें ठीक आहे, आपलं बोलूं नयेन चालूं नये.

सख०— ताईसाहेब,असं नव्हे. आपणा उभयतांच्या सुखदुःखास एकमेक सारखेच कारण आहांत; कारण आपला उभयतांचा संबंधच तितका निकट आहे. फार काय सांगूं आपण मूर्ती मात्र दोन दिसत आहांत पण वास्तविक प्राण एकच आहे. त्यांतून उभयतांची प्रीति किती! अल्प कालाच्या वियोगानं आपली उभयतांची स्थिति काय झाली आहे ती स्पष्ट दिसत आहे; मग निरंतरचा वियोग झाल्यास महाराजांचे प्राण वांचण्याची यत्किंचित् तरी आशा आहे काय! आपण विचारी आहांत आपणांस सर्व समजत आहे; मीं सांगावें अशांतला प्रकार नाहीं, तेव्हां अंमळ शांतपणानें विचार केल्या-

स मीं सांगतों हें अक्षरशः खरें आहे असें आपल्या लक्षांत येईल ताईसाहेब.

सौं०—अहाहा! सत्यशीला, केवढे तुमचे दूरवर विचार. प्राणनाथांनीं तुह्मांस मजजवळ ठेवलं तें कांहीं उगीच नव्हेहो. पण अर्थाअर्थीं संबंध नसतां इकडे तरी तुमचा स्वभाव कळण्यास काय कारण झालं. ऋणानुबंधाच्या गोष्टी बाई कांहीं निराळ्याच असतातहो. तें कांहीं असो पण तुमचे आह्मांवर अतिशयच उपकार आहेत ते आमचे हातून फिटण्याची आशा सुद्धां करण्यास नको. असो. परमेश्वरानंच तुह्मांस आमचे साह्यार्थ पाठविलं, तेव्हां त्याचाही आमचेवर अनुग्रहच झाला असं समजलं पाहिजे.

सत्य०—हं, ईश्वरी अनुग्रह ह्मणतां हें मात्र खरें; बाकी माझी जी आपण स्तुती केलीत त्यास मीं मुळींच पात्र नाहीं; कारण आपलें अन्न मीं खातों त्याप्रमाणें हा दास आपल्या अल्पमतीनें होईल तितकी सेवा करून आपलें कर्तव्य बजावीत आहे; यांत उपकार ते कोणचे व त्याबद्दल वारंवार ताईसाहेबांस खेद करण्याचें कारण तें काय?

सौं०—असो, विचाराअंतीं तुमचं ह्मणणं अक्षरशः खरं आहे अशी माझी खात्री झाली. आतां आपण कोणच्या युक्तीची योजना केली आहेत व मीं कोणच्या रीतीनं वर्तन करावं हें सांगा पाहूं?

मत्य०—हं, आतां प्रथम त्यांचा सर्व बेत आपल्यास कळवितों. (इकडे तिकडे पाहून हळूच) उदईक सायंकाळीं आपणास पिण्याकरतां मोठ्या प्रीती पुरस्सर (वर कांती हो) ह्मणून उत्तम सरबत ती महामाया पाठवून देईल; पण त्यांत ती अमली पदार्थ घालणार आहे. तें आपण प्राशन केलें ह्मणजे आपणास गाढ निद्रा लागेल; इतक्या गोष्टीस सरासरी रात्रीं दाहा वाजतील. त्या वेळीं संकेता प्रमाणें फत्तेसिंग जमादार बरोबर चार लोक घेऊन आपल्या पागेंत तयार राहील. नंतर बारा वाजण्याचे सुमारास आपल्यास अलगत उचलून नेऊन पागेंतील वायुवेगानें जाणारे असे अश्व जोडलेल्या रथांत आपणास ठेऊन रात्रभर मजल दरमजल करीत प्रातःकाळ पर्यंत वाट चालून आपणास एका घोर अरण्यांत नेऊन नंतर ते आपला प्राणनाश करतील; व आपली कांहीं खुण घेऊन येऊन मदनिकेस दाखवून तिजपासून मोठें बक्षिस मिळवितील. ह्या प्रमाणें त्यांचा बेत झालेला आहे ह्यांत; काडी इतकें सुद्धा खोटें नाहीं. कारण मला जें कळलें आहे तें पक्क्या खात्रीच्या मनुष्याकडून कळलें आहे व शहरांतूनही उडत उडत बातमी समजली आहे तीही पण अगदीं तशीच आहे सरकार!

सौ०—(घाबरल्यासारखें करून) हर! हर! देवा काय हें घोर कृत्य! असो, या कृत्याबद्दल झाडे प-

रमेश्वर खचित घेईल. ( थोडें धैर्य धरून ) पण कायहो सत्यशील, हें कृत्य तिला येथें नसतं कां करतां आलं मग मी ह्मणते येवढा उपद्व्याप करण्यास नको होता नव्हेका?

सत्य०— अहाहा! ताईसाहेब, किती हा भोळा स्वभाव! त्या महामायेच्या कृति व कल्पना आपल्या लक्षांत येणार नाहींत. उघडच आहे जी गोष्ट स्वप्नांत सुद्धां यावयाची नाहीं त्याचें ज्ञान नसणें स्वाभाविकच आहे. सरकार फार चांगलें विचारलें, ऐकावें. आलिकडे आपल्यास तिचे हातून अत्यंत जाच होत असल्याबद्दल व आपल्या अगदीं निरपराधीपणाबद्दल महाराजांच्या विश्वासू अशा पुष्कळ लोकांच्या तोंडून कागाळ्या सरकारच्या कानांवर गेल्या आहेत, व तेव्हांपासून त्यांसही तिच्या वर्तनाबद्दल बराच संशय उत्पन्न झाला आहे; परंतु त्या महामायेनें त्यांस अगदीं वेडें करून टाकल्यामुळें प्रत्यक्ष पाहिल्यावाचून कोणचीही गोष्ट महाराजांच्यानें करवत नाहीं. हें सर्व ती महामाया पक्कें जाणत आहे; तेव्हां आपला संशय बिलकुल न येऊं देतां परभारें हें काम करावें व महाराजांस कळलेंच तर मला कांहीं ठाऊक नाहीं; पण ती कोणा बरोबरशीं निघून जाणार होती असें दासी वगैरे बोलत होत्या, पण आपल्यास तें खरें वाटलें नाहीं असें सांगून गोड गोड भाषणांनीं त्यांची समजूत करावी व आ-

पला हेतू निर्भयपणें सिद्धीस न्यावा हा सर्व तिचा मतलब आहे. हें आपल्या कशावरून बरें लक्षांत येणार सरकार.

सौ०– (आश्चर्यकरून) कायग बाई तरी ह्या कल्पना! शिकली होती तरी कुठं ही बया! आमच्या मेली ध्यानीं मनीं सुद्धां ही गोष्ट यायची नाहीं; मग स्वप्नीं तर कोठून येणार. आणि बाई जी गोष्ट स्वप्नीं येणं कठीण ती माहीत तरी कोठून असणार! बरं मग याची तजवीज कशी?

सत्य०– तजवीज ह्मणून येवढीच कीं आपल्यास ती सरबत ह्मणून जें पाठवून देईल तें आपण कोणच्याही तरी युक्तीनें सांडून टाका. कारण न जाणो कदाचित् त्यांतच तिनें विष वगैरे घातलें तर पंचाईत; परंतु सायंकाळचे सुमारास झोंपेचें निमित्त करून गाढ झोंप लागल्या प्रमाणें स्वस्थ निजा. नंतर ते आपणास उचलून नेतील तेव्हां आपण स्वस्थ असल्याबद्दल यत्किंचितही त्यांचे मनांत शंका येऊं देऊं नका; मींही आपलीं शस्त्रें बरोबर घेऊन एक वायुवेगानें जाणारा घोडा तयार करविला आहे त्यावर आरूढ होऊन आपणा समागमेंच आहे. त्याप्रमाणेंच सर्व हकीकतीचें पत्र महाराजांस लिहून त्यांच्या हातीं पडेल अशी तजवीज मीं करतोंच. नंतर तेथें गेल्यावर आपलें रक्षण कसें होईल याबद्दल मुळींच काळजी करणें नको.

कारण एकदां शस्त्रें जवळ असल्यावर या फत्तेसिंगासारखे पंचवीस असामी जरी आले तथापि त्यांचा समाचार घेण्याजोगें सामर्थ्य आपल्या पायाच्या पुण्याईनें व प्रभुत्तेनें मला आहे. आतां यापासून आपला अत्यंत फायदा होणार आहे तो हा कीं अनायासानें त्या महामायेच्या पाशांतून सुटाल व आपली नीट व्यवस्था लावल्यावर मला पुण्यशील महाराजांची गांठ घेण्यास ठीक पडेल व त्यायोगें सर्व हेतू सफल होतील. कां बाईसाहेब, ही युक्ती आपल्यास बरी दिसते का?

सौं०—फारच योग्य युक्ति; ठीक आहे. मीं सर्व समजलें. आतां त्याप्रमाणें मी वेताबातानें सावध राहते. तुह्मी मात्र खास मजबरोबर असा ह्मणजे झालं नाहीं तर माझी ते दुष्ट काय हालअपेष्टा करतील हें बाई सांगवत नाहीं.

सत्य०—ताईसाहेब; हें काय भलतेंच. प्रथम माझा घोडा पुढें व आपण नंतर असें समजावें. असा विश्वासघातकी हा सत्यशील नव्हे बरें. जें काम एकवार हातीं घेतलें त्या प्रीत्यर्थ प्राणसुद्धां खर्चण्यास मागें पुढें पहाणार नाहीं ही गोष्ट परमेश्वर साक्ष सांगतों. बरें येऊं तर आतां मीं? मला मोठ्या युक्तीनें त्या दुष्टांपैकीं कोणाचे नजरेस न पडतां निघून गेलें पाहिजे.

**सौं०**— बरं 'सत्यशील, पण मी ह्मणते आपण येथून गेलों आणि मागं त्यांचं पत्र आलं तर त्याची काय वाट. तें जर कोणा दुष्टाच्या हातीं पडलं तर बाई केवढी पंचाईत !

**सत्य०**— ताईसाहेब, ती व्यवस्था मी आधींच करून ठेविली आहे. कारण ही बातमी कळल्यास तीन दिवस जाहले. त्यावेळसच मीं त्यांस तावडतोब पत्र लिहिलें आहे कीं इतःपर माझें पत्र पुन्हा येई पर्यंत आपण पत्र लिहूं नये. कारण मीं कांहीं दिवस गांवीं जाणार आहे. ही हकीकत मुळींच लिहिली नाहीं कारण त्यांचे जिवास विनाकारण अधिक दुःख मात्र होणार हेंच कनई. बरें सरकार येऊं तर. सर्व लक्षांत असूं द्या. येतो तर ( निघून जातो. )

**सौं०**— कोण आहेग ती दासी, सारजे, कुठं आहेतग माझ्या सख्या. जा त्यांना घेऊन ये. नको पण कशाला, आपणच बागेंत जावं ह्मणजे झालं. जा मेणा तयार करण्यास सांग.

**सा०**— जी सरकार ( निघून जाते ).

**सौं०**—(मनाशीं)काय बाई तरी हें धारीष्ट! असो, परमेश्वरा या सत्यशीलाच्या सर्व श्रमाचं सार्थक कर ह्मणजे त्यासही केलेल्या श्रमाचा शीण न होतां आनंद होईल. व आह्मीही होईल तितके त्याचे उपकार

फेडण्यांस मागेंपुढें पहाणार नाहीं. अबि आमची काळजी तुला. ( इतक्यांत सारजा येते. )

सा०— सरकार, मेणा तयार हाय चलावं.

सौ०— होका, चल बाई त्याही वाट पाहून पाहून कंटाळल्या असतील. त्यांना जाऊन पुष्कळच वेळ झाला चल तूंही मज बरोबर चल. ( दोघी निघून जातात ).

प्रवेश पहिला समाप्त

---

## प्रवेश दुसरा

( मदनिकाराणी व गिरजादासी प्रवेश करतात. )

म०— कायग दासी, परवाच तुला सांगितलं कीं त्या माळणीला सांगून सर्व महालभर लावतां येतील असे मोतीयाचे गजरे करून आणीत जा; आज कांग नाहीं तिनं आणलेन्. तूंच सांगायला विसरली असशील दुसरं काय. थांब आतां स्वारी आली ह्मणजे तुझी खोड मोडून टाकते. काय बाई तरी, मनुष्यानं एकदां सांगितल्यावर ध्यानांत राहूं नये ह्मणजे काय!

मा०— अं, बाईसाब मी काय केलं, मी तर तिला रोज सांगत्ये, पन तीच आनित न्हाइ. आतां जाऊनशेनि

पघते सरकार कां आनलं नाहींता ते. राग करूं नये सरकार.

प्र०— जा तर, लवकर येहो पण; नाहीं तर त्रावळ्यासारखी इकडे तिकडे बघत जाशील आणि परत येण्यास उशीर लावशील.

दा०— न्हाइकी सरकार, आल्येच पघा. (निघून जाते.)

प्र०— ( मनाशींच ) काय बरं करावं! बरं हे अमली सरवत कोणाच्या हातीं पाठवावं. कारण हें काम त्रावळ्या मनुष्याच्यानं होण्यासारखं नाहीं. हें काम बेमालुमपणानं कोणास काडी इतका सुद्धां संशय न येतां झालं पाहिजे. हो खरंच पण तसं कशाला. तिच्या सख्यांपैकींच कोणाला तरी बोलावून मोठ्या प्रेमानं हें तिच्या स्वाधीन करावं ह्मणजे झालं. पण काय मला वेड लागलं कां झालं तरी कसं, कारण ह्मणतातना चोराच्या हातीं गाठोडं तशांतलीच गत ही होणार. पण तिच्यावरच विश्वास कशाला ठेवावा. ती सरबत घेऊन गेली म्हणजे तिच्या मागोमाग सयाजीला पाठवावं ह्मणजे झालं मग ती कशी देत नाहीं तें पाहूं. मला युक्ति सुचली हें फार चांगलं झालं; नाहींतर मी भलतंच केलं असतं आणि पश्चातापांत पडले असते. असो, गिरजा आली ह्मणजे तिला बोलावूं पाठवून आणवावी ह्मणजे झालं. ईश्वरकृपेनं आतां हें काम एकदाचं निर्विघ्नपणें पार पडलं ह्मणजे मग कोणच्याही गोष्टींची

काळजीच राहिली नाहीं. (इतक्यांत गिरजा प्रवेश करते.)

गि०— बाईसाब, आज सांची ती घेऊन येते ह्मंगाली सरकार.

म०— होका. बरं त्याच पावलीं जाऊन सौंदर्यवल्लीच्या दोघी सख्या आहेत कीं नाहींत त्यांस मी उभ्या उभ्या बोलावलं आहे ह्मणून सांग; लवकर येहो, जा तर.

दा०— जी सरकार, आल्येच ह्मंगा. ( निघून जाते. )

म०— ( हातांत सरबताचा पेला घेऊन ) वा:! हें सरबत आज माझं काम करणार. हो खचितच आहे कारण तशाच मेहनतीनं हें तयार केलं आहे. मात्र हें सर्व तिच्या पोटांत गेलं पाहिजे. बरं पण ती आली ह्मणजे मानभावाच्या इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलून नंतर हा पेला मोठ्या प्रेमानं तिच्या स्वाधीन करावा ह्मणजे झालं. असो, हीच युक्ती उत्तम आहे. ( इतक्यांत अनुराधेस घेऊन गिरजा प्रवेश करते.)

गि०— सरकार, अनुराधा व रेवतीबाई आल्या हैता त्यांसनी आंत घेऊनशेनी येऊं कां?

म०— अग, हें काय विचारतेस त्यांना बाहेर कशाला उभ्या केल्यास? जा लवकर घेऊन ये काय बाई तरी अजागळ ही!

गि०— असं नव्ह बाईसाब, मी ह्मंगलं कीं कदाचित् आपल्या परमाणगी वांचून आंत घेऊनशेनी आल्ये आन् सरकारची इतराजी झाली मंग म्या गरीबानं

काय करावं हंगन इचारलं ( निघून जाते व दोघींस घेऊन पुन्हा प्रवेश करते. )

म०— कां, बाई अनुराधे सर्व खुशाल आहातना? आलिकडे दोन तीन दिवसांत इकडे कोणीच आलां नाहींत ह्मणून कमीजास्त हकीकत कांहीं आहे कीं काय हें विचारण्याकरतांच बोलावलंहो.

अ०— ( कपट जाणून ) आईसाहेब, हें काय विचारावें. आह्मांस कोणच्या गोष्टीची कमताई का आहे. त्यांतून आईसाहेबांच्या आश्रयाखालीं आहोंत; मग कमी काय आहे; सर्व खुशाल आहोंत आईसाहेब.

म०— अग तसं नव्हेग, ह्मणजे माझ्या ह्मणण्याचा अर्थ इतकाच होता कीं, मध्यें माझ्या सौंदर्यवल्लीची अवस्था त्या पुण्यशीलास घालवून दिल्यामुळं कशी झाली होती तें तूं पाहिल होतसना त्यावरून विचारलंहो. काय बाई त्याच तिला वेड तरी. मी ह्मणते त्यांत कांहीं तिनं वाईट केलं नाहीं; कारण कोणच्याही स्त्रिनं आपल्या मनाजोगा पुरुष पाहून त्यास वरावं खरं; पण वडील माणसांचं कांहीं ऐकलं पाहिजे; कारण हिचं वाईट व्हावं अशी का आमची इच्छा आहे आणि आह्मांला दोन वर्षं अधिक असतील तर आह्मांला कांहींच कां समजत नाहीं; पुढं मागं आह्मांसच लोक हंसणार आहेतना. तिला ह्मणतील पोर ह्मणून पण येवढ्या राजकुळांत उत्पन्न झालेली मुलगी आणि भिका-

त्याशीं तिचं लग्न लावलं ह्मणून नांवं कोणाला बरं ठेवतील? ह्मणून मेलं मन घेत नाहीं, दुसरं काय. बरं पण तिचा निश्चय आहे तोच आहे कां कांहीं फिरला आहे?

अ०– ( तिचं कपट जाणून ) आईसाहेब तिचा निश्चय ढळेल असं मला तर बाई दिसत नाहीं. मग दिवसगतीनं विस्मरण होऊन कांहीं बदल झाला तर कोण जाणं; पण मी ह्मणते एका अर्थी तिचं ह्मणणं यथायोग्य आहे. कारण आवड ही सर्वांस गोड असते. पण आपण तरी तिचं ह्मणणं मोडून व्यर्थ पापांत कशाला पडतां तिच्या मना प्रमाणंच कां होईना.

रे०– बरं आईसाहेब, मी ह्मणते तीनं पुण्यशील महाराजांस वरलं त्यांत वाईटका कांहीं झालं; त्यांत कोणचा गुण कमी आहे; विद्या नाहीं, कां सौंदर्य नाहीं, कां पराक्रम नाहीं; सर्व शहरभर त्यांची कीर्ति लोक गात असून ताईसाहेबांनीं निवड केली ती यथायोग्य केली अशी सर्वत्र त्यांची वाहवा होत आहे; असं असतां आपलं अनुमोदन त्यास नसावं हें थोडंसं मला बाई चमत्कारिकच दिसतं; आतां पुण्यशील महाराजांत कमीपणा ह्मणून काय तो त्यांचं जनन मात्र राज्यकुळांत नाहीं येवढंच कनइ; तरी पण सुद्धां त्यांचा जन्म कांहीं अगदीं हलक्या कुळांत नाहींहो; तेव्हां मी ह्मणते आपण

त्यांस हद्दपार केलं हें ऐकून ताईसाहेबांस कसं बरं चैन पडेल. त्यांतून आपल्यास तरी अशीं काय दहा पांच मुलं आहेत! काय त्या सर्व राज्यास वारस ताई साहेबच कनइ; तेव्हां आपणच महाराजांचं मन वळवून पुण्यशील महाराजांचा शोध करून त्यांस आणवावं व ताईसाहेबांची इच्छा पूर्ण करून त्यांस सुखांत घालावं हें मला बाई बरं दिसतं; त्यापासून उभयतांसही सौख्य आहे. मग याउपर आईसाहेबांची काय मर्जी असेल ती खरी.

म०— (कपटानें) तुह्मीं ह्मणतां तें कांहीं खोटं नव्हे. पण बाई त्या पुण्यशीलाबद्दल इकडचं मन इतकं विटलं आहे कीं, त्याचं नांव सुद्धां इकडे काढण्याची भीति वाटतेहो. त्यांतून माझ्या कडून होईल तेवढा प्रयत्न करून मीं पाहते. मग याउपर तिच्या नशिबीं असेल तसं होईल. मीं तरी बाई काय करूं. मला इकडे आड आन् तिकडे विहीर असं झालं आहे.

अ०— (कपट जाणून कुत्सितबुद्धीनें) आपण ह्मणतां याप्रमाणं जर खरोखर आईसाहेब आपली इच्छा असेल तर तसंच घडून येईल. सांगणं ह्मणून येवढंच कीं कांहीं तरी युक्तीनं ताईसाहेबांचे हेतु पूर्ण होतील असं करून त्यांस एकदाचं सुखांत घाला. त्यांच्याकारितां आमचा जीव तिळतिळ तुटतो ह्मणून बाई वारंवार आपली मनधरणी

करतों आहोंत. त्यांच्या सुखा व्यतिरिक्त आह्मांस प्रीय वस्तु या जगतांत दुसरी कोणचीच नाहीं. मग होईलना हें काम. आईसाहेब आह्मीं अज्ञान व अनाथ लेंकरें आहोंत कमीजास्त बोलल्याचा राग मात्र नसावाहो. आह्मीं काय ताटाखालचीं मांजरं. चुप ह्मंटलं कीं मुकाट्यानं बसणार.

म०— ( अनुराधा व रेवती यांचा बोलण्याचा भाव जाणून कपटानें ) मुलींनों, तुह्मी ह्मणतां तें सर्व माझ्या ध्यानांत आलं. बरं बाई खटपट करून पहाते. इकडचं मन कदाचित वळलं तर वळलं. बरं पण मुलींनों, हें पाहिलंत का सरबत ( सरबताचा पेला त्यांजपुढें करून ) हें अति उत्तम वनस्पतींचीं औषधें घालून आपल्या वैद्यबोवांनीं तयार करून सौंदर्यवल्लीला देण्याकरितां पाठवून दिलं आहे. तिची जेव्हां फारच वाईट अवस्था झालेली पाहिली तेव्हां कनइ मीं वैद्यबोवांजवळ गोष्ट काढिलीहो. त्यांनीं आपले सर्व ग्रंथ उलथे पालथे करून हें औषध फारच चातुर्यानं व मेहनतीनं तयार करून पाठविलं आहे. तरी हें तिला द्या ह्मणजे त्यापासून चांगला आराम पडेल व तिला समाधानही वाटेल समजलंना. हें इकडे तिकडे मात्र सांडूं लवंडूं नका. घ्या हें, नीट संभाळून द्याहो. ( पेला त्यांचे हातीं देते.)

अ०— (कपट जाणून) आईसाहेब, आपली प्रीति आमच्या सखीवर अतिशय आहे हें पाहून खचित आह्मांस फार आनंद होतो. हें आह्मीं सर्व तिला देऊं व आराम पडला ह्मणजे तुह्मांस येऊन कळवूं. पण आईसाहेब मीं आपणास सांगितलेलं सर्व ध्यानांत आहेना. आमच्या सखीकरितां आमचा जीव हळहळतो ह्मणून वरचेवर सांगायचं हो. तर आमच्या अधिक बोलण्याचा राग मात्र आणूं नये.

रे०— तसंच आईसाहेब, सौंदर्यवल्लीचे मनोरथ पूर्ण झाले ह्मणजे सर्वांस आनंद होईल. व आपण त्यांच्या मातोश्री या नात्यानं आपल्यासही तें भूषणार्ह होईल. तेव्हां सर्वांचे मनोरथ पूर्ण करून जिकडे तिकडे आनंदीआनंद करून सोडा व यशाची जोड जोडा. ह्मणजे आपली कीर्ति सर्वत्र होऊन आपल्यास सर्व आबाल वृद्ध दुवा देतील. तेव्हां खचित करणारचना हें काम?

म०— बरं मुलींनों, तुह्मीं आतां जा, व सांगितल्या प्रमाणं नीट व्यवस्थेनं हें औषध तिला द्या, ह्मणजे तिला आराम पडेल. इतक्यांत मींही इकडचं मन वळवून सर्व गोष्टी तुमचे मनाप्रमाणं घडवून आणण्याची होईल तितकी खटपट करून तुमचे मनोरथ पूर्ण करते. त्याची तुह्मीं अगदीं काळजी करावयास नको. बरं या तर. मीं सांगितल्याप्रमाणं मात्र सर्व औषध तिच्या पोटांत जाऊं द्याहो.

नाहीं तर हयगय कराल, आणि इतक्या परिश्रमानं केलेलं व मौल्यवान औषध फुकट घालवाल, समजलातना.

अ०— बरं आईसाहेब, आह्मीं येतों तर. हें औषध आह्मीं सर्व तीस देतों; आह्मीं सांगितलेलं मात्र काम आपण केलं पाहिजे येवढी भिक्षा आह्मीं मागतों.

रे०— व तीं आपण द्यालच अशी आमची पूर्ण खातरी आहे. येऊं तर आह्मीं? (दोघीही निघून जातात.)

म०— कायग दासी, बरीच संध्याकाळ होत आली नव्हेका, आतां थोडी विश्रांती घेण्याकरितां त्या लालबागेंत जाऊं चल. जा मेणा तयार करवून आणण्यास सांग. लवकर येहो; मीं अगदीं खोळंबले आहे. जा तर.

दा०— जी बाईसाब. बरं सरकार त्या रेवतीबाई आन अनुराधाबाई लई वाढोळच्या बोलत व्हत्या त्या ताईसाबाबद्दल नव्हका. मग आपून त्यांचं लगीन पून्यशील महाराजांसंगं करून देनार व्हई. तसं झालं कनइ बाईसाब तर अक्शि लइ बेस व्हईल पघा.

म०—ए रांडे, तुलाग कशाला त्या गोष्टीची चवकशी. मेली वटीक तूं, जा निघ. लवकर मेणा घेऊन ये. चावटपणा करूं नको. जीभ कापून टाकीनहो.

दा०— अं बाईसाब, राग करूं नये. मीं आपलं सहज बोलल्ये त्याचा इकता राग कशासनी. ही मेणा

घेऊनशेनी आल्येच पघा. (निघून जाते व मेणा घे-
ऊन येते.) चलावं सरकार मेणा तयार हाय.

म०– होका बरं चल. तूं ही मजबरोबर चल. ह्मणजे दोघी जाऊं व स्वारी येण्याच्या आधीं येऊं. चल तर. (दोघीही निघून जातात.)

(प्रवेश दुसरा समाप्त.)

---

## प्रवेश तिसरा.

(दंडकारण्य.)

(फत्तेसिंग व दुसरे तिघे शिपाई सौंदर्यवल्लीस घेऊन अरण्याजवळ येतात.)

फ०– (दुसऱ्या शिपायांस) क्यौंबे जंगली, कायकु धूम मचाते है. चीपी बैठो. अबी इदरसे जंगल कितना लंबा होगा? मैतो बोहोत थक गया.

प० शि०– सरकार, आपन तो बोहोत नजदीक आं पोहोचा. अब्बी आपने कामके वास्ते अच्छि जगा देखके आपना काम कर लेना इतनाही अरज है.

दु० शि०– सरकार, आपना काम आपन उठाया पिछे आपनेकु बोहोत इनाम मिलेगा और आपना नामबी बडा होवेगा नहीं सरकार.

ति० शि०– क्या तुम बेवकूब है. लुगाईके आंगपर समशेर चलानेसे क्या बडा नाम मिलेगा. औरत

और गौकी जात एकही रहती है. तो मेरी खुसी यही है की ताईसाहेबंकु जानसे कब्बी नही मारना.

फ०—देखो जवान, तुम कहता है ये बात सच है; लेकिन आपन ये काम नही उठाया तो इनाम मिलनेकी कुच आशा नहीं. फेर ओबी जायगा और ओबी जायगा और जान जानेका वखत आवेगा तो फेर कैसा.

प० शि०—वास्ते मै कहताहूं के ये काम जरूर करना चाहिये. पन सबूर करो. ताईसाहेब तो हात पाव हलानेकु लगा है. जरा चूप ठेरो.

दु० शि०—अरे चुप चूप. गडबड मत करो. ये तो औरतकी जात है आपने सब लोककु देखकर वखतपर घबर जायगी. आबी थोडा वखत सब लोक एक बाजू खडे रेहना ये अच्छा बात.

ति० शि०—देखो, ये हात उठाया. और अब्बी उटनेके वास्ते इलाज करते है. मै समजता हैं के सरबतका अंमल अब्बी कमती हुवा करके ये हुश्शार होता है तो जरा चूप बैठके देखना ये बात अच्छा.

फ०—बराबर, सब लोक बाजू चले जाव और गडबड मत करो. ( सर्वजण एकाबाजूस उभे राहतात. )

सौ०—( अंमळ सावध होऊन इकडे तिकडे पाहूं लागते व भयाभीत होऊन मनाशींच ) काय मी आहे कुठं, स्वप्नांत तर नाहींना मीं ! हा काय बाई

चमत्कार! मीं रात्रीं सरबत पिऊन महालांत निजले होते ती येथें कशी आले. (चांगली सावध होऊन) हं समजलें; सत्यशीलानं सांगितलेली गोष्ट प्रत्ययास आली. असो. आतां धीर सोडून उपयोग नाहीं. सत्यशीलानं मजबरोबर येणार ह्मणून वचन दिलेलंच आहे तेव्हां ते कुठं तरी आसपास खचित असतीलच. हें तरी एकपरी बरंच झालं; कारण अनायासानं मीं त्या महामायेच्या हातांतून सुटले. आतां प्राणनाथांचा शोध करण्यास चांगलीच सवड झाली. (इकडे तिकडे पाहून घाबरल्यासारखी होते व मारेकऱ्यांस) बाबांनों. हं आतां विलंब कां लावतां? ज्या कामाकरतां मला येथं आणलंत तें एकवार आटपून घ्या व आपलं बक्षिस मिळवा कसे. बायकावर शस्त्र धरणारे तुह्मी रजपूत अशी तुमची मोठी कीर्ति तरी होईल बाबांनों.

फ०– (मनांत लज्जित होऊन) ताईसाहेब, ये बंदा चरनपर सीस धरताहूं. सरकार, मैं तो खूप जानता हूं के आपकू इदर लानेका क्या मतलब है सो तुम जानते हो; फेर आपकी क्या इच्छा है सो एक दफे कह देव. क्योंके मै ये रस्तेसे चलनेकु सकेगा. राणीसाहेब तो आपकी मा नहीं; मैं समजताहूं ये तो जरीमरी तुमारी जान लेनेके वास्ते पैदा हुवी है, और गफलत करके मेरे हातसे इने ये काम उठानेके वास्ते बेलभंडार उठाके लिया. अच्छा कुच परवा

नही. ये तो बडा अन्याय होता है इसवास्ते मेरा बेलभंडार झूट हुवा तो कुच फिकिर नही. मै अब्बी आपका ताबेदार है जैसा आप हुकूम फर्मावेगा वैसा मै चलेगा, तो आपका हुकूम क्या है सो एकदफे फर्मा देना सरकार.

सौ०– फत्तेसिंग, या तुमच्या बोलण्याचं मला मोठं नवल वाटतं; कारण काय ह्मणाल तर हा अन्याय आहे असं जर तह्मांस वाटत होतं तर मग त्या वेळेसच का नाकबूल गेला नाहींत. ह्मणजे येवढा द्राविडी प्राणायाम करण्यास नको होता. आतां ज्या अर्थी तुह्मीं मला इतकं लांब आणलंत त्या अर्थी आपलं काम करून घ्या व मोठं नांव व बक्षिस मिळवा ह्मणजे झालं! दुसरा हुकूम कांहीं नाहीं.

फ०– सरकार, तोबा तोबा, ऐसी बात मत करो. मैतो आपका निमक खाया है लेकिन ऐसी हरामखोरी मेरेसे नही होवेगा. सरकार इतना तसदी लेनेमे मेरा दो मतलब था. एक मै जो ये काम उठानेकु, बेलभंडार किया पिछे, नाकबूल जाताथा तो ये महामाया मेरेपर कुचतोबी बलामत लानेकु न डरती, और दुसरा तो यह होता कीं आपकी छुटका होनेकु बोहोत पंचाईत व्होती वास्ते मै आपकु इदर लाया. अब्बी मेरे दोनो मतलबसिद्धि हुवि. अब्बी मै आपकु बोहोत अच्छी जगा धुंडके उदर पोहोचवा देताहूं, और आपकी

वस्त्रकी निशानी किसिके लोहमे डुबाके लेजाके ये हरामखोरके पाससे आपना इनाम लेताहूं. मगर बंदेका एक अरज है की आपकी इच्छा भगवान पूरी करके फेर आप लोटके आपने शहरमे जरूर आवेगा जब मेरेपर थोडी मेहेरनजर रखके मेरा जी बचाना और मेरे हातसे सरकारकी कुचतोबी नौकरी होवेगा ऐसा करना. मै दुसरा कुच नही मंगते हो खाविंद.

सौं०— फत्तेसिंग, माझ्याबद्दल तुह्मांस काळजी करण्याचं मुळींच प्रयोजन नाहीं; कारण जशी मजविषयीं तुह्मांस दया आली तशीच आमची काळजी घेणारा एक विश्वासू हितकर्त्ता परमेश्वरानं आह्मांस दिला आहे व तो येथें जवळपासच असेल तो आतां येईल. आतां तुमच्याविषयीं तुह्मीं जें सांगितलं तें मात्र मीं करण्यास चुकणार नाहीं. तुमच्या आशिर्वाद व इच्छेनुरूप माझे सर्व हेतू सिद्धीस गेल्यास तुमचं मीं खचित रक्षण करीन व तुमची इच्छा सफल होईल (इतक्यांत सत्यशील झाडाच्या आड उभा असलेला पुढें येतो व सौंदर्यवल्लीस नमस्कार करून व फत्तेसिंग वगैरेस मुजरे करून.)

सत्य०— कां बाईसाहेब, मी सांगितलेली गोष्ट इत्थंभूत घडून आली कीं नाहीं. आतां अनायासें आपला कार्यभाग शेवटास गेला. ( फत्तेसिंगास ) काय जमादार मोठमोठ्या लढाया मारून पराक्रम केले

ह्मणून गप्पा मारतां त्या असल्याच ल्ढाय ।अस तील. काय मिशाला पीळ भरले आहेत व दाढ्या काय फिरविल्या आहेत. धन्य असोरे ब्रात्रांनों तुमच्या पराक्रमाची. अरे असलें कृत्य करण्यापेक्षां ओंजळींत पाणी घेऊन जीव का नाहीं दिलेत. वाहवारे शेंदाड शिपाई! धिःकार असो तुमच्या रजपूत जन्माला! त्या जातीस मात्र काळोखी आणलीत!

फ०—( खालीं मान घालून ) सत्यशील महाराज, आप बात करतेहो ये सब सच है और ये काम उठानेमे मेरा क्या मतलब होता येबी सब मै ताईसाहेबकु कह दिया है. अब्बी आद्मीके जखमपर दुसरा वार करना इसमे क्या हांसील है. अब्बी महाराज मेरा इतनाही अरज है के ताईसाहेबका बराबर संभाल करके उस्का सब इच्छा सफल होवे ऐसा करो. मै ताईसाहेबका कपडा लोहमे डुबाके ले जाके आपना इनाम लेताहूं. मै अब्बी चले जाता महाराज.

सत्य०—फत्तेसिंग, ताईसाहेबांची काळजी करण्याचें तुला मुळींच प्रयोजन नाहीं, कारण ईशकृपेनें त्यांचें आजपर्यंत मीं यथाशक्ति सांगोपन केलें आहे व या पुढें त्यांचे मनोरथ पूर्ण करून आपल्या सर्वांचे हेतू सिद्धीस नेणेंही परमेश्वराधीन आहे. प्रयत्न करणार आपण, यश देणार प्रभू समर्थ आहे. बरं

हें घे वस्त्र व तुला हवीती तजवीज तूं करून आपलें इनाम मिळीव व सुखी हो, ये आतां.

फ०— ( वस्त्र घेऊन ) अच्छा महाराज, मै अब्बी चले जाता हूं. ताईसाहेब मै आपकु अरज किया है सो बराबर ध्यानमे रखना और बंदेपर मेहेरबानी रखना, सरकार ये बंदा चरनपर सीस धरताहूं. सत्यशील आपकीबी मै रजा लेताहूं. ( सौंदर्यवल्ली व सत्यशील यांस मुजरे करून फत्तेसिंग व दुसरे तिघे शिपाई निघून जातात. )

सौं०— बरं सत्यशीला, येथपर्यंत तर सर्व ठीक झालं; आतां पुढं व्यवस्था कशी काय करणार. आतां या ठिकाणीं आपल्यास आश्रय करण्यासारखी जागा मिळणार कशी. हें तर घोर अरण्य आहे तेव्हां मला बाई मोठी पंचाईत वाटते. मग तुमची कल्पना काय चालेल ती खरी.

सत्य०— ताईसाहेब, आपणास त्या संबंधानें इतकी भीति वाळगण्याचें कारण नाहीं; कारण मला ऐकून असें पक्कें माहीत आहे कीं या अरण्यांत एक महान् तापसी वास्तव्य करीत असतात. ते आपल्या तपोबलेंकरून इतके सामर्थ्यवान आहेत कीं आज त्यांचे मनांत प्रती[illegible]ृष्टी निर्माण करण्याचें जरी आलें तरी देखील ते करतील तर असे जे परमेश्वरसमान दीनाचे दयाळ कृपासिंधु त्यांजकडे जाऊन--आपली सर्व खरी हकीकत त्यांस निवेदन करावी व आश्रय

मागून त्यांजपाशीं रहावें ह्मणजे आपली तेथें यथायोग्य व्यवस्था लागून पुण्यशील महाराजांचा शोध करण्याकरितां मला जाण्यास ठीक पडेल. काय ताईसाहेब, आपल्यास ही युक्ति बरी दिसते काय?

सौ०— पण सत्यशील, मीं ह्मणते मला तुह्मीं येथें ठेवून जाणार ह्मणतां त्यांत अर्थ काय; कारण प्राणनाथांचा शोध लागल्याखेरीज मला तरी बाई येथें राहून चैन कसं पडणार; तेव्हां मीं ह्मणते आपण उभयताही त्यांचे शोधार्थ जाऊं ह्मणजे मजविषयीं तरी तुह्मांस आणखी मागें काळजी करणें नको. मग याउपर जशी तुमची मर्जी असेल तशी; कारण मीं काय अज्ञान व अबला तेव्हां मजपेक्षां आपली कल्पना अधिक यांत संशय नाहीं. मला वाटलं तें बाई मीं सुचविलं. माझा कांहीं आग्रहच नाहींहो. एकदां माझे हेतू सिद्धीस गेले व तुह्मांस यश मिळालं ह्मणजे इतके परिश्रम केल्याचं सार्थक झालं कां खरं कीं खोटं सत्यशील?

सत्य०— ताईसाहेब, तुह्मांस बरोबर नेण्यास अडचणी फार आहेत; कशा ह्मणाल तर, एक तर आपण राजकुलांत उत्पन्न होऊन अत्यंत स्वरूपवान व नाजुक; आपल्यास प्रवासांतील श्रम मुळींच सहन होणार नाहींत. शिवाय आपण उपवर झालां असून मजसमवेत आल्यास जनापवादास कारण; तेंही असो; परंतु प्रसंगविशेषीं आपण मजबरोबर असल्यामुळें

त्या भानगडींत पडूं नको. ( त्यास तेथून नेण्याचा प्रयत्न करतो. )

दु० शि–० छेः रे, अशी गोष्ट कधीं होणार नाहीं. आपल्यास गुरुआज्ञा काय आहे कीं प्रसंगविशेषीं कोणीं पांथस्थ वाट वगैरे चुकला असलेला दृष्टीस पडला असतां त्यास त्याचा मार्ग दाखविल्यावाचून आपण कधीं जाऊं नये; तेव्हां या कामीं मीं तुझें ऐकलें तर गुरुआज्ञा भंग केल्याचा मला दोष लागेल; तेव्हां मीं तर बाबा चवकशी केल्यावाचून कधींही राहणार नाहीं. तूं येणार तर ये नाहीं तर हा मीं त्यांजकडे चाललों बघ. [ सत्यशील व सौंदर्यवल्ली यां-जपाशीं जाऊन त्यांस ] अहो, आपण उभयतां कोण, आपला एकमेकांचा संबंध काय, येथें कसें व कां आलां, आपण राहणार कोठले, वगैरे सर्व हकीकत मेहेरबानीनें सांगाल तर आपल्यास माझे हातून कांहीं मदत होण्यासारखी असल्यास ती करण्यास ठीक पडेल.

सत्य०– महाराज, आह्मीं आपल्यास साष्टांग प्रणिपात करतों. आतां आपण आमची हकीकत विचारतां त्याअर्थीं आह्मीं आपल्यास फार आनंदानें सांगूं. पण राग न येईल तर एक विचारणें आहे. तें कोणतें ह्मणाल तर आपणांस आह्मांविषयीं दया येऊन अति उत्सुकतेनें आमची हकीकत विचारतां तर आपण आपलें वृत्त आह्मांस प्रथम कळविल्यास

आमचें सांगण्यास आह्मांस तिळमात्र संकोच वाटणार नाहीं; तर मेहेरबानी होईलका महाराज ?

दु० शि०— हों, मजकडून मुळींच हरकत नाहीं; ऐका तर. या तपोवनांत एक महान् तापसी दुर्वासमुनी या नामें करून वास्तव्य करीत असतात; त्यांच्या सेवेंत आह्मीं निरंतर असतों व आह्मीं त्यांचे शिष्य आहोंत. आह्मीं नेहमीं समिधा, दर्भ वगैरे पुजेचें साहित्य नेण्यास येथें येत असतों; परंतु आजपर्यंत आमच्या पाहण्यांत एकही मानवीप्राणी आला नाहीं; कारण हें तपोवन इतकें भयंकर आहे कीं, यांत सर्व महान् महान् हिंसकपशू, पिशाच्च व राक्षस वगैरे अतीक्रूर प्राणी वास करतात; परंतु आमच्या गुरुजींच्या तपोबलेंकरून त्यांपासून आह्मांस मात्र मुळींच पीडा होत नाहीं. तेव्हां अशा या घोर तपोवनांत तुह्मीं कसे आलां याचें मला फार आश्चर्य वाटतें; परंतु सुदैवानें माझी गांठ पडली यामुळें आतां तुह्मांस यत्किंचित्‌ही भीति बाळगण्याचें कारण नाहीं; परंतु आतां दिवस फार वर आल्यामुळें येथें न राहतां आपली हकीकत कथन करून गुरुदर्शनास चलावें अशी माझी इच्छा आहे. आतां हें जरी घोर अरण्य आहे तथापि तुमचें आदरातिथ्य करण्यास येथें कोणच्याच गोष्टीची उणीव नाहीं. तेव्हां माझी विनंती आपण मान्य करणारका ?

सत्य०— महाराज, आपण देवादिकांसुद्धां सर्व प्राणी-
मात्रांस पूज्य असें असून आपण या दीनांवर अ-
नुग्रह करण्याचें मनांत आणलें ही आज आह्मांवर
परमेश्वरी कृपाच झाली असें समजलें पाहिजे.
महाराज, आतां आमची हकीकत इत्थंभूत निवेदन
करावयाची ती फार लांब असल्यामुळें आपल्यास
फार उशीर होईल यास्तव आश्रमीं गेल्यावर आ-
पल्या गुरुजींच्या समक्ष आह्मीं आपली सर्व हकी-
कत आपल्यास निवेदन करूं. तेव्हां तिकडे च-
लण्याची सत्वर मेहेरबानी करावी.

दु० व प० शि०— फार उत्तम आहे, चलावें तर, ये-
थून आश्रम फार लांब नाहीं. तेथेंही या बाईंच्या
सहवासायोग्य दोन ऋषिकन्या आहेत, त्यामुळें
सर्वच नीट जमेल. चलावें तर मग उगीच उ-
शीर कां ?

सत्य०—फार उत्तम आहे, चला महाराज. आपण पुढें व्हावें
ह्मणजे आपल्या मागोमाग आह्मीं येतों.

प० शि०— हा निघालों पहा, चला या माझे मागो-
माग. ( सर्व निघून जातात ).

प्रवेश तिसरा समाप्त.

---

## प्रवेश चवथा.

( ऋषिआश्रम, सत्यशील, सौंदर्यवल्ली व दोघे ऋषिशिष्य प्रवेश करतात, व समाधिस्त बसलेले दुर्वासऋषींस अवलोकन करून.)

सत्य०— अहाहा! महाराज काय हें तेज व ऐश्वर्य! धन्य असो यांचे भाग्याची, कारण ह्मटलेंच आहे:—

### पद.

**भस्म चर्चुनी जटा मस्तकीं व्याघ्रांवर आसना घेती ॥ गळा शोभती रुंडमाळा ऐश्वर्य ऐसें वर्णू किती ॥ धृ ॥ कामक्रोधादि षड्रिपु जिंकुनी दया क्षमा शांती धरिती ॥ परोपकारा देह वेंचुनी निशिदिनीं परात्परा ध्याती ॥ भ० ॥**

त्याचप्रमाणें ज्या गृहांत ते वास्तव्य करतात, त्याची तरी शोभा किती ह्मणून वर्णावी; कारण त्या आश्रमा संबंधानें मला तर असें वाटतें:—

### पद.

**ऋषिआश्रम किती सुंदर आहे ॥ मंद शीतल बहु वायु वाहे ॥ धृ ॥ कल्पतरूंसम वृक्ष भासती ॥ कोकिलशब्दें पक्षी गर्जती ॥ व्याघ्र धेनू हीं सुखें विचरती । धन्य प्राणी जो या स्थळीं राहे ॥ऋ० ॥**

असा या आश्रमाचा व तापस्यांचा महिमा असतांना येथें आल्यावर कोणास संतोष होणार नाहीं. अ-

हाहा ! धन्य भाग्य आमचें ह्मणून आह्मांस हें दर्शन आज घडलें. बरें महाराज यांची समाधी विसर्जन होऊन आह्मांवर यांचा अनुग्रह केव्हां होईल ?

प० शि०— तुमची सत्पुरुषांच्या दर्शनाबद्दल उत्कंठा पाहून मनास फार समाधान होतें, गुरुजींची समाधी विसर्जनाची वेळ अगदीं जवळ आली असून तुमचे मनोरथ लवकरच सिद्धीस जातील समजलांत. अंमळ एकीकडे उभे रहा.

सय०— बरें आहे महाराज, आमची दुसरी इच्छा कांहींच नाहीं. एकवार प्रभुदर्शन होऊन मनांतील हेतू सिद्धीस गेले ह्मणजे कोणत्याच गोष्टीची चिंता राहिली नाहीं. (इतक्यांत दुर्वासऋषि समाधी विसर्जन करून.)

दु० ऋ०— कां शिष्य, आज विशेष गडबडशी दिसते काय प्रकरण आहे, एकवार कळूं तर द्या.

प० शि०— गुरुजी, थोडी गडबड तर खरीच. आज कांहीं नवीन माणसें आपल्या आश्रमीं पाहुणीं आलीं आहेत. गुरुजी आपली आज्ञा होईल तर भेटीस घेऊन येतों.

दु०ऋ०— ह्मणजे भेटीस आणण्यास आज्ञा ती कशाला पाहिजे. बरें पाहुण्यांचें आदरातिथ्य तरी नीट केलेंतका. हो नाहीं तर तुह्मीं आपल्याच गडबडींत असणार. कोण कसा येतो कोण कसा येतो तेव्हां सर्वांचा नीट परामर्ष घेणें तुह्मांकडे आहे. कारण

आमचा सर्वकाळ परमेश्वर सेवेंत जाणार तेंव्हां अशा गोष्टींकडे लक्ष पुरविण्यास आह्मांस फुरसत नाहीं हें तुह्मींही जाणतां आहां पण विचारपूस करणें हा आमचा धर्म होय ह्मणून विचारलें.

दु० शि०—गुरुजी आपली आह्मांस काय आज्ञा आहे कीं आपल्या येथें कोणीही आलें असतां प्रथम त्यांचे आदरातिथ्य करावें व नंतर दुसरें काम करावें. त्या आज्ञेस अनुसरून प्रथम यांचें संगोपन केलें व दुसऱ्या कामास लागलों. मग त्यांस दर्शनाकरितां घेऊन येतों तर (असें ह्मणून बाहेरच्या बाजूस येऊन सत्यशील व सौंदर्यवल्ली यांस घेऊन प्रवेश करतो.) गुरुजी हे आले एकवार यांजकडे कृपावलोकन करावें (दोघे पुढें होऊन साष्टांगनमस्कार करून हात जोडून पुढें उभे राहतात.)

दु० ऋ०—मुली, अष्टपुत्रा अखंड सौभाग्यवती भव. बाबा तूंही चिरायू हो. मुलांनों तुह्मीं कोण, तुमचे नामाभिदान काय, तुह्मीं येथें कां व कसे आलांत वगैरे हकीकत इत्थंभूत कथन करा पाहूं!

सत्य०—महाराज, आपलें अश्वासन असल्यास सर्व खरी हकीकत आपणापुढें सादर करतो. आतां मीं सांगेन ही खरी किंवा खोटी हकीकत आहे हें आपणांस सहज समजेल; कारण आपण त्रिकाळज्ञानी ह्मणजे भूत, भविष्य व वर्तमान जाणणारे आहांत तेंव्हां मीं बोलतों इकडे सत्पुरुषांनीं थोडें लक्ष

द्यावें. [ सौंदर्यवल्लीकडे बोट दाखवून ] ह्या आम-च्या कनकनगरीच्या शौर्यसागर महाराजांच्या एकुल-त्या एक कन्या. ह्या अत्यंत सद्गुणी सदाचारसंपन्न महासाध्वी आहेत; ह्यांची मातोश्री बाल्यावस्थेंत निव-र्तली. नंतर आमच्या महाराजांनीं द्वितीय संबंध केला. त्या आमच्या ताईसाहेबांच्या अत्यंत द्वेषी आहेत. त्यांनीं कायावाचामनेंकरून आपल्या म-नायोग्य पती पाहून त्याच्याशीं गांधर्वविवाह केला. या सत्पुरुषाचें नांव पुण्यशील महाराज! किती गोड तरी हें नांव आणि तें त्यांस फारच शोभतें. का-रण ते तसेच परोपकारी व धार्मिक, महान्पराक्रमी सद्गुणयुक्त आहेत. हा विवाह सांप्रतच्या राणीसा-हेबांस रुचला नाहीं. हो उघडच आहे, कोठून रुचणार; कारण त्यांच्या मनांत यांचा विवाह आप-ल्या भाच्याबरोबर करण्याचें होतें. तो आमच्या पुण्यशील महाराजांच्या अगदीं उलट स्वभावाचा आहे. ह्मणजे दुर्गुणी, मूर्ख, अक्कलशून्य असा आहे. हा आपला हेतू सिद्धीस जाणें कठीण असें ज्येव्हां त्या महामायेस पुरतेपणीं समजलें तेव्हां तिनें त्या निरपराधी पुण्यशीलावर कांहीं कुभांड रचून त्यांस हद्दपार केलें. असें झालें तरीही जेव्हां आमच्या ह्या ताईसाहेब आपला हेका सोडीत नाहींत अशी तिची खातरी झाली तेव्हां ह्यांसच या जगांतून ना-हींसें करून टाकलें ह्मणजे, सर्व राज्य आपल्या

घरांत यावें हा जो आपला हेतू तो सिद्धीस जाण्यास मुळींच अडचण राहिली नाहीं असा विचार करून चौघे मारेकऱ्यांकरवीं, त्यांस मोठें इनाम देण्याची आशा दाखवून, ह्यांस मारण्याचा निश्चय करून, ह्यांस भूल पडण्याचें औषध देऊन बेशुद्ध केलें व मारेकऱ्यांच्या स्वाधीन केलें. त्यांनीं आपला कार्यभाग साधण्याकरितां ह्यांस येथें आणलें. ही हकीकत मला पूर्वी कळल्यामुळें मलाही यांचेबरोबर येण्यास सांपडलें. मीं कोण व यांचें हित कां चिंतितों हा सहज प्रश्न येतो तर मींही त्या दुर्गुणी भाच्यापाशींच होतों; परंतु त्यांचे ते दुष्ट विचार व दुराचरण हीं पाहून त्यांचा सहवास मला विषवत् वाटूं लागला व त्यांचे सहवासांत राहून नरकाची जोड करून घेणें त्यापेक्षां सत्पुरुषांचा समागम करून आपलें कल्याण करून घेणें बरें असा मनास पश्चाताप होऊन पुण्यशील महाराजांपाशीं येऊन राहिलों व तेव्हांपासून यथाशक्ति यांस सहाय करून यांचें अभिष्ट चिंतीत आहे. असो. या मारेकऱ्यांनीं आमच्या या ताईसाहेबांस येथें आणल्यावर परमेश्वरी संकेत ह्मणा अगर आमचें सुदैव ह्मणा, या मारेकऱ्यांसही मोठा पश्चाताप होऊन व दया येऊन त्यांनीं ह्यांस जिवदान दिलें व ते परत स्वनगरीं निघून गेले. आतां येवढें कृत्य घडून येण्यास कारण आमच्या महाराजांवर त्या महामायेचा पगडा

व त्यामुळें त्यांचें आपल्या कन्येकडे दुर्लक्ष हें होय. असो. याप्रमाणें आमची सुटका झाल्यावर आतां पुढें काय करावें या विचारांत होतों इतक्यांत हे आपले दोघे शिष्य आह्मांस भेटले व त्यांनींच ह्या चरणापाशीं आणलें. आतां आपण दीनदयाळ करुणानिधी आहांत तेव्हां या अनाथांचें रक्षण करून या संकटांतून आह्मीं पार कसे पडूं व आमचे हेतू सफल होणार किंवा कसें हें एकवार सांगावें. आपण आज प्रत्यक्ष भगवान आहांत जी गोष्ट मनांत आणाल ती सिद्धीस न्याल तेव्हां या दीन अनाथांचा अव्हेर न करतां आमचे हेतू पूर्ण करण्याचें अभय द्याल येवढीच विनंती आहे. (असें ह्मणून दोघेही साष्टांग नमस्कार करतात.)

दु०-ऋ०- मुलांनों, तुमची हकीकत श्रवण करून मनास फार सखेदाश्चर्य झालें. असो मुली, आतां तूं घडलेल्या गोष्टीबद्दल खेद मानूं नको, कारण तुझे प्रतिकुळ दिवस नष्ट होण्याची वेळ जवळच आली आहे असें समज. मीं आतां तुला आशिर्वाद देतों हा ग्रहण कर. (दोन्ही हात आशिर्वादयुक्त वर करून)

## साकी.

**ईश दयेनें तव प्रिय पती हा राज्यपदीं बसलाहे ॥**
**तीन मासीं तुज भेटेल येउनी स्वस्थचि या स्थळीं राहे॥**
**शंका नको आणूं ॥ मम वच व्यर्थ नको मानूं ॥**

पुण्यशील हा हल्लीं एका मोठ्या राज्यावर आरूढ झाला असून आजपासून तीन मासांचें आंत या आश्रमीं सुखरूप येईल व तुमचे सर्व मनोरथ पूर्ण होऊन तुह्मीं परत स्वनगरीं जाऊन तेथें सुखानुभव घ्याल. ज्या दुष्टांनीं तुह्मांस आजपर्यंत गांजलें त्या सर्वांस यथान्याय शासन होईल. मुली तूं बिलकुल दुःखी होऊं नको. मीं तुला आपली धर्मकन्या असें समजून तुझा पती येईतोंपर्यंत तुझें नीट संगोपन करीन. त्याचप्रमाणें माझ्या दुसऱ्याही येथें दोन कन्या आहेत त्याही तुज समवेत असल्यामुळें तुला कोणचीच अडचण पडणार नाहीं. सत्यशीला तुह्मांसही माझें असें सांगणें आहे कीं तुह्मींही ह्याच ठिकाणीं तो येईपर्यंत वास्तव्य करा. ह्मणजे येथेंच सर्वांच्या गाठी पडून मीं एक आशिर्वादपत्र तुमच्या शौर्यसागर महाराजांस देऊन तुह्मांस रवाना करीन. ह्मणजे तुमच्या मनाप्रमाणें तेथें सर्व गोष्टी घडून येतील. कां तुह्मांस ही व्यवस्था पसंत पडते काय ?

सत्य०— महाराज, आपल्या उपदेशाविरूद्ध वर्तन करण्यास कोण समर्थ आहे; परंतु महाराज एक विनंती आहे कोप न होईल तर सांगतों. महाराज ताईसाहेबांस येथें राहण्याविषयीं आज्ञा होत आहे तें ठीकच आहे; परंतु मीं या ठिकाणीं राहून व्यर्थ वेळ घालविणें मला योग्य दिसत नाहीं; कारण पुरुषानें निरूद्योगी रहाणें नीट नव्हे. तेव्हां मीं पुण्यशील

महाराजांचे शोधास जातों. ते कोणच्या देशांत असतील तेवढें मात्र मला कथन करावें ह्मणजे मला तिकडे जाण्यास नीट पडेल तेव्हां आपलें या गोष्टीस अनुमोदन आहे काय महाराज ?

दु० ऋ०—सत्यशीला, तुझ्या इच्छेप्रमाणेंच कां होईना. पुण्यशील येथून पूर्व दिशेस एक मोठें राज्य आहे त्या ठिकाणीं राज्य करीत आहे; तेथें जाऊन त्याची भेट घेऊन तूं परत येईतोंपर्यंत सौंदर्यवल्लीस माझे आश्रमींच राहूंदे. कारण प्रवासांतील क्लेश तिला सहन होणार नाहींत. माझ्या दुसऱ्या दोन कन्यांच्या सहवासानें तिचें कालक्रमण चांगलें होईल, व तुह्मीं येथें आलां ह्मणजे सर्वांचे मनोरथ पूर्ण होऊन आनंदानें स्वनगरीं जाल. ( दोघी कन्यांस ) कोठें आहेतरे त्या दोघी, वेत्रवती ए सानुमती ( दोघीही प्रवेश करतात) हे पहा; ही तुमची धर्मभगिनी असें समजून हिचें नीट रीतीनें लालन पालन करा समजलांतना. ( सौंदर्यवल्लीस ) मुली जा त्यांचे बरोबर, कोणत्याही प्रकारचा मनांत संकोच धरूं नको. थोड्याच दिवसांच्या अनुभवावरून तुला हें स्थल सोडूं नये असें वाटेल व तुझ्या घरचें स्मरणही तुला होणार नाहीं. इतक्यांत तुझा पती येऊन तुला भेटेल व तुझे सर्व हेतू पूर्ण होऊन तुह्मीं उभयतां सुखानें अखंड लक्ष्मी भोगाल हा मीं

पुनः तुह्मांस अशिर्वाद देतों हा ग्रहण कर (सौंदर्यवल्लीचे मस्तकावर हस्त ठेवतात. )

सौं०— महाराज, हा आह्मां दीनांवर केवढा अनुग्रह. आज आमचा खचित भाग्योदय झाला असें आह्मीं समजतों. महाराज, मला येथें कोणच्याच गोष्टीचा संकोच नाहीं व आपण केलेली आज्ञा मला शिरसावंद्य आहे. ( असें ह्मणून नमस्कार करून वेत्रवती व सानुमतीस) चला बाई, सख्यांनो, मीं आपली अज्ञान तशांतून अपरिचित तेव्हां चुकले तर सांगत जा व संभाळून घ्या ह्मणजे झालं.

वे०— हें काय सखे भलतंच बोलतेस. तूं चुकशील तेथें आह्मीं सांगूहो, आणि तुला कधींही कांहीं कमी पडूं देणार नाहीं बरंका.

सा०— आपण कनइ जशा तिघी सख्या बहिणी याप्रमाणें गडे राहूं, मग आपल्या सारखं सुखी दुसरं कोण असणार आहे? वरं गडे चला तर गुरुजींच्या पुजेचे सामानाची तयारी करायची आहेना; हिला सुद्धां आपण शिकवूं चला बाई तर.

वे०— हो खरंच गुरुजी आतां स्नानास जातील. स्नान करून येईपर्यंत आपलं काम सर्व आटपलं पाहिजे. सखे सौंदर्यवल्ली चल गडे आंत.

सौं०— खरंचका मला सर्व काम शिकवा बरंका चला तर बाई ही मीं उठलें पहा.

वे०— चला, ही मीं निघालें.

सा०— चला हीं मींही आले बघ ( तिघी दुर्वासऋषींस नमस्कार करून निघून जातात ).

दु०— अष्टपुत्रा सौभाग्यवती भव. जा मुलींनों, नीट आनंदानें रहा बरें. काहो शिष्य किती घटका दिवस आला, माध्यान्ह स्नानाचा वेळ झाला नव्हे? बरें मीं जातों स्नान करून येतों इतक्यांत पुजेची सर्व तयारी नीट झाली पाहिजेहो. आणि घरांत भांडूंबिंडूं नका. (राम, राम, राम, ह्मणत निघून जातात.)

प० ऋ० शि०— चलरेगड्या पुजेची तयारी केली पाहिजेना आजची तुझी पाळी आहे मीं काहीं नाहीं करणार बरेंका.

दु० ऋ० शि०— बरें बाबा मीं सर्व काम करतों तूं आपला स्वस्थ बसून जेवशील तर खरा. बरें चला गप्पा मारण्यांत अर्थ नाहीं ( सर्व निघून जातात. )

प्रवेश चवथा समाप्त.

---

## प्रवेश पांचवा.

### ( कनकनगरींतील राजवाडा )

( कन्या विरहव्यथेनें पीडित झालेला शौर्यसागरराजा दोन मंत्र्यांसह प्रवेश करतो. )

शौ०— अहाहा! परमेश्वरा!! तुझी लीला मोठी अगाध आहे. अरे आज येवढें ऐश्वर्य असून मला तें

नसल्याप्रमाणें भासत आहे. किती मीं दुर्दैवी, किती मीं अविचारी! या महामायेच्या मोहपाशांत गुंतून मीं आपल्या प्रीय कन्येस अंतरलोंना! काय तिचे सद्गुण, रूप किती मनोहर, मर्यादशीलपणा किती आणि असल्या सद्गुणी कन्येचा माझ्या दुर्लक्षामुळें व मूर्खपणामुळें नाश व्हावा? काय त्या संपत्तीस व राज्यास घेऊन करायचें आहे. कारण येवढा मीं राजा असून संतती नसल्यामुळें फार खेद करीत होतों तों परमेश्वरास दया येऊन मला येवढें रत्न प्राप्त झालें हातें त्यामुळें पुत्र नसल्याचेंही मला दुःख होत नसे तें रत्नही मीं आपल्या मूर्खपणानें गमावलें आं. तस्मात् प्रारब्धाची गती विचित्र होय. प्रधानजी काय करूंहो माझे प्राण कन्याविरहानें फार व्याकूळ होत आहेत तेव्हां:—

## पद.

**मजला भेटेल प्रियकन्या ॥ कोणी तरी सांगाहो ॥ ॥ धृ ॥ केले बहुताचि म्यां सायास । तेणें प्राप्त हीच अह्मांस ॥ वियोग दुःसह या जीवास । होनें उदास मन माझें ॥ मज० ॥**

प्रधानजी माझ्या कन्येचा शोध लाऊन माझी तिची भेट न झाल्यास हे प्राण रहातील असें मला वाटत नाहीं, तेव्हां काय करूंहो. हा सौंदर्यवल्ली! हा प्रीय कन्ये! (मूर्छित पडतो).

**प० मं०**—( त्यांस सांवरून धरून ) हं हं, महाराज हें काय. शोक आवरा अमळ विवेक करा! सरकारांनीं असा शोक केल्यानंतर आह्मीं सेवकांनीं काय करावें. तशांतून आपल्यास सर्व गोष्टींची अनुकुलता आहे तेव्हां ताईसाहेब कोठेंही असल्या तथापि त्यांचा शोध लावणें अशक्य नाहीं. मग इतका शोक करण्याचें कारण काय. उठा सरकार ( वारा घालून सावध करतो. )

**शौ०**— प्रधान, आपण ह्मणतां विवेक करावा परंतु एकुलती एक कन्या ती नाहींशी झाल्यानंतर शोक कसा आवरेल. असो प्रारब्ध माझें. आतां आपण शोध करण्याकरितां तावडतोब मनुष्यें रवाना करा, व जो खर्च लागेल तो आपल्या भांडारखान्यांतून करा. सांगणें ह्मणून येवढेंच कीं, तिचा शोध लावून तिची माझी भेट झाल्याशिवाय मला चैन पडणार नाहीं समजलांत.

**दु० मं०**— महाराज, त्यावद्दल आपण बिलकुल काळजी करूं नये. आतांच्या आतांच चहूंकडे शोध करण्याकरितां मनुष्यांची रवानगी करितों; परंतु विनंती येवढीच कीं, आपण दुःख मात्र करूं नये. कोण आहे पहारेकरी, जा व त्या घोडेस्वारांचा नाईक रामप्रसाद यास घेऊन ये. लवकर येहो.

**पहा०**— फार उत्तम आहे हा आतां आलोंच ह्मणा. ( निघून जातो व रामप्रसादास घेऊन येतो ).

प० मं०— रामप्रसाद, आपल्या ताईसाहेबांस कोणीं दुष्टांनीं नेल्याचें वर्तमान समजलेंच असेल; त्यामुळे महाराजांची काय अवस्था झाली आहे, तीही तुह्मांस दिसतेच आहे; तरी अष्टदिशेस वीस वीस स्वार रवाना करून त्यांनीं सर्व खेडींपाडीं, दरींखोरीं, रानेंवनें व शहरें धुंडून ताईसाहेबांचा शोध लावून त्यांस घेऊन यावें. व जो त्यांचा शोध लावील त्यास पांच हजार रुपये इनाम देण्यांत येईल. स्वारांस जो खर्च लागेल तो देण्यास जामदारखान्यावरील अधिकाऱ्यास हुकूम केला आहे. हें काम बिलकुल हयगय न करतां ताबडतोब झालें पाहिजे समजलांतना !

राम०— फार उत्तम आहे सरकार, आतांच्या आतांच सर्व स्वारांची रवानगी हुकुमाप्रमाणें करून देतों; महाराज ताईसाहेबांचा शोध लागला असें समजा त्याची बिलकुल काळजी करूं नका, मात्र महाराजांनीं शोक आवरून कांहीं दिवस स्वस्थ राहिलें पाहिजे, येतों तर मीं.

दु० मं०— फार उत्तम आहे यावें ( रामप्रसाद मुजरा करून निघून जातो. )

प० मं०— सरकार परवा तयार केलेल्या मोतीबागेंत हवा खाण्यास अंमळ येणारका. तेथें गेल्यावर थोडी करमणूक होऊन चित्तास समाधान होईल.

शौ०— बरें आहे चलावें, तुह्मीं उभयतांही मजबरोबर चला. रथ तयार आहेका?

दु० मं०— रथ केव्हांचा तयार आहे. चलावें सरकार.

शौ०— चला तर (पोषाख करून सर्व निघून जातात).

प्रवेश पांचवा समाप्त.

**अंक तिसरा समाप्त.**

# अंक चवथा.

## पात्रें.

सत्वशील ................ रत्नपुरीचा राजा.
सुबुद्धी ...................... त्याचा प्रधान.
पुण्यशील ............ सौंदर्यवल्लीचा पती.
गोविंदशास्त्री .................... राजगुरु.
भुवनसुंदर व कमलाक्ष } ........ पुण्यशीलाचे मित्र.
भालदार चोपदार ........ इतर सेवाजन.
दुर्मती व सुनिती } ........ रत्नपुरींतील दोन गृहस्थ.
दुर्वासऋषि.....दंडकारण्यांतील महान् तापसी.
ऋषि शिष्य ........ दुर्वासऋषींचे शिष्य.
सौंदर्यवल्ली ........ शौर्यसागराची कन्या.
वेत्रवती व सानुमती } ऋषिकन्या व सौंदर्यवल्लीच्या सख्या.
सत्यशील ........ सौंदर्यवल्लीचा हितकर्ता.
शौर्यसागर ........ कनकनगरीचा राजा.
मदनिकाराणी ................ त्याची स्त्री.
सयाजी ................ मदनिकेचा भाचा.
फत्तेसिंग ........ शौर्यसागराचा जमादार.
अनुराधा व रेवती } ........ सौंदर्यवल्लीच्या सख्या.

भालदार चोपदार ........ इतर सेवाजन.
रामशास्त्री ........ शौर्यसागराचे कुलगुरु.
कृष्णंभट व बचंभट ........ भिक्षुक मंडळी.
सूत्रधार ..................... नाटककर्त्ता.
नटी ........................ त्याची स्त्री.

## प्रवेश पहिला.

### ( रत्नपुरीचा दरबार. )

( सत्वशील, सुबुद्धी, पुण्यशील, गोविंदशास्त्री, भालदारचोपदार वगैरे मंडळी प्रवेश करतात. )

**भा०**— राज्याधिराज सत्वशीलराज महाराज, आस्ते चलना, निगारख्खो सब आपापने जगेपर बैठना.

**सत्व०**—प्रधानजी, राज्याची व्यवस्था तर ठीक आहेना.

**सु०**— महाराज, ज्याप्रमाणें गुरुजींनीं राज्यनीति कथन केली आहे त्याप्रमाणें सर्व व्यवस्था ठेवली आहे. मग त्यांत उणीव ती कोठून असणार सरकार.

**सत्व०**— शास्त्रीबोवांसारखें अमोल्य रत्न आज आपले पदरीं आहे हें एक आपलें सुदैव व परमेश्वराची कृपाच समजली पाहिजे. देवसभेंत बृहस्पती व आपल्या सभेंत शास्त्रीबोवा. दोघांचीही योग्यता मीं सारखीच समजतों; कारण गुरुंच्या ठिकाणीं अवश्य असणारे सर्व गुण यांचे ठायीं मूर्तिमंत वास करीत आहेत. कां खरें कीं खोटें

प्रधानजी. उगीच तोंडदेखलें बोलूं नका; निस्पृहतेनें सत्य असेल तेंच सांगा.

मु०— अगदीं सत्य गोष्ट होय. बृहस्पती व गुरुजी यांत अंतर मुळींच नाहीं. कोणचाही त्रिकट प्रश्न विचारला तथापि समर्पक उत्तर तावडतोब मिळायचेंच; याचें नांव विद्यासंपन्न.

गो०— राजा, व्यर्थ माझी स्तुति कशाला करतोस, अरे कोठें इंद्राचा ऐरावत व कोठें शहांभटाची तट्टाणी. बृहस्पतीची योग्यता मला कोठून येणार, अरे, परमेश्वर संकटमुक्त करणार असला ह्मणजे सर्व नीट चालतें येवढेंच. एरव्हीं आमची विद्वत्ता ती कसली आणि त्याबद्दल इतकी स्तुति ती कशाला?

सत्व०— शास्त्रीबोवा, आपल्यास हें बोलणें रास्तच आहे, परंतु ज्या अर्थी आह्मांस आपण बृहस्पतीचे ठिकाणीं उपयोगी पडतां त्या अर्थी आपणांस बृहस्पतीची उपमा देणें ह्मणजे आपली व्यर्थ स्तुति करणें असें मला वाटत नाहीं. कां प्रधानजी असेंच कीं नाहीं.

मु०— महाराज सत्य होय. आणि पुण्यशील महाराजांचें दत्तविधान व त्यांस राज्याभिषेक करण्याचा योगही शास्त्रीबोवांवाचून आलाच नसता, कारण राजास जे गुण अवश्य पाहिजेत ते त्यांचे अंगीं आहेत याची पारख त्यांनींच केली व त्यांचे शरीरावरची राज-

चिन्हेंही त्यांनींच ओळखलीं कीं नाहीं. येवढें शहाणपण आमचे अंगीं आहे काय?

**सत्व०**— अहाहा! खचित त्या संबंधानें मजवर त्यांचे महदुपकार आहेत यांत संशय नाहीं; कारण मीं वृद्धदशेप्रत येत चाललेला, मजला अपत्य मुळींच नाहीं. तशांतून राज्याचा भार मस्तकीं घेऊन तें योग्य रीतीनें चालवील असा एकहीजण मला आढळेना तेव्हां मीं महत् संकटांत होतों, इतक्यांत माझ्या सुदैवानें ह्मणा किंवा परमेश नियमानियम ह्मणा या पुण्यशीलाचा मला लाभ झाला व तो शास्त्रीबोवांनीं शेवटास नेला. आतां माझें मन इतकें स्वस्थ झालें आहे कीं हें सर्व राज्य पुण्यशीलाचे स्वाधीन करून तिर्थयात्रेस जाण्यास मला कांहींच कठीण वाटत नाहीं. कां शास्त्रीबोवा असेंचना.

**गो०**— राजा अगदीं सत्य होय. या पुण्यशीलाची योग्यता मीं किती ह्मणून सांगू आणि त्याच्या सर्व लक्षणांवरून हा सार्वभौमराजा व्हावा असें माझें अनुमान आहे. राजा निर्धास्तपणें याजवर सर्व राज्यभार टाकून तिर्थयात्रा कर व आपल्या देहाचें सार्थक करून घे; कारण हा मानवदेह वारंवार येत नाहीं.

**सत्व०**—कां पुण्यशीला, 'गुरूजी काय ह्मणतात तें ऐकलसना. मीं तर या सर्व खटाटोपास कंटाळलों असून यातून सुटावें व परमेश्वर सेवेंत काळ घालवून या

देहाचें सार्थक करून घ्यावें असा विचार करीत आहे मग तुझ्याकडून तयारी आहेना?

पु०— महाराज, मीं आपला दास आहे. प्रभूनें माझे ठायीं जेवढें शहाणपण ठेविलें आहे तेवढें खर्चून हा भार सहन करीन असें मला वाटतें त्यांतून ज्या ज्या प्रसंगीं अडचणी येतील त्या त्या वेळीं गुरुजी व प्रधानजी आहेतच; मग त्याबद्दल आपल्यास इतकी काळजी करण्याचें कारण तें कोणतें?

सत्व०— शाबास पुण्यशीला, येवढी उमेद असल्यावर आजच माझें सर्व ओझें उतरलेंस असें मीं समजतों. त्यांतून गुरुजी आपलें सहाय्य त्यास आहेच तेंव्हां मला लवकर यातून सोडवाल तर बरें कसें गुरुजी.

गो०— राजा, तिर्थयात्रा करण्यास जाण्याकरितां तुला आमचेकडून मोकळीक आहे. राजा, राज्यव्यवस्थेबद्दल बिलकुल काळजी करण्याचें कारण नाहीं. प्रभुसत्तेनें सर्व नीट चालेल.

पु०— परंतु माझी एक आपल्या चरणापाशीं विनंती आहे ती कोणची ह्मणाल तर शिकार करावी असा माझे मनांत फार दिवस विचार घोळत आहे तरी मीं परत आल्यानंतर महाराजांनीं सुखेंकरून गमन करावें ह्मणजे झालें.

गो०—मुला, तुला शिकारीस जाणें आहे तर खुशाल जा त्याबद्दल राजास राहण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं, कारण परमार्थाकडे त्याचें हल्लीं लक्ष लागलें

आहे त्यांस व्यत्यय आणणें बरोबर नाहीं; शिवाय त्याची आयुष्यमर्यादाही फार थोडी राहिली आहे. तूं जरी शिकारीस गेलास तथापि तुझे मागें आह्मीं कोणच्याही गोष्टीची अडचण पडूं देणार नाहीं. त्याची काळजी तूं मुळींच करूं नको.

पु०– असें असेल तर मजकडून मुळींच अडथळा नाहीं. महाराजांनीं पाहिजे त्यावेळेस जावें.

सत्व०– फार उत्तम आहे. प्रधानजी माझे मागें नीट रीतीनें व्यवस्था ठेवणें आपणाकडे आहे; कारण आपण जुने शहाणे अनुभविक असे अहांत, तशांतून जरूर पडल्यास गुरुजी सल्ला मसलत देण्यास आहेतच. बरें आतां किती घटका दिवस आला असेल स्नानाची वेळ झाली असाची नाहीं बरें?

सु०– होय महाराज, पहारेकरी मघाशींच वर्दी देऊन गेला. हल्लीं दहा घटकांचा अंमल आहे, सरकार उठावें तर.

गो०– राजा, माझीही स्नानसंध्येची वेळ झाली, तेव्हां मींही रजा घेतों. राजा, तुला सांगणें ह्मणून एवढेंच कीं परमार्थाकडे लक्ष लावलेंस ह्मणजे इकडचा विचार अगदीं मनांत येऊं देऊं नको कारण त्यापासून स्वार्थही साधणार नाहीं व परमार्थही घडणार नाहीं हें पक्कें लक्षांत ठेव बरें.

सत्व०– ठीक आहे त्याप्रमाणेंच वर्तन ठेवतों; यावें तर आपण.

भा०— राज्याधिराज सत्वशीलराज महाराज. कचेरी बरखास्त. ( सर्व निघून जातात. )

( प्रवेश पहिला समाप्त. )

---

## प्रवेश दुसरा.

( पुण्यशील आपले महालांत प्रवेश करतो. )

पु०— ( मनाशींच ) काय चमत्कार आहे. दैव बलवत्तर असलें ह्मणजे कोणाचेंही कांहीं चालत नाहीं ह्मणतात तें खोटें नव्हे. कारण त्या मदनिकेनें, माझा कांहीं एक अपराध नसतां, केवळ द्वेषबुद्धीनें माझी हालअपेष्टा व्हावी एतदर्थ मजवर खोटा आळ घेऊन मला हद्दपार केलें, पण मीं सत्यानेंच चाललों, तेव्हां माझी दया परमेश्वरास कां येणार नाहीं. आतां ग्रहदशा जोंपर्यंत प्रतिकूळ होती तोंपर्यंत दुःखें व संकटें व अत्यंत दुसह्य प्रवास हीं सोसावीं लागलीं खरीं; पण शेवटपर्यंत सत्यानेंच वर्तन केल्यामुळें आज मीं या स्थितीस पोहचलों. आतां मला कोणच्याही गोष्टीची न्यूनता आहे काय? येवढें मोठें राज्य माझ्या ताब्यांत; शेंकडों दासदासी सेवेंत हजर; आज मनांत येईल ती गोष्ट करण्यास मला अनुकुलता; मंत्री गुरुजी सारख्यांचें मला सहाय, सुमित्रांचा सहवास. वा!

एकूण आज कृतकृत्य झालों. ( थोडें स्मरण झाल्या-सारखें करून ) पण या सर्व सौख्यांत अवश्य जें स्त्रीसुख तें मला आहे काय? ह्मणजे हा भ्रांतियुक्त प्रश्न मीं आपल्यासच विचारतों कसा! माझें लग्न झालें किंवा नाहीं हें मलाच आठवत नाहीं. वाः काय चमत्कार हा! कोणच्याही गोष्टीस पुष्कळ दिवस झाले ह्मणजे त्याचें विस्मरण होतें काय? एरव्हींच्या गोष्टीबद्दल असो पण लग्नासारख्या गोष्टीचें विस्मरण! उघडच आहे; कारण त्यानंतर मजवर किती संकटें व अनावर अडचणी आल्या, त्याच्या विचारांत माझें मन सदा गढून गेलेलें होतें त्यामुळें मला स्मरण राहिलें नाहीं. ( चांगलें स्मर-ण झाल्यासारखें करून ) हरहर! काय मीं मूर्ख ( आंगठीकडे पाहून ) ही माझ्या प्रियेची आंगठी. तिचा माझा वियोग झाला तेव्हां तिनें ही आपली आठवण ह्मणून माझ्या हातांत घातलीन् व मीं आपलें कंकण तिचे हातांत घातलें. असें असून या आंगठीचें मला स्मरण सुद्धां होऊं नये. किती मीं कृतघ्न. मजकारितां तिचा जीव तिळतिळ तुट-त असेल व ती आपला प्राण मुठींत धरून माझी भेट केव्हां होईल या चिंतेत सदा निमग्न असेल; आणि मीं आपला स्वस्थ आनंदांत दिवस घालवित आहें. तस्मात् धिःकार असो माझ्या जीवीत्वास. किती मीं निष्टूर! हायरेहाय, देवा माझी प्रिया आतां

मला भेटेल काय! छे: कोठून भेटणार; कारण पुष्कळ दिवस झाल्यामुळें माझ्या भेटीची निराशा होऊन तिनें कदाचित् आपला प्राणत्यागही केला असेल. पण छे: असलें निंद्यकर्म ती कधींही करणार नाहीं. पण तिच्या इच्छेविरुद्ध त्या महा-मायेनें तिचें लग्न आपल्या भाच्याबरोबर लावून दिलें नसेलना. असें झालें असल्यास खचित ती प्राणत्याग केल्यावांचून रहाणार नाहीं; कारण इतर स्त्रियांप्रमाणें ती मिथ्याभाषण करणारी नव्हे; एकवार जे तिच्या मुखांतून शब्द निघाले ते कधीं-ही ती माघारी घेणारा नव्हे; कारण थोर असतात त्यांचें भाषण हेंच वचन होय. पण माझ्या सत्य-शीलाकडून आलिकडे पुष्कळ दिवसांत कांहीं बातमी कळली नाहीं यावरून मनास किंचित् शं-का येते. पण तो जोंपर्यंत माझ्या प्रियेजवळ आहे तोंपर्यंत कोणच्याच गोष्टीची काळजी करणें नको; कारण त्यांच्या विश्वासुपणाबद्दल माझी बालंबाल खातरी आहे. असेंही नाहीं तर मग ती असेल कोठें व तिची स्थिति तरी काय असेल हेंही सम-जत नाहीं. आतां मीं काय करूं? माझ्या प्रियेचें स्मरण झाल्यापासून माझें मन अगदीं अस्वस्थ झालें आहे. या राज्यास व ऐश्वर्यास घेऊन काय कर्तव्य आहे. तिनें मजशीं आपलें कुळशीळही न पहातां, गांधर्वविवाह केला व मजकरितां अत्यंत

दुःख वं जाच सोसला, तिला मीं राज्यमदानें विसरावें काय. प्रिये खचीत मीं तुझा मोठा अपराधी आहें; तेव्हां एकवार भेटून या दुष्टास जी शिक्षा करणें असेल ती कर ह्मणजे ती मीं खुषीनें भोगीन. मीं शिक्षा भोगण्यास तयार आहे खरा पण ती मला कसची भेटते (भ्रांतिष्ट होऊन) हा प्रिये! हा सौंदर्यवल्ली! थांब थांब हा आलों बघ. तुला मीं लवकर भेटलों नाहीं ह्मणून मजवर रागावलीस काय; पण मीं त्रिवार क्षमा मागतों मग तर झालेंना; मग आतां विलंब कां. ये लवकर व एकवार दृढालिंगन दे पाहूं (दृढालिंगन देण्यास जातो तों जमिनीवर पडून मूर्छित होतो, इतक्यांत काय वाजलें ह्मणून पहाण्याकरितां महालाचे बाहेरचे बाजूस असलेले त्याचे भुवनसुंदर व कमलाक्ष नांवाचे दोघे मित्र प्रवेश करतात.)

भु०— काय कमलाक्षा, आपल्या पुण्यशील महारांजांची स्थिति पाहिलीसना. असें होण्याचें कारण काय बरें असावें? कारण आपण आज पुष्कळ दिवस त्यांचे सहवासांत आहोंत पण असला प्रकार आपले पहाण्यांत कधींच आला नाहीं. मीं तर बोवा अगदीं गोंधळून गेल्यासारखा झालों आहें; आपली अक्कल कांहीं येथें चालत नाहीं. चल चल आपण जाऊन त्यांस सावध करूं; वेड्यासारखा उभा

राहून मजा कसली पहातोस. ( पुण्यशीलाजवळ जाऊं लागतो त्याचा हात धरून )

क०— थांबरे वेड्या. मोठा महाराजांची काळजी वाहणारा. आह्मांला त्यांची कांहींच काळजी नाहीं वाटतें. पण गड्या जरा दम धरशील तर तुला थोडी गंमत दाखवितों. आज राजेश्रींना कोणाची तरी आठवण झालीसें वाटतें; तेव्हां क्षणभर या दाराच्या आड उभे राहून आपण मुकाट्यानें ऐकं ह्मणजे काय असेल तें आपोआप कळेल. ( दोघेही दाराच्या आड उभे राहतात. )

पु०— (थोडा सावध होऊन )काय मीं जमिनीवर पडलों आहे! मला वेड तर लागलें नाहींना! एखाद्यानें पाहिलें तर हांसेल सुद्धां. मना, इतकें भ्रांतिष्ट व उतावळें होऊं नको; तुला सर्व गोष्टी अनुकूल आहेत तेव्हां तुझे हेतू सिद्धीस जाण्यास फार दिवस नकोत. पण प्रियेवाचून आतां एक क्षणही जाण्याची पंचाईत तों मीं दिवस कसे घालविणार ( पुनः भ्रम झाल्यासारखें करून) वा:! फार चांगलें झालें एकूण मीं भाग्यशील खरा; कारण माझें हें भाषण ऐकून व ही स्थिति पाहून माझ्या प्रियेस दया आली व ती मला भेटण्याकरितांच इकडे येत आहेसें वाटतें. अहाहा! काय सुंदर रूप तरी हें ! असलें अमोल्य रत्न हरवलें होतें तें मला पुनरपि मिळणारना. प्रिये आतां इतकें आढेवेढे कशाला. पुरे विनोद.

एकवार क्षमा मागितली ती पुरे नाहींका झाली (असें ह्मणून धरूं लागतो व कांहीं हातीं न लागल्यामुळें लज्जित होऊन इकडे तिकडे पहातो इतक्यांत दारा आड उभे असलेले दोघेही मित्र हंसत हंसत प्रवेश करतात.

भु०– कां महाराज, आज स्वारी कोणत्या विचारांत गढून गेली होती व इतका निजध्यास लागून भ्रांतिष्ट झालां अशी वस्तु तरी कोणची?

क० - हा वेड्या, मग येवढा वेळ ऐकलेंस तें काय. अरे, प्रिये, चुकलों, क्षमा मागतों, विनोद किती, रत्न वगैरे जीं अक्षरें महाराजांच्या तोंडातून निघालीं त्यांवरून स्वारीस वेड लावणारी वस्तु कोणची असावी हें अनुमान तुला करतां येत नाहीं मग काय. महाराज तर तुझ्या शहाणपणाची तारीफ नेहमीं करीत असतात. हेंचका तें शहाणपण. बरें असो. महाराज ज्या प्रियेचें इतकें वेड लागलें आहे अशी अप्सरा कोण माता प्रसवली आहे एकवार कळूं तर द्या ह्मणजे ती साध्य होण्यास आमचे हातून कांहीं मदत झाली तर आह्मीं करूं.

पु०– अहाहा! मित्रांनों, काय सांगूं; तिचें स्मरण झालें ह्मणजे मीं देहभान कीरे विसरून जातों. अहाहा! काय तें सुंदर रूप; गुण ह्मणून किती वर्णन करूं? आणि असल्या अमोल्य रत्नास मीं एका दुष्ट स्त्रीमुळें अंतरलों ना! मित्रांनों, खचित तिच्या सहवा-

सापुढें सध्याचीं माझीं सर्व सुखें तुच्छ. आहेत. आणि तुह्मीं जर एकवार तीस पहाल तर तुह्मांस तसेंच वाटेल. हा प्रिये! हा चारुगात्री! हा सौंदर्य-वल्ली! ( मूर्छा येऊन पडतो. )

भु०—हं, हं, हं. महाराज काय हें. इतका शोक! यास ह्मणावें तरी काय. महाराज आपण आह्मांस उप-देश करणारे त्या आपली ही अवस्था मग आमच्या सारख्या अज्ञानांनीं काय करावें. तेव्हां अंमळ विचार करा व आह्मीं सांगतों इकडे लक्ष द्या.

क०—पण महाराज, मीं ह्मणतों आपल्यास दुःख क-रण्याचें कारण मुळींच नाहीं; कारण सौंदर्यवल्ली वहिनीस स्वाधीन करून घेण्याचीं सर्व साधनें आप-णाजवळ आहेत मग त्याबद्दल इतका खेद तो कशाला महाराज ?

पु०—मित्रांनों, तुह्मीं ह्मणतां ही गोष्ट खरी, पण ती हल्लीं कोठें असेल, जीवंत असेल किंवा माझ्या वि-योगामुळें परलोकवासी झाली असेल हें समजण्यास काय मार्ग. मित्रांनों, माझ्या विरहामुळें ती इतके दिवस वांचली असेल असें मला तर वाटत नाहीं आणि असें झालें असल्यास तिजवांचून माझे प्राण राहतील ही आशा मला मुळींच नाहीं; तेव्हां तिच्या शोधाची कांहीं युक्ति सुचत असल्यास लव-कर सांगा पाहूं ?

भु०—महाराज त्यांत काय आहे. आपण आतां शि-

कारीस जाणारच आहोंत; तसेच सर्वजण तिच्या शोधास जाऊं व महाराजांस कोणाचे तरी हातीं आह्मीं निरनिराळे देश व त्यांतील लोक, त्यांची भाषा, रितीभाती, कलाकौशल्यें वगैरे पहाण्याकरितां गेलों ह्मणून निरोप सांगून पाठवूं ह्मणजे झालें. कां कमलाक्षा कशी काय युक्ति आहे ?

क०—वाः यापेक्षां दुसरी युक्ति ती कोणती. महाराज, भुवनसुंदर ह्मणतो असेंच करावें ह्मणजे त्यांत दोन हेतू साधतील. एक तर देश पहाणें होईल व दुसरा जो आपला मुख्य हेतू वहिनीसाहेबांचा शोध लावणें तोही साध्य होईल.

पु०— फार उत्तम आहे, तर शिकारीस निघण्याची लवकर तयारी करा. आतां हें काम दिवसगतीवर मुळींच टाकावयाचें नाहीं समजलांत. जा तर लवकर आपल्या शिकारीची सर्व सिद्धता तुह्मीं स्वतः करा. बरें मित्रांनो, आतां किती वाजले असतील बरें? मला वाटतें आपण थोडी सहल करण्यास गेलों असतां किंचित् चित्तास समाधान होईल तर रथ सिद्ध आहे किंवा नाहीं चवकशी करा बरें ?

भु०—महाराज, रथ तर नेहमींप्रमाणें केव्हांचा तयार आहे. मलाही वाटतें कीं थोडी हवा खाल्यापासून मनास किंचित् आराम वाटेल.

क०— आणि याचा अनुभव आपल्यास पुष्कळ वेळ

आला नाहीं काय? मग महाराज, चलावें तर. मीं अर्धी रथांत जाऊन बसूं काय?

पु०— हो फिरणें ह्मटलें ह्मणजे तुह्मी नेहमीं तयारीच असावयाची; असो. चला तर उशीर नको लवकरच परत येऊं ह्मणजे झालें. पण मित्रांनो, शिकारीस उद्यां सकाळींच निघावयाचें बरें. महाराजांची आज्ञा मीं घेऊन ठेविलीच आहे आतां फक्त आपला निघण्याचाच आवकाश.

भु०— महाराज, आमच्याकडून आतां ह्मटलें तरी तयारी आहे. विलंब काय ह्मणून आह्मीं आपले सौंगडी. जेथें आपण तेथें आह्मीं.

कु०— मीं तर हा आतांच निघण्यास तयार आहें, आह्मांला काय येथें असलें तरी सारखेंच व रानांत असलें तरी सारखेंच. ज्या गोष्टीपासून महाराजांस सौख्य आहे तीच गोष्ट आह्मीं अवश्य करणार.

पु०— फार उत्तम आहे. मित्रांनो, चला तर. बरोबर कोणी दुसरे नको आपण तिघेच जाऊं चला उठा.

भु०— चला महाराज हा मीं निघालों.

कु०— हा मीं निघालों चलावें सरकार.

पु०— चला ( सर्व निघून जातात. )

( प्रवेश दुसरा समाप्त. )

---

# प्रवेश तिसरा.

## ( रत्नपुरींतील मोतीचौक. )

( दुर्मती व सुनिती नांवाचे दोन गृहस्थ प्रवेश करतात. )

**दु०**— कां सुनिती, कांहीं नवीन गपसप, तूं तर बाबा नेहमीं मोठाल्या संधानांवर असणारा; त्यामुळें तुजपाशीं बातम्यांस कांहीं कमती नसायची ह्मणून विचारतों; पुण्यशील महाराज मोठ्या लवाजम्यानिशीं उदईक शिकारीस जाणार ह्मणून ऐकलें व शिकारीहून आल्यानंतर ह्मणे राज्यकारभार हातीं घेणार खरेंकारे. पण शिकारीस जाणार किंवा कांहीं दुसरें काम आहे.

**सु०**— अरे राजेलोकांना दुसरीं कामें तीं कोणतीं. शिकारीसच जाणारहो. तूं येणार असलास तर तुलाही बरोबर नेऊं. येथें काय ऐशी तेथें पंचायशी. एक दोन माणसें कमी कीं जास्ती. पण कायरे पुण्यशील महाराजांनीं राज्यकारभार घेतला ह्मणजे आपली चैन होईल नाहीं.

**दु०**— आपली कशाला ह्मणतोस, माझी ह्मण. बरें तूं मला शिकारीस नेणार ह्मणतोस आणि तेथें वाघानें मला गट्ट केलें तर मीं आपल्या बायकोस व आईबापास नाहींसा होईननारे. ( सुमतीचा हात धरून ) पण मित्रा, हे पुण्यशील महाराज कोठले

कोण, येथें कां व कसे आले वगैरे कांहींच बातमी कळली नाहीं. तुला तरी ठाऊक आहेकां? असली तर सांग पाहूं.

सु०— काय मूर्ख आहेसरे; आपण शिकारीस जाणार तेथें चैनीनें खाणारपिणार मजा करणार व पुनः स्वारीबरोबर परत येणार. बरें पण मीं तुला असें विचारतों, त्यांच्या नांवागांवाची चवकशी तुलारे कशाला? लहान तोंडीं मोठा घास घेऊं नये बाबा!

दु०— आपल्यावर जो राज्य करणार त्याची हकीकत माहित असणें अवश्य नव्हे कारे. त्यांतून तुला ठाऊक असेल तर सांग. नाहींपेक्षां कधीं तरी कळेलच. काय बेटा ब्रह्मज्ञान सांगायला लागला. अरे सुनिती येवढेसें पोरनारे तूं मजपुढें लंगोटी घालून हिंडत होतास तो मला शिकवायाला लागलासना. तुझ्यापुढें हात जोडावे बाबा.

सु०—अरे दुर्मती असें नव्हेरे. तूं तरी अर्थाचा अनर्थ करणारा दिसतोस. माझ्या बोलण्याचा भाव इतकाच होता कीं थोर लोकांच्या चवकशींत आपण पडूं नये. मीं कांहीं तुला लागावें या हेतूनें मुळींच बोललों नाहींहो. बरें दुर्मती मग तूंही निघण्याची तयारी करणारनां. चल बापडा येथें बसून तरी काय करणार शिकारीची गंमत तरी दृष्टीस पडेल. मग येणारना तूं.

दु०—फार उत्तम आहे. पण तुझी माझी गांठ क-

शी पडणार? कारण सकाळीं तूं आपल्या गडबडींत असशील, मग माझी तुला आठवणही होणार नाहीं. तेव्हां तूं सांगशील तेथें येण्याची मीं तजवीज ठेवतों.

सु०—तर मग तूं रात्रीं येथेंच निजायला येशील तर मला वाटतें बरें होईल; पण त्यामुळें तुला अडचण वगैरे तर नाहींना होणार? कारण नजाणों कदाचित् घरचीं माणसें उद्यां तूं जाणार ह्मणून येऊं देणार नाहींत; तेव्हां तो विचार तूं आपला बघ.

दु०— अडचण कसलीरे वेड्या. आपल्यास काय, आपण फंदी गडी. कोठेंही निजलों तरी आपलें घरच. बरें तर मीं रात्रीं तुजकडेसच निजण्यास येतों. आपल्याबरोबर कांहीं घेणें सवरणें असेल तर त्याची तजवीज तूं करशीलच. बरें आतां बरीच संध्याकाळ झाली तर लवकर आटपून आलें पाहिजे येऊं तर मीं? हा आलोंच असें समज.

सु०— फार उत्तम आहे. बरोबर घेण्यासवरण्याच्या संबंधानें तूं अगदीं काळजी करूं नको. लवकर येहो पण. येतर आतां.

दु०— फार उत्तम आहे, येतों तर. (दोघेही निघून जातात.)

(प्रवेश तिसरा समाप्त.)

# प्रवेश चवथा.

## ( दंडकारण्य. )

(पुण्यशील, भुवनसुंदर, कमलाक्ष व इतर सेवक-जन प्रवेश करतात. )

भु०– महाराज, आतां ही आपली शिकार किती वेळ चालणार? आपण तर बोवा अगदीं थकून गेलों. आपले हातपाय अगदीं चालत नाहींत. तर महाराज आपण हें काम आटपून क्षणभर विश्रांती घेण्यास येणारका?

क०– अरे, तुझे हातपाय चालत नाहींत ह्मणतोस, पण मीं तर मूर्तीमंत आखडूननारे गेलों. महाराज, आपण आपले स्वस्थ चांगल्या चांगल्या घोड्यावर बसून इकडून तिकडे धांवतां पण या रोडक्या तट्टावर बसून माझा सांधानूसांधा खिळखिळा झाला. तेव्हां आपण या वृक्षछायेंत तळ देणार असलांत तर ठीकच आहे नाहींपेक्षां मीं तर हा बसलों पहा. ( खालीं बसतो. )

पु०– मित्रांनो, इतके हातपाय इतक्यांतच गाळूं नका. तुह्मींच थकलांत आणि मीं दमलों नाहीं ह्मणतां कीं काय. अरे मींही त्याच विचारांत आहें; पण आपल्या सर्व मनुष्यांस पुरेल अशी जागा तर मिळाली पाहिजेना.

भु०— महाराज, तें काम आह्मां दोघांकडे लागलें. चल कमलाक्षा आतां उशीर का? महाराजांची तर परवानगी मिळाली; आतां आपणाकडूनच कायतो विलंब वरें कां.

क०— अरे, या अरण्यांत जाग्यास काय तोटा आहे। जिकडे पहावें तिकडे दाट छाया लागली आहे. चल तर ( अंमळ पुढें जाऊन ) अरे ही वघ ही आंब्राई काय वाईट आहे. या ठिकाणीं पांचशे मनुष्यांचासुद्धां तळ पडेल. खरेंका खोटें. ( खालीं वसतो ) अरे बाबा बाबा, नकोरे ही शिकार, नमस्कार असो या कामाला!

धु०— पण कायरे, या अरण्यास दंडकारण्य ह्मणतात. याच ठिकाणीं एक महान् तापसी वास करीत असतात नव्हे कायरे. तुलांला त्यांचें नांव वगैरे कांहीं माहित आहेका?

भु०— महाराज, माझ्या ऐकण्यांत असें आहे कीं, दंडकारण्य ह्मणून जें घोर अरण्य आहे त्यांत दुर्वासऋषी ह्मणून कोणी महान् तापसी वास करीत असतात; तेव्हां हें तेंच अरण्य असल्यास येथें त्यांचाच आश्रम असावासें वाटतें महाराज.

क०— आणि मींही पण तसेंच ऐकलें होतें. काय त्या ऋषींचें ऐश्वर्य वर्णन करतात. ज्यांनीं ज्यांनीं त्यांचें दर्शन घेतलें आहे ( पण असे लोक फारच थोडे हो ) ते सांगतात कीं ते प्रत्यक्ष परमेश्वर आहेत.

त्यांनीं मनांत आणल्यास इच्छामात्रेंकरून ते प्रतीसृष्टी निर्माण करतील; पण महाराज, अशा सत्पुरूषांचें दर्शन होणें तरी पूर्वपुण्याईचें काम आहे नव्हे बरें?

पु०— ह्मणजे हें काय विचारतोस. अरे पूर्वपुण्याईवांचून सत्पुरूषांचें दर्शन घडतच नाहीं. असो मित्रांनो, तुह्मीं या ठिकाणीं सर्वजणांची नीट व्यवस्था लावा, इतक्यांत मीं थोडा इकडे तिकडे फिरून येतों बरेंका?

भु०— पण महाराज, हें घोर अरण्य आहे, तेव्हां बेतानेंच असावें बरेंका. नजाणो कदाचित् एखाद्या वाघाच्या जाळीबिळीजवळ जाल आणि पंचाईत होईल.

क०— आपल्यास पंचाईत पडेल येवढेंच नव्हे, पण त्याबरोबर आमचीही त्रेधा उडेल, कारण हें पडलें भयंकर अरण्य! आपल्यास त्याची कांहींच भीति वाटत नाहीं; पण आपला होईल खेळ आणि आमचा जाईल जीव ह्मणून सांगतों.

पु०— कायरे तरी भित्रे तुम्हीं! धन्य असो बाबा तुमच्या शौर्याची! अरे पण मीं होऊन वाघाच्या जाळीपाशीं कशाला जाऊं? आणि तशांतून कदाचित् गेलोंच तर त्याला तुमच्या पर्यंत येऊंच देणार नाहीं. हें पाहिलेंसका माझें धनुष्य. तशीच ही तरवार व हें पिस्तूल. येवढीं शस्त्रें मजजवळ असल्यावर दाहा वाघ आले म्हणून मीं भिणार आहें

कीं काय. असो, तुम्हीं सर्व व्यवस्था नीट लावा जा इतक्यांत मीं या अरण्याची शोभा वगैरे पाहून येतों.

भु०— फार उत्तम आहे. पण महाराज लवकर याहो. नाहीं तर आम्हीं उगीच आपली काळजी करीत वसूं, तेव्हां मागची थोडी काळजी असूंद्या.

क०— आणि सर्व सिद्धता होईपर्यंत अपण न आलां तर मीं नाहींरे बावा कोणाची वाट पहाणार. आपल्यास तर असें झालें आहे कीं केव्हां एकदाची हातातोंडाची गांठ पडते. नकोरे बाबा ही शिकार. चल भुवनसुंदरा. उगीच गप्पा मारण्यांत अर्थ नाहीं; आपल्यास पुष्कळ कामें आहेत; हे राजेश्री काय आयतेच येऊन ताटावर बसतील. चल चल लवकर (असें म्हणून भुवनसुंदराचा हात धरून दोघेही निघून जातात.)

पु०— (मनाशींच) बरी एकदाची पिडा गेली. काय बेटे नेहमीं जेवणावर लक्ष. असो. आतां आपण याच रस्त्यानें अरण्याची शोभा पहात पहात जाऊं. कदाचित् दैवयोगानें त्या दुर्वासऋषींची गांठ पडली तर बरेंच आहे. नाहीं तरी अनायासें येथें आलों आहोंत तेव्हां त्यांचें दर्शन घेतल्याशिवाय जावयाचें नाहीं हा तर कृतनिश्चयच. (अंमळ पुढें जाऊन) अहाहा! काय सुंदर हा बाग. हा कोणाचा असावा बरें. कारण—

## पद.

किति शोभा ही या उपवनची ॥ वर्णाया मज ज्ञान नसेची ॥ उपमा देतां इंद्रपुरिची ॥ शंका मनीं वाटे ॥ अति दुःखीही जन जरी असला ॥ येतां क्षणीं या उपवनाला ॥ विसरुनि जाइल सर्व शिणाला ॥ संशय मज नाहीं ॥ ऐसा महिमा थोरची वाटे ॥ पहाया उत्कंठा मनीं दाटे ॥ दर्शनाविण चैन न वाटे ॥ कृतनिश्चय झाला ॥

किती रम्य ही शोभा. या ठिकाणीं एखादा दुःखी जन जरी आला तथापि त्याचे चित्तासही समाधान झाल्यावाचून राहणार नाहीं. मग इतर मनुष्यांस सुख होईल यांत नवल तें कोणतें. पण येवढें चातुर्य खर्चून जें हें उपवन तयार केलेलें आहे हें कोणाचें बरें असावें. अथवा दुसरें कोणाचें असणार; कारण या अरण्यांत दुसऱ्या कोणाची रहाण्याची छातीच नाहीं. तेव्हां हें दुर्वासऋषींचेंच असलें पाहिजे. असो; आतां आपण याच रस्त्यानें पुढें जाऊन आणखी कांहीं चमत्कार दृष्टीस पडतील ते पहावे आणि नंतर आपल्या छावणींत परत जावें (चालूं लागतो इतक्यांत सौंदर्यवल्ली, वेत्रवती व सानुमती यांस पाहून) काय चमत्कार हा! ह्या घोर अरण्यांत या स्त्रिया कशा आल्या, आणि त्याही इतक्या सुंदर! कदाचित् या कोणी कपटवेषी यक्षिणी

अगर राक्षसिणी तर नसतीलना! अथवा कोणी राक्षसांनीं चोरून आणलेल्या राजकन्या तर नसतीलना! कोणीही असल्या तथापि मला त्यांची भीति मुळींच नाहीं. कारण जोंपर्यंत माझीं शस्त्रें मजपाशीं आहेत तोंपर्यंत मीं कोणाचें कांहीं चालूं देणार नाहीं. असो; आपण या एका बाजूस उभे राहून या आपापल्यांत काय बोलतात तें ऐकूं, ह्मणजे सहजच यांचें वर्तमान आपल्यास कळेल (एकाबाजूस झाडाआड उभा राहतो.)

वे०— सखे सौंदर्यवल्ली, आपलं झाडाला पाणी घालायचं काम अजून बरंच राहिलं आहे कीं ग. लवकर लवकर आटपलं पाहिजे, नाहींतर रात्र होईलहो. पण सखे, गुरूजींच्या आशिर्वादानुरूप तुझा पती आला ह्मणजे बाई आमच्यापाशीं बोलशील तरी कांग? गुरूजींच्या बोलण्याप्रमाणं आतां लवकरच तुझे हे विपत्तीचे दिवस नष्ट होण्याची वेळ आली आहे ह्मणून आपलं विचारलंहो.

पु०— (साश्चर्य एके बाजूस) काय, यांनीं हिला सौंदर्यवल्ली या नांवानें हाका मारिली! तेव्हां ही कोण बरें असावी. माझीच प्रिया तर नसेलना. [जास्त निरखून पाहून] तिचे व हिचे अवयव तर एकसारखेच दिसतात. पण काय मीं वेडा! माझी प्रिया येथें येण्याचा संभव तर मुळींच दिसत नाहीं, आणि तीच जर ही असेल तर आज माझें भाग्य

खचित उदयास आलें असें मीं समजतों. अरे, पण माझें मन हिजकडे इतकें कां वरें ओढावतें. मना इतकें उतावेळ होऊं नको. आणखी कांहीं वेळ यांचें भाषण ऐकून आपली सर्व संशयानिवृत्ति करून घे ह्मणजे तुझे हेतू पूर्ण होण्यास मुळींच उशीर लागणार नाहीं. बरें असो, या आणखी काय बोलतात तें मुकाट्यानें ऐकावें. [पुनः एका बाजूस उभा राहतो.]

सा०— पण सखे सौंदर्यवल्ली, त्या तुझ्या सावत्र आइनं इतके तुझे हाल केले, आणि तुझ्या पित्यानं त्याची मुळींच चवकशी केली नाहीं हें मोठें आश्चर्य नव्हे काग! आणखी ह्मणे तुझा पिता मोठा नीतीनं राज्य करणारा आहे व सर्वांवर सारखं लक्ष ठेवितो ह्मणतात, आन् त्याच्याच घरांत असा अंधेर! दिव्याखालीं अंधेर ह्मणतात तें कांहीं खोटं नव्हे. कुठली बाई ही नीति आणि कुठलं हें लक्ष. मला तर बाई या सर्व गोष्टींचं नवल वाटतंहो.

पु०— आतां तर शंका मुळींच राहिली नाहीं; कारण या सर्व गोष्टी माझ्या प्रियेच्याच संबंधाच्या दिसतात. बरें असो. येथपर्यंत तर सर्व नीट जुळलें खरें; पण मला वाटतें हिचें स्वतःचें काय ह्मणणें आहे तें एकवार ऐकावें ह्मणजे मनाची पक्की खातरी झाली. (पुनः एकीकडे मुकाट्यानें उभा राहतो.)

सौं०— सख्यांनों, अग काय विचारतां, ह्मणतातना तें कांहीं खोटं नव्हेहो. एकदां प्रारब्ध फिरलं ह्मणजे घराचे वासेसुद्धां फिरतातहो. अग हाच माझा पिता. शौर्यसागर, दुसरा संबंध व्हावयाच्या अर्थी मला जीव कीं प्राण करीत असेहो, त्यास कनइ बाई आलिकडे महिना महिना माझी आठवण सुद्धां होत नसे. अग ठीकच आहे कोठून होणार; एखादा प्राणी पारध्याच्या फाशांत सांपडतो व त्याची अवस्था कशी होते तशी त्याची स्थिति झाली आहे. नाहींतर हा माझा पिता अगबाई विस्तव होताहो. पण त्या लंकेपुढें अगदीं जशी गोगलगाय. असो; त्याला तरी बाई काय दोष लावायचा आहे. आपल्या प्रारब्धानुसार त्यास बुद्धि झाली हेंच खरं. मीं ह्मणते तेंही मेलं घटकाभर पत्करेल, पण ज्यांच्याकरितां इतकं दुःख व त्रास मला सोसावा लागला ते जवळ असते तर कनइ यापेक्षां जरी अधिक संकटं भोगावीं लागलीं असतीं तरीसुद्धां मीं भोगलीं असतीं; पण त्यांचाही वियोग ! अशी बाई माझ्या कर्माची कथा कांहीं अघटित आहेहो. आतां गुरूजींनीं आश्रय दिला व त्यांची कृपा आहे येवढ्यावरूनच थोडीशी आशा वाटत आहे. नाहींपेक्षां माझ्या प्रारब्धाची परिक्षा मीं तर केलीच आहे. काय सख्यांनो, अशा स्थितींत जीवंत राहणें त्यापेक्षां मरण येईल तर बाई

बरं होईल. व्यर्थ मीं राजकुळांत जन्मले. यापेक्षां गरिबाच्या पोटीं येते तरी सुद्धां बाई पुष्कळ सुख लागलं असतंहो. असो, व्यर्थ बोलून काय बाई उपयोग. बरं सख्यांनों, संध्याकाळ झाली, लवकर आटपून आश्रमांत जायचं नाहींका ?

पु०— हरहर ! देवा, किती मीं दुष्ट. या दुर्दैव्याकरितां माझ्या प्रियेस इतकें दुःख होत आहेना. व्यर्थ मीं जन्मास आलों व इतके दिवस वाचलों.असो कांहीं चिंता नाहीं, आतां आपले प्रतिकूळ दिवस तर खचित नष्ट झाले; तेंव्हां आपण येथेंच हिला ओळख देऊन हिचें दुःखमोचन करावें ह्मणजे झालें. पण छेः असें केल्यानें या मला न ओळखतां माझा तिरस्कार करतील; तर योग्य वेळ आल्याशिवाय यांस ओळख देणें बरोबर नाहीं. पण तशी वेळ आतां येण्याची आशा दिसत नाहीं, कारण आतां अस्तमान झाल्याबरोबर या आश्रमांत निघून जातील. कसेंही होवो पण अंमळ वाट पहावी हें बरें. ( पुनः एक बाजूस उभा राहतो.)

१०— पण सखे सौंदर्यवल्ली, वरचेवर त्यांचं स्मरण करून उगीच जिवास संताप करून घेतेस यास म्हणावं तरी काय. अग गुरूजींनीं काय आशिर्वाद दिला आहे कीं, तुझा पती येथें येऊन तुला भेटेल व तुझे सर्व मनोरथ पूर्ण होतील. ती मुदतही संपत आली आहे, मग उगीच कांबरं बाई दुःख करावं !

अग पूर्वेचा सूर्य पश्चिमेस उगवेलहो पण गुरुजींचं वचन कधींही खोटं होणार नाहीं बरंका.

सौ०— अगबाई पण खोटं होईल असं कधीं मीं म्हटलं; तुम्हींच गोष्ट काढलीत म्हणून मींही सहज बोललेहो. असो, सख्यांनो, बोलण्याच्या नादांत बरीच संध्याकाळ झाली. चला बाई लवकर नाहीं तर गुरुजी रागं भरतील. (चला चला बाई असें म्हणून चालूं लागते इतक्यांत पुण्यशीलास पाहून भीतीयुक्त होत्साती सख्यांस ) अगबाई, पण हें कोण येथें उभं आहे. ए वेत्रवती, अग सानुमती, आलांत कांग. ( वेत्रवता व सानुमती जवळ येतात) हें पाहिलतका कोण तें; मीं तरी बाई गर्भगळित झालें. तुह्मीं कधीं यांस येथें पाहिलं होतंका? माझ्या तर बाई कधीं पाहण्यांत नाहींत.

पु०—(पुढें होऊन) स्त्रियांनो, भिऊं नका, भिऊं नका. प्रिये ज्याच्याकरितां तूं इतके हाल व दुःखें सोशित आहेस तोच हा कृतघ्न, दुष्ट, पापी, नीच चांडाळ गुरुजींच्या आशिर्वादानुरूप तुजपुढें उभा आहे; याजकडे एकवार कृपावलोकन कर. पण छेः कृपावलोकन कशासाठीं. (गुढघे टेंकून तिच्या चरणापाशीं उभा राहतो व हातांतील शस्त्र तिजपुढें करून ) मीं तुझा सहस्र अपराधी आहें; तेव्हां हें शस्त्र घेऊन यास जें शासन करणं योग्य दिसेल तें कर. मीं तें

स्वसंतोषानें सहन करण्यास सिद्ध आहें. (नम्र होतो.)

सौ०— अगबाई हा काय चमत्कार. हें भलतंच कायतें. (सलज्ज होऊन त्यास उठण्यास सुचविते व सख्यांस) सख्यांनो, माझा तर अपराध कोणी केला नाहीं; पण उलट मीं मात्र अपराधी आहें. कारण प्रथम मींच प्रीतीलक्षणें दाखवून यांचं मन वळविलं व त्यायोगें यांजवर अनेक संकटं आणिलीं; तेव्हां जें शासन करणें तें मलाच केलं ह्मणजे बाई बरं होईल.

पु०— छेः अशी गोष्ट कधींही होणार नाहीं, कारण तूं जें केलेंस तें आपल्या मनाजोगें केलेंस; पण मीं मूर्खानें आपली योग्यता न जाणतां तुला अनुमोदन दिलें ही माझीच चूक होय. असो घडून गेलेल्या गोष्टीस उपाय नाहीं. प्रिये, आतां तूं मुळींच काळजी करूं नको. आपले अनिष्ट दिवस नष्ट झाले असें समज व यापुढें परमेश्वराच्या कृपेनें व गुरूंच्या आशिर्वादानें आपण अखंड सुखोपभोग घेऊं यांत बिलकुल संदेह नाहीं. स्त्रियांनो, आतां तुमच्या आश्रमीं चला व तेथें गेल्यावर गुरुजींचें दर्शन घेऊन ते आज्ञा देतील त्याप्रमाणें वर्तन करूं ह्मणजे झालें. चला तर.

चे०— महाराज, केवढा आनंदाचा दिवस आजचा ! आमच्या सखीचें सर्व दुःख आज नाहींसें झालें.

असो, आपण ह्मणतां त्याप्रमाणंच करणं अवश्य आहे. आश्रम येथून अगदीं जवळ आहे, तेव्हां माझे मागोमागच यावं ह्मणजे झालं. चल बाई सानुमती. सखे सौंदर्यवल्ली, कां बाई आतांचना आपलं बोलणं झालं, आलाना परिचय. सखे सानुमती, पाहिलीसना तोंडावर इतक्यांतच टवटवी किती आली ती. काय बाई तरी हें प्रेम. नवरा बायकोची प्रीति असावी तर अशीच असावी. वाः एकूण धन्य खरी तूं हो!

सा०— अग, टवटवी म्हणजे हें काय सांगतेस. चातक पक्षी मेघबिंदुची अपेक्षा करीत तिष्ठत वसतो आणि तो प्राप्त झाल्याबरोबर त्याची स्थिति तेव्हांच कशी वदलते तशीच ही गोष्ट आहेहो. आणि परमेश्वरावर हवाला ठेऊन तिनें दिवस काढले मग परमेश्वर कृपा कां करणार नाहीं वरं? असो; सख्यांनों, चला बाई लवकर आश्रमांत; अगदीं काळोख पडला. गुरूजी आतां रागं भरतलि मग मीं तुझं नांव सांगेन वरं वेत्रवती. महाराज, या रस्त्यानं असं यावं; आपण या जागेस नवखे आहांत, तेव्हां आपल्यास सूचना करण्यास पाहिजे म्हणून बोललेहो. यावं महाराज असं माझ्या मागोमाग.

पु०— फार उत्तम आहे, चला स्त्रियांनों; चल प्रिये हळूं चालहो. काय प्रारब्धाची गती विचित्र ही! ही राजकुळांत उत्पन्न झालेली उघड्या जमिनीवर

सुद्धां जिचे पाय लागायचे नाहींत, तिला खड्या-कांख्यांतून चालण्याचा प्रसंग यावाना! हरहर! असो, चला [ सर्व जण चालूं लागतात इतक्यांत आश्रमाचे द्वारापाशीं येऊन. ]

वे०— महाराजांनीं सुखेंकरून आंत प्रवेश करावा, व राजांस जें उचित आदरातिथ्य तें घेण्यास तयार असावें; हें जरी अरण्य आहे तथापि गुरुजींच्या तपाच्या प्रभावानें हवी ती वस्तु याठिकाणीं ते इच्छामात्रेंकरून उत्पन्न करतात. तेव्हां या ठिकाणीं महाराजांस कोणचेंच उणें पडणार नाहीं.

पु०— हा तुमचा मजवर अनुग्रहच समजावयाचा. असो, स्त्रियांनों, या ठिकाणीं मला आदरातिथ्याची मुळींच गरज नाहीं. कारण या ठिकाणीं सर्व सारखे आहेत. मीं जरी राजा असलों तथापि आपल्या राज्यांत अधिकारी ह्मणून ऋषीपुढें माझी योग्यता मुळींच नाहीं. असो, स्त्रियांनों; गुरुजींच्या दर्शनाची अत्यंत उत्कंठा मनांत उत्पन्न झाली आहे तरी तें एकवार लवकर करवावें ह्मणजे मला सर्व आदरातिथ्य पोहचलें.

सा०— महाराज अगदीं खरं बोलले, आणि राजास हेंच भाषण उचित होय. महाराज, गुरुदर्शनाविषयीं आपली इतकी उत्कंठा पाहून मनास फार आनंद झाला. या महाराज असे इकडून ह्मणजे आपली इच्छा इतक्यांतच तृप्त होईल. ( सर्वजण

दुर्वासऋषीपुढें साष्टांगनमस्कार घालून हात जोडून उभे राहतात, त्यां सर्वांस पाहून दुर्वासऋषि आशिर्वादयुक्त हात वर करून )

दु०ऋ०—राजा आयुष्मान् भव. मुलीनो अष्ट पुत्रासौभाग्यवती व्हा. राजा कुशल आहेसना?

दु०— ( हात जोडून व नम्र होऊन ) महाराज, आपली कृपा मजवर असल्यावर कुशल कां नाहीं असणार? प्रभु सर्वत्र आनंद आहे.

दु०ऋ०— मुली, मी तुला आशिर्वाद दिल्याप्रमाणें तुझा पती तुला येऊन भेटलाना? आतां मी तुला सांगितल्याप्रमाणें तो एका राज्याचा मालक आहे कीं नाहीं हें पाहिजे तर विचार.

सौ०— गुरुजी, आपलं वचन असत्य झाल्यानंतर जगांत सत्य राहणार कुठं. पण गुरुजी, आपण माझं आपल्या मुलीप्रमाणं लालनपालन केलं व माझ्याबद्दल आपल्यास फार श्रम पडले, याबद्दल ह्या अनाथ लेंकरास क्षमा करावी व प्रेमांत अंतर होऊं देऊं नये; ( नमस्कार करते. )

दु०ऋ०—बाळे,काय वेडी झालीस;अग अनाथांचें रक्षण करणें हा तर आमचा धर्मच होय. त्यांतून तुला धर्मकन्येप्रमाणें मानल्यावर मग राहिलें काय. तस्मात् त्याबद्दल तूं मनांत अगदीं खंती होऊं नको व आपल्या पतीसमवेत गमन करून पुत्रपौत्रासह अखंड राज्यसुखोपभोग घे. व तुला हा दुसरा

आशिर्वाद देतों हा ग्रहण कर. (आशिर्वादयुक्त हात वर करून)

॥ श्लोक ॥

**बाई थोर गुणी पराक्रमि असा सत्पुत्र होई तुला ॥**
**वंशीं येउनि शोभवील तनये या उच्च तुझ्या कुला॥**
**बैसोनी मग सार्वभौमपदिं तो पावेल माना सदां॥**
**अंतीं उद्धरुनी कुलां बघ मुली जाईल तो सत्पदा॥**

राजा असा पराक्रमी व सद्गुणी तुह्मांस पुत्र होऊन तुमचें कुळ शोभवील. व त्यासह तुह्मीं या आश्रमीं माझे दर्शनास याल. राजा आणखी कांहीं इच्छा असल्यास मागून घे.

पु०— महाराज, मागणें ह्मणून येवढेंच कीं आपली सदोदीत कृपा आह्मांवर असावी. व आतां आह्मीं कशा रीतीनें वर्तन करावें येवढें सांगण्याची कृपा व्हावी ह्मणजे झालें.

दु०ऋ०—राजा, सांगतों ऐक; मी मागें या माझ्या कन्येस तुह्मांसमवेत तिच्या पितृगृहीं पाठविण्याचा विचार केला होता, परंतु राजा, सांप्रतच्या कालमानावरून माझी अशी खात्री आहे कीं, हिचा पिता हिचा वियोग सहन न झाल्यामुळें सर्व राज्याचा त्याग करून अत्यंत दुःखी होत्साता तिचा शोध करण्यास निघाला आहे तोही याच ठिकाणीं येईल; त्याचप्रमाणें सत्यशील तुझ्या शोधाकरितां

गेला आहे तोही इतक्यांतच येऊन तुला भेटेल; तो आल्यानंतर सर्वजण एकमेकांस भेटून सर्व मंगलकार्यें येथेंच करा व मग सर्वजण आपापल्या नगराप्रत जा. कां राजा, तुझें असेंच मत आहेना.

पु०— ऋषिवर्य, आपली आज्ञा आह्मांस शिरसावंद्य आहे. आपण ज्याप्रमाणें सांगतां याप्रमाणेंच सर्व गोष्टी होणार असल्यावर मग आमचें कांहींच ह्मणणें नाहीं. पण या सर्वांची आमची गांठ कधीं पडणार येवढें सांगणें होईल तर मनास संतोष होईल.

दु०ऋ०— राजा, तुह्मां सर्वांची गांठ येथें फारच अल्प काळांत पडेल. तोंपर्यंत तुह्मी सर्वजण येथें सुखानें रहा. आणखी राजा हें जरी अरण्य आहे तथापि ईशकृपेनें याठिकाणीं हवी ती वस्तु मिळते. तेव्हां मनांत कोणच्याही रीतीची शंका न धरतां जें लागेल तें निस्पृहतेनें मागून घे बरें. अहो शिष्य, तुह्मांसही सांगतों कीं आपल्या येथें जे पाहुणे येतात त्यांचे योग्यतेप्रमाणें त्यांचें आदरातिथ्य करणें हें तुमचें कर्त्तव्य होय. कारण आह्मांस अशा गोष्टींकडे लक्ष देण्यास वेळ मुळींच नाहीं. समजलांतना?

प० ऋ० शि०— गुरुजी, आपली आज्ञा आह्मांस जशी आहे त्याप्रमाणें वर्तन करण्यास आह्मीं कधींही हयगय करीत नाहीं. गुरुजी, राजास तो आपले नगरांत असतां जें सौख्य मिळत असेल, त्याही

पेक्षां त्यांस अधिक सुख होईल अशा रीतीची व्यवस्था करतों मग तर कांहीं हरकत नाहींना!

दु० ऋ० शि०—(गुरुजीस साष्टांग नमस्कार घालून) गुरुजी, आज आपल्यास एक आनंदाची बातमी कळविणें आहे. आतांच मीं होमाचें सामान घेऊन आलों त्यावेळीं माझ्या नजरेस एक मोठा राजा आपल्या पुष्कळ सैन्यासह या अरण्यांत आलेला दृष्टीस पडला. त्यां सर्वांस पाहिल्याबरोबर हे कोण आहेत हें समजावें या हेतूनें त्यांजपाशीं जाऊन चवकशी करतां असें कळलें कीं, कनकनगरीचा राजा शौर्यसागर आपल्या कन्येच्या शोधार्थ हिंडत आहे त्याची ही स्वारी आहे. त्याबरोबर मीं त्यांस असें सांगितलें कीं आमच्या गुरुजींस शरण आल्यास तुमच्या कन्येची भेट होईल. हें ऐकतांच त्यांनीं आपल्या एका प्रधानास चवकशी करण्याकरितां मजबरोबर दिलें आहे. आपली आज्ञा होईल तर आंत घेऊन येतों.

दु० ऋ०—शिष्य, फार उत्तम आहे त्यांस आंत घेऊन यावें. राजा आजचा दिवस तुह्मां सर्वांस आनंदाचा होवो. मीं तुला सांगितल्याप्रमाणें शौर्यसागरही याच स्थळीं प्राप्त झाला आहे तेव्हां आतां कोणच्याच गोष्टीची काळजी राहिली नाहीं. याच ठिकाणीं सर्व मंगलकार्य आटपून नंतर सर्वां-

नीं आपापल्या नगरीं जावें अशी माझी इच्छा आहे. ( शिष्य जातो ) कां राजा असेंचना.

पु०— जशी गुरुजींची आज्ञा असेल त्याप्रमाणेंच. महाराज आजचा आनंदाचा दिवस केवळ आपल्या कृपेनें प्राप्त झाला आहे तेव्हां कोणचेंही कृत्य करणें तें आपल्या आज्ञेविरहित कसें होईल.

दु० ऋ० शि०—( शौर्यसागराच्या प्रधानास गुरुजींपुढें आणून ) गुरुजी, हे आले पहा, आतां काय आज्ञा करणें असेल ती यांस करावी.

दु० ऋ०— हेचका शौर्यसागर राजाचे प्रधान?

प्र०— होय ऋषिवर्य; मीं आपल्यास साष्टांग प्रणिपात करतों.

दु० ऋ०— कल्याण. राजा शौर्यसागर कुशल आहेना? आज या घोर अरण्यांत येण्याचें प्रयोजन काय बरें? राजा कोठें शिकार वगैरे करण्यास गेला होता कीं काय?

प्र०— ऋषिवर्य आपल्यास या सृष्टींत काय चाललें आहे तें सर्व कळतेंच आहे; कारण आपण भूत, भविष्य, वर्तमान जाणतां आहांत, तेव्हां मीं सांगावें असें नाहीं, पण ज्या अर्थीं आपण प्रश्न केला त्या अर्थीं सांगतों. प्रभू, हे आमचे शौर्यसागर महाराज कन्याविरहानें व्यथित होत्साते सर्व राज्याचा त्याग करून तिच्या शोधार्थ हिंडत आहेत. आज या अरण्यांत शोध करण्याकरितां प्राप्त झालों होतों, व

येवढा वेळ पर्यंत पुष्कळ शोध केला पण कोठेंही कांहीं ठिकाण लागेना ह्मणून निराश होऊन येथून कुच करण्याच्या विचारांत होतों; इतक्यांत दिवस फार वर आल्यामुळें महाराजांनीं येथें तळ देण्यास सांगितलें. राजाज्ञेप्रमाणें सर्व जण व्यवस्था करीत आहोंत इतक्यांत हे आपले शिष्य आह्मांजवळ येऊन, ज्याप्रमाणें एखादा मरणोन्मुख झालेल्या प्राण्यास अमृत पाजावें त्याप्रमाणें यांनीं, आपल्यास आमचे महाराज शरण आल्यास त्यांच्या कन्येची भेट होईल, अशीं अक्षरें काढलीं; त्यावरून आपल्या दर्शनास महाराजांनीं कधीं यावें याची चवकशी करण्याकरितां मला पाठविलें आहे; तेव्हां प्रभूंची जशी आज्ञा होईल त्याप्रमाणें महाराजांस जाऊन कळवितों.

दु०ऋ०— प्रधान, तुह्मीं ह्मणतां कीं कन्येच्या विरहव्यथेनें पीडित होऊन तिचा शोध करीत रानांवनांतून तुमचे महाराज हिंडत आहेत; परंतु ज्या वेळेस कन्या जवळ होती त्या वेळेस स्त्रीलंपट होऊन तिचें महिना महिना त्यास स्मरण होत नसे. हीच काय तुमच्या राजाची नीति. असो त्याच्या प्राक्तनांत असेंच लिहिलें होतें ह्मणून तसें घडून आलें. आतां तुह्मीं आपले राजास पाहिजे त्या वेळीं माझ्या दर्शनास घेऊन या.

प्र०— प्रभू, आपण दीनदयाळ आहांत तेव्हां आमच्या महाराजांच्या हातून घडलेल्या अपराधाबद्दल त्यास क्षमा का करणार नाहीं. ऋषिवर्य, मीं त्यांस आतांच आपल्या दर्शनास घेऊन येतों.

दु०ऋ०— फार उत्तम आहे. राजा पुण्यशील। ग्रहदशेचा फेरा किती चमत्कारिक असतो पाहिलेंसना. हा राजा शौर्यसागर प्रथमपासूनच नीट वागता तर इतकें दुःख कां भोगावें लागतें. राजा, आतां दोन्ही राज्यें तुझ्या हातांत येतील तर मोठ्या दक्षतेनें व्यवस्था ठेविली पाहिजे. नाहीं तर सर्व फजितवाडा होईलहो.

पु०— गुरूजी, आपली कृपा असल्यावर दोन नाहीं चार राज्यें चालविणें सुद्धां मला मुळींच कठीण वाटत नाहीं; पण प्रभू, तो शौर्यसागर आपली कन्या मला अर्पण करण्यास अद्यापि देखील हरकत घेणार नाहींना?

दु०ऋ०— राजा, त्याविषयीं तूं अगदीं निष्काळजी रहा. कारण त्यास इतकें दुःख सोसावें लागल्यानंतर तो आतां नाकबूल करील असें वाटत नाहीं; आणि तशांतून कदाचित् त्यानें प्रत्यवाय आणलाच तरी ती माझी धर्मकन्या आहे व तिची मीं हव्या त्या रीतीनें व्यवस्था करीन असें सांगितल्यावर मजपुढें त्याचें कांहीं एक चालावयाचें नाहीं. सारांश सौंदर्यवल्ली तुला अर्पण केली असें समज.

**प०ऋ०शि०**— गुरुजी, आपल्या ताईबरोबर आलेले सत्यशील, पुण्यशील महाराजांचा शोध लावण्यास गेले होते, तेही आतांच आले व बाहेर ताईबरोबर बोलत आहेत ते आतां इकडे येतील.

**पु०**— कोण माझा मित्र सत्यशील. चल चल मला दाखीव पाहूं. एकवार त्यास दृढालिंगन केव्हां देईन असें झालें आहे. (इतक्यांत सत्यशीलास दूर येतांना पाहून धांवत जातो व त्याच्या गळ्यास घट्ट मिठी मारून) बा सत्यशीला, कुशल आहेसना. अरे आमचेकरितां किती दुःखें भोगिलीस. अरे तुझे आह्मीं इतके ऋणी आहोंत कीं, आमच्या चर्मांच्या पादुका करून जरी तुझे पायांत घातल्या तथापि तुझ्या ऋणांतून आह्मीं मुक्त होणार नाहीं. पण मित्रा आह्मांबद्दल तुला इतका त्रास सोसावा लागला त्याचा राग तर नाहींना. हा पाहिलास पदर यांत क्षमा येवढी भिक्षा घाल ह्मणजे झालें.

**सत्य०**— हं हं हं. महाराज हें काय. आपण असें भाषण करणें योग्य नव्हे. कारण आपणांवर मीं यांत उपकार ते काय केले. सेवकांनीं चाकरी बजाविण्याचा जो त्यांचा धर्म तो मीं केला. तेव्हां आपण जो या वेळीं माझा गौरव केला त्यायोगानें मीं कृतकृत्य झालों असें समजतों.

**पु०**— सत्यशीला, इतःपर तूं माझा सेवक नव्हेस, एवढेंच नाहीं; पण मला जो सन्मान मिळतो तोच

तुला मिळून तूं व मी बरोबरीच्या नात्यानें सख्ख्या भावाप्रमाणें राहूं; कारण माझ्या अनिष्ट वेळीं तूं खऱ्या सेवाधर्मानें वर्तन केलेंस तेव्हां एवढा मान तुला मिळणें यांत मोठेसें कांहींच नाहीं. गुरुजी मीं ह्मणतों हें सत्य आहेना!

दु० ऋ०—राजा, फार योग्य भाषण केलेंस, कारण जो मित्र आपल्या विपत्तिकाळीं आपल्यास उपयोगी पडला त्यास येवढा मान मिळणें अगदीं उचित आहे; आणि मींही आपली दुसरी कन्या वेत्रवती यास देण्याचा निश्चय केला आहे. कारण सानुमती अद्याप फार लहान आहे व लग्नासही उपवर झालेली नाहीं. तेव्हां ती आणखी कांहीं दिवस मजपाशीं असली पाहिजे. मग ही गोष्ट तुझ्या पसंतीस येतेका?

पु०—ऋषिवर्य आपण केलेली गोष्ट कोणास मान्य होणार नाहीं? इतकेंच नव्हे पण हा एक आपला मजवर दुसरा अनुग्रहच असें मीं समजतों. ऋषिश्रेष्ठ, एक आपली कृपा आह्मांसर्वांवर असली ह्मणजे आमच्या सारखे धन्य प्राणी या जगांत दुसरे नाहींत ( इतक्यांत शौर्यसागर आपल्या परिवारासहीत द्वारापाशीं आला आहे असें वर्तमान सांगत ऋषिशिष्य प्रवेश करतो. )

ऋ० शि०—गुरुजी, राजा शौर्यसागर आपल्या दर्शनासाठीं द्वारापाशीं उभा आहे त्यास आंत घेऊन येऊंका?

दु० ऋ०— वा: फारच उत्तम गोष्ट झाली. राजा पुण्यशीला, तुझ्याशिवाय याठिकाणीं, राजास देण्यास उचित तो सन्मान शौर्यसागरास देण्यास, दुसरें कोणी जाणतें नाहीं. तरी तूं व सत्यशील असे उभयतां त्यास सामोरे जाऊन बहुसन्मानानें घेऊन या.

पु०— ऋषिवर्य फार उत्तम आहे. सत्यशीला ऋषींची आज्ञा आपणास मोडतां कामा नये; तेव्हां चल लवकर. [ दोघेही जाऊन शौर्यसागरास भेटतात व मोठ्या सन्मानानें त्यास दुर्वासऋषीपुढें आणून ] ऋषिवर्य, हे आले पहा. [ सर्वजण नमस्कार करून हात जोडून उभे राहतात. ]

दु० ऋ०— राजा शौर्यसागरा, सर्व कुटुंबासमवेत कुशाल आहेसना !

शौ०— ऋषिवर्य, आपल्या आशिर्वादेंकरून सर्व कुशल आहेत; पण मनास एक गोष्ट अत्यंत दु:ख देत आहे व त्यामुळें हा असा मीं रानांवनांतून भटकत फिरत आहे. तेव्हां समर्थांनीं या दीनावर कृपा करून संकट मुक्त करावें येवढीच प्रार्थना चरणापाशीं आहे.

दु० ऋ०— राजा शौर्यसागरा, असें संकट तुला कोणचें आहे तें एकवार मला कथन कर ह्मणजे माझे हातून त्याचें निरसन होण्यासारखें असल्यास करीन. राजा, तुझ्या पूर्वसुकृतानें माझें व या आश्रमाचें दर्शन तुला घडलें असें समज व मनांत कोणचाही

विकल्प न आणतां सर्व हकीकत कथन कर ह्मणजे तुझें सर्व संकट परिहार होईल.

शौ०— ऋषिवर्य, आपणास काय कळत नाहीं? आतां माझे मुखांतून वदाविणें असल्यास मीं सांगण्यास तयार आहें. आपण थोर दयाभूत आहांत तेव्हां या दीनाचे हातून जो अपराध घडला आहे त्याबद्दल क्षमा करून एकवार कृपावलोकन करावें एवढेंच मागणें आहे.

दु० ऋ०— राजा शौर्यसागरा, आपल्यांत जी एक " बुद्धिःकर्मानुसारिणी " अशी ह्मण आहे ती तुला माहीत असेलच; तेव्हां तुझ्या प्राक्तनानुसार तुला बुद्धी झाली यांत तुझा विशेष दोष नाहीं. अस्तु. " गतंनशोचामि " होऊन गेलेल्या गोष्टीबद्दल खेद करीत बसणें बरोबर नाहीं. राजा, या पुण्यशीलाबद्दल आतां तरी तुझी खात्री झालीका ?

शौ०— ऋषिश्रेष्ठ, त्या वेळेस या मदांधाच्या हातून या पुण्यशीलाचा विनाकारण छळ झाला व अशी गोष्ट घडण्यास कारण माझी नूतन स्त्री व तिचा भाचा होय. हें त्यांचें कपट मला कळल्यानंतर त्यांस यथान्याय शासन करून, राज्यप्रधानाचे स्वाधीन केलें व मीं आपल्या कन्येच्या शोधास निघालों. आतां या पुण्यशीलाच्या व माझ्या कन्येच्या निरपराधीपणाबद्दल माझी पक्की खात्री झाली आहे व या उभयतांचा विवाह करून राज्य त्यांचे स्वाधीन

करावें व आपण तिर्थयात्रा करून देहांचें सार्थक करून घ्यावें ही इच्छा आहे. याउपर गुरुजींची आज्ञा होईल ती खरी.

दु० ऋ०— राजा शौर्यसागरा, फारच योग्य विचार मनांत आणलास. माझा तर याबद्दल निश्चयच झाला होता; पण एकवार तुझें मत घ्यावें येवढी इच्छा होती, त्याप्रमाणें तुझेंही अनुमोदन मिळालें. आतां माझी जो ही दुसरी कन्या वेत्रवती ती मी या सत्यशीलास अर्पण करणार. राजा, या सत्यशीलाची काय थोरवी सांगूं! अरे खरोखर हा केवळ सत्याचा पुतळाच आहे. आतां या ठिकाणीं मीं आपल्या तप सामर्थ्यानें सर्व वस्तु उत्पन्न करितों व दोन्हीं मंगलकार्यें याच ठिकाणीं करून नंतर सर्वांनीं आपापल्या स्थानीं परत जावें अशी माझी इच्छा आहे. कां पुण्यशीला, आतां तर सर्व तुझ्या मनाप्रमाणें घडून आलेंना? आतां तुला सांगणें ह्मणून येवढेंच कीं सांप्रत तुझ्या ताब्यांत दोन राष्ट्रें आलीं आहेत पैकीं एकावर सत्यशीलाची योजना कर व दुसरें तूं सांभाळ. कां असेंचना!

पु०— ऋषिवर्यांच्या आज्ञेबाहेर आह्मीं मुळींच नाहीं. प्रभू, आह्मां उभयतांकरितां जीं दुःखें व संकटें या सत्यशीलानें भोगिलीं आहेत त्याबद्दल दोन्हीं राज्यें जरी त्याचे स्वाधीन मीं केलीं, तथापि त्यास योग्य बक्षीस मिळालें असें होणार नाहीं. प्रभूंनीं आ-

तांच जो त्यास थोरपणा दिला तो अगदीं यथायोग्य आहे. अहाहा! धन्य ती माता, जी असलें गुणी रत्न प्रसवली!

दु० ऋ०—पुण्यशीला, हें फळ सर्व सत्याचें होय. जो खऱ्या रीतीनें वर्तन करतो त्याचा नेहमीं असाच जय होणार व जो अनीतीनें वर्तन करील त्यास अंतीं शौर्यसागराची पत्नी व भाचा यांचे प्रमाणेंच दंड होणार हें पक्कें तुझ्या ध्यानांत ठसलेंना! ( इतक्यांत रत्नजडीत अलंकार व भरजरी पोषाख घेऊन शिष्य प्रवेश करतो.)

ऋ० शि०—ताई, हे घे अलंकार; हे तुझे व आकाचे आहेत. हे सर्व परिधान करून तयार होऊन या जा. पुण्यशील हे आपले व सत्यशीलाचे अलंकार व पोषाख आहेत हे ज्याचे त्यांनीं परिधान करावे. कां असल्या वस्तु आपल्या राज्यांत मिळतीलका?

सत्य०— अहो, इंद्रादिकांस सुद्धां दुर्मिळ ज्या वस्तु त्या आह्मां नाशवंत प्राण्याच्या दृष्टीस तरी पडण्याचा संभव आहेका? मग मिळणें तर एकीकडेच राहिलें. अहो, प्रभूंची कृपा असल्यावर काय कमी आहे.

सा०— सखे सौंदर्यवल्ली, अग वेत्रवती, चला बाई मीं तुह्मांस हे अलंकार घालते. मीं जरी लहान आहे तरी पण मला सर्व ठाऊक आहेहो.

सौं०— अग, पण आह्मीं नाहीं कधीं ह्मंटलं. आमच्या दोघींपेक्षां तूं बाई शहाणी आहेस बरंका; झालंना आतां.

वे०— चल सखे सौंदर्यवल्ली, आपल्याला लवकर आटपून परत आलं पाहिजेना. चल बाई सानुमती.

ऋ० शि०— पण सानुमतीला कांहींच नाहींना? अरेरे! आणि ही आपल्या मनांत ह्मणते मीं गुरुजींची लाडकी. हीच्चका ती गुरुजींची तुझ्यावर प्रीति!

सा०—अरेरे,नसूंदे माझ्यावर जा.माझं लग्न व्हायला लागलं ह्मणजे मलाही असेच दागिने मिळतील. तूं कारे बायकांत पुरुष लांबोडा? जातोस का नाहीं येथून? कां बाबांना सांगूं मीं.

दु० ऋ०— कां शिष्य, तुमचें काय त्या मुलींत आहे. तुह्मांस दुसरीं पुष्कळ कामें आहेत. थट्टा करण्याची हीका वेळ. प्रसंग पाहून वर्तन करावें. आतां तुह्मांला हें समजणार तरी कधीं. मुलींनों, जा तुह्मीं आपलीं सर्व अलंकार व वस्त्र परिधान करून लवकर या. पुण्यशीला, सत्यशीला तुह्मींही उभयतां जाऊन आपले वस्त्रालंकार परिधान करून या. ( सर्वजण जातात व वस्त्रालंकार परिधान करून परत येतात).

सा०— बाबा, मीं बघ यानां कशा शृंगारल्या आहेत या. यांत कमी तर कांहीं नाहींना!

दु० ऋ०— ( सानुमतीस जवळ घेऊन कुरवाळतात. ) बाळे, तूं शहाणीच आहेस. ( सौंदर्यवल्ली व वेत्रवती यांचे हस्त धरून पुण्यशील व सत्यशील यांचे हातांत देतात व त्यांस ) पुण्यशीला, सत्यशीला अरे या तुमच्या धर्मपत्न्या आहेत. धर्मेचार्थेचकामेच या श्रुति-

वाक्यानुरूप यांचें पाणिग्रहण करून पालन करावें व मुलींनों, तुह्मीं ही सदोदित पतिसेवेंत तत्पर राहून पातिव्रत्यधर्मानें वर्तन करावें ह्मणजे इहलोकीं सर्व सुखें भोगून परलोकींही धन्य व्हाल. कां राजा शौर्यसागरा असेंचना ! आह्मीं जरी अरण्यांत राहतो तथापि आह्मांस प्रपंचांतलि सर्व गोष्टी समजतात.

शौ०— थोरास काय समजत नाहीं; आपण सांगितलें तेंच यथायोग्य. यापेक्षां आह्मांस अधिक तें काय कळणार.

दु० ऋ०— अस्तु. हें मंगलकार्य तर प्रभुकृपेनें निर्विघ्नपणें शेंवटास गेलें. काय सानुमती तुझी काय गडवड आहे. शिष्यांचीही कांहीं इच्छा आहेसें वाटतें. काय असेल तें बोला पाहूं.

सा०— बाबा सर्व समारंभ आटोपलाका. नांवें नाहीं का यांना घ्यायचीं?

ऋ० शि०— माझें ही तेंच ह्मणणें होतें. एकवार नांवें घेतलीं ह्मणजे सर्व कार्य आटोपलें असें समजायचें.

दु० ऋ०— अं:, त्यांतरे काय मोठें आहे. पुण्यशीला, घे पाहूं एकदां नांव.

पु०— सौंदर्यवल्ली ह्मणतात.

दु० ऋ०— असेंका. सत्यशीला, तूं घे आतां.

सत्य०— नेत्रवती.

ऋ० शि०— ताई आतां तुह्मीं. पण असें मोघम नाहींहो चालायचें. चांगला उखाणा घेऊन घेतलें पाहिजे.

सौ०– नमस्कारुनी देवा, कृतसंकल्प केला; ‘पुण्यशील महाराजांना वरण्याचा हेतु जगदंबेनं शेवटास नेला.

ऋ० शि०– असं काय. आतां आका आपण.

वे०– असे सद्गुणी चांगले, त्यांची जग गातें कीर्ति; सत्यशील महाराज केवळ सत्याची मूर्ति.

दु० ऋ०– अस्तु. प्रभुकृपेनें आजचा सर्व समारंभ तर शेवटास गेला. आतां ज्या प्रभूनें असत्याचा नाश करून सत्यास यश दिलें व त्यायोगें नेहमीं सत्यानें--च वर्तन करण्याविषयीं जगास स्पष्ट उदाहरण मिळालें त्या जगन्नियंत्यापाशीं आपणा सर्वांस व नाटकाचार्यांस सद्बुद्धि व सन्मार्ग प्राप्त होऊन उत्तम गति मिळावी अशाविषयीं सर्वांनीं नम्रभावें प्रार्थना करून नंतर सर्वांनीं आपापल्या कामास जावें.

[ सर्वांनीं मिळून ह्मणण्याचें पद. ]

## पद.

मूढमती दासें या केली अल्प सेवा ॥ विबुधमान्य ही होउनि धन्य करी जगिं देवा ॥ धृ ॥ शांतिसुख ब्रह्मानंद यांचा असासि ठेवा ॥ समदृष्टी ठेउनि रक्षीसि सकल विश्वा ॥मू०॥ सन्मार्गें वर्त्तन हा सदुपदेश घ्यावा ॥ षड्रिपु दमनाचा मनिं ध्यास प्रभू रहावा ॥मू०॥ तवभजन हा सुलभ उपाव भवतरणा द्यावा ॥ लक्ष्मण सखारामदास शेवटिं जवळि घ्यावा ॥ मूढ० ॥